# वऱ्हाडसमाचार.

BERARSAMACHAR

वर्ष ४१ ] आकोला, वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख ७ माहे मार्च सन १९१० इसवी [ अंक ८



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील

मुंबई ब्यांक, G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ एजंट
नं ७३

## नाशिकचा शुद्ध व घाटदार सोन्या चांदीचा माल.

**सोन्याच्या** टुशा, वज्रटीका, अग्रफुलें, फिरकीचीं व गुलाबाचीं फुलें, नाग, मुद्रा हेईचेनग, पुतळ्या, गोल व अष्टपैलु मणी इ०

**चांदीचीं** भांडी, उपकर्णी, गडवे, पेले, फुलपात्रें, पातेल्या, गडव्या, झाऱ्या, पळ्या, ताटे, तबकें, अत्तरदाण्या, गुलाबपाण्या, वाट्या, करंडे, कुयऱ्या, मसोळ्या, व सर्व प्रकारचे दागीनें मिळतील.

विशेष माहितीकरितां क्याटलाग पाटवूं मालाचे खरेपणाबद्दल जोखीमदार आहे.

लक्ष्मण आत्माराम अंबेकर
नाशीक.

नो. नं. ट ७६


## जाहीर नोटीस

स० स० नं० २/१०

विद्यमान स० म० सा० बा० कोर्ट आकोला यांचे कोर्टांतून जाहीर करण्यांत येत आहे कीं,

अर्जदार-- बळीराम सदाशिव सोनार राहणार आकोला. यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता० ३०।३।१० इ० रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानें आमचे कोर्टांत सकाळीं १० वाजतां हजर व्हावें. हजर न झाल्यास त्या पुढें कोणतेच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं दिली. तारीख २३-२-१० इ०

व्ही. एम्. खरे.
स० ज० कोर्ट अकोला.

नो. नं. ट ८२

## नोटीस

नोटीस चंद्रभागा मर्द आनंदा पाटील राहणार बोरगांव वैराळ तालुके बाळापूर इजला, खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आकोले येथील सुदर्शन वर्तमान पत्रांतून दिलेल्या नोटीसीचा मजकूर समजला त्याचें उत्तर देतों कीं तूं गुदस्त सालीं माझ्याशीं देव-घेव करून गहाणखतें ३ करून दिलीं होतीस, त्याप्रमाणें सर्व रकम मला पटविली नंतर पुन्हां सालमजकूरीं मजपासून रकम उचलून दस्तऐवज ४ गंगाराम आनंदा हा अज्ञान पालन करणार तूं चंद्रभागा मर्द आनंदा या नांवानें लिहून दिलेस त्या वेळीं तूं स्वतः हजर असून तुला रोख रुपये देऊन गहाणखतें करून घेतलीं. सर्व व्यवहार तुझे समक्ष झालेला तुला माहीत असून तूं लिहितेस कीं लबाडीनें अज्ञान गंगाराम याजपासून दस्तऐवज करून घेतला. हें तुझें लिहिणें अजिबात खोटें असून तूं लोकांच्या नादीं लागून खोटी नोटीस दिलीस हें तुझ्या इज्जतीस बट्टा लावणारें आहे. मी तुझ्याशीं केलेला व्यवहार सरळ आहे. तूं दस्तऐवजांत रुपये देण्याचा जो करार लिहिला तो होऊन गेला आहे तरी तूं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत माझी सर्व रकम व्याजासह चुकती देऊन दस्तऐवज काढून घ्यावे. व ह्या प्रमाणें न केल्यास मला कोर्ट मार्फत दावा करून रकम वसूल करून घ्यावी लागेल. कळावें. तारीख २०।२।१० इसवी.

सही
अलमचंद मुरलीधर द० खु०
रा० बोरगांव वैराळ.

नो. नं. ट ८३

## नोटीस

नोटीस बेशमी -- मारुती वल्द देवाजी दुमाळ राहणार सावरगांव ता. अकोट यांस --

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं, तुझी तारीख १४-१-१० ची सुदर्शन पत्रांतून दिलेली नोटीस मला पावली. माझीं शेतें ३ सन १३१९ फसली सालाकरितां तुला बटाईनें वाहण्यास देण्याचा ठराव झाला होता त्या प्रमाणें बटाइ खताचा कागद लिहीला होता. कागद झाल्यानंतर तुझी लागवडीस पैसा मिळत नाहीं असें सांगून तुझी त्याच वेळीं आपला हक्क सोडून दिला त्यावरून मीं २ शेतें आपले मुलास स्वाधिनानें वाहण्यास दिलीं व त्यानेंच उन्हाळवाहीपासून सर्व किस्तकारी करून पेरणी करून माल तयार केला व १ शेत मीच स्वत घरीं वाहिलें व माल तयार केला आहे. तुझी पहिल्यापासून शेतें वाहण्यास आले नाहींत असें असून माल माझे घरीं आणून ठेविला असें लिहीतां हें तुमचें लिहीणें अजिबात खोटें आहे. तुझी उन्हाळवाही पासूनच आपला शेतवरील हक्क सोडून दिला असून आतां लबाडीनें विनाकारण खोटी नोटीस दिली आहे. तेव्हां तुमच्या अशा ह्या खोट्या नोटीशीनें मी भिणार नाहीं. तुह्मांस कोर्ट मोकळें आहे ता० ८-२ १९१० इ.

सही
सारजी मर्द नंदाजी पुंडकर
वस्ती पुंड नि० बांगडी.

नो. नं. ट ८४

## जाहिर नोटीस.

सुलतानचंद मेवराज पुरोहित मारवाडी. राहणार खामगांव व गोविंद जानकीराम भुतारी राहणार खामगांव यांसः--

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे माहीदास ईश्वरदास या नांवचे दुकान खामगांवला व दुसऱ्याही गांवीं आमचीं दुकानें होतीं त्या दुकानचीं कामें व ह्या दुकाना संबंधी जीं कोर्टाचीं कामें पडतील तीं करण्यास तुह्मा उभयतांस मुखत्यार नेमलें असून मुखत्यारपत्र हि दिलें आहे, परंतु तें मुखत्यारपत्र आज पासून रद्द केलें आहे. करितां तुह्मी खामगांव दुकानचीं व दुसरे गांवचे दुकानचीं कोणचींही कामें. तीं कोर्टाचीं असोत किंवा दुसरीं कोणतींही कामें असोत तुह्मी तीं करूं नयेत. व या वरील दुकानच्या ज्या आसाम्या असतील त्यांशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेऊं नये. ठेवल्यास जबाबदारी तुमचेवर आहे. कारण आज तारखे पासून तुमचें उभयतांचें मुखत्यारपत्र रद्द केलं आहे. तुह्मांस कोणतेही प्रकारचा आमचे तर्फे अधिकार राहिला नाहीं. कळावें. ता० १।३।१० इ०

सही
(मारवाडींत) रामरतन
जमनादास द. ख.

नो. नं. ट ८९

## नोटीस

नोटीस बेशमी- गोविंदा वल्द सोन्या महार रा० करतवाडी ता० अकोट यांसः-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा भाऊ विठ्या वल्द सोन्या महार याच्याशीं माझें लग्न झालें होतें त्या नंतर मी तुमचे येथें आले परंतु तुह्मी मला वागविलें नाहीं. तुमचा भाऊ विठू हा मोठ्या काळापासून कोठें गेला आहे त्याचा पत्ता नाहीं. या करितां मी तुमची भेट घेऊन तुह्मांस त्याबद्दल हकीकत विचारली, परंतु तुह्मी त्याचा पत्ता सांगत नाहीं व मींही त्याचा तपास केला असतां, तपास लागत नाहीं. सबब तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून तो कोठें गेला आहे व त्याचा समाचार काय आहे, हें १९ दिवसांचे आंत कळवावें. न कळविल्यास मी हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन. मग त्याचा कांहीं हक्क चालणार नाहीं. हें ह्या नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. ता० ३-३ १० इ०

सही
रुखी मर्द विठ्या महार निशाणी
खुद्द बांगडी. रा० आगासखेड
ता० अकोट.

नो. नं ट ८६

## जाहीर नोटीस

सर्वत्र सावकार व इतर लोकांस खालीं सही करणार इजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा नवरा विठू वल्द सोन्या महार हा मोठ्या काळापासून कोठें नाहींसा झाला आहे, त्याचा पत्ता नाहीं. मी शाहणी झाले आहे. व आपले चुलत्याचे घरीं मोलमजुरी करून पोट भरते. आतां मी पंधरा दिवसांत गंधर्व करणार आहे. जर माझ्या नवऱ्याचा पत्ता कोणास असल्यास त्यानें १९ दिवसांचे आंत मला कळवावें कळावें. हें ह्या जाहिर नोटिशीनें कळविलें आहे. तारीख ३-३-१०-

सही
रुखा मर्द विठू महार रा. आगासखेड नि. खुद्द हातची असे

नो. नं. ट ८७

## वर्तमानसार.

ना० मुधोळकर हे पुढील आशयाचे दोन ठराव कौन्सिलपुढें आणणार आहेत. ( १ ) हिंदुस्थानांतील इतर प्रांतांना असलेले प्रातिनिधिक संस्थांचे हक्क वऱ्हाड प्रांताही मिळावे व त्या त्या प्रांताकरितां जे कायदे करावयाचे ते एक्झिक्युटिव अधिकाऱ्यांनीं न करतां कायदे कौन्सिलकडून करण्यांत यावे व [ २ ] हल्लीं अस्तित्वांत असलेल्या शाळांतून जें धंदेशिक्षण मिळण्याची सोय नाहीं असें व्यवहारोपयोगी सर्व तऱ्हेचें धंदेशिक्षण देण्यासाठीं मुंबईस किंवा दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं नवीन शाळा स्थापन करावी व रेल्वेकडील इंजिनीयर, खाणींतील इंजिनियर, आगबोटीवरील इंजिनिअर इत्यादि सर्व प्रकारच्या इंजिनियरिंग कामांचें व इतर धंदेकामाचें शिक्षण या शाळांत देण्यांत यावें. हे ठराव बहुधा या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यांत कौन्सिलपुढें येतील. व इरिगेशन [ पाटबंधारे ] च्या कामास दिलेली मदत वाढवून ती २ कोटी रुपयांची करावी व या ज्यादा रकमेची भरती रेल्वेकडील बजेटांतुन करावी असा ठराव ना० दादाभाई आणणार आहेत.

तुर्की पद्धतीचें लष्करी शिक्षण आपल्या सैन्यास देण्याचा अमीराचा विचार असून त्यानें तुर्की लष्करी शिक्षक हळू हळू वाढविण्याचा उपक्रम सुरू केला आहे. जलालाबाद व धक्का यांचे दरम्यान पक्की सडक बांधण्याचें काम चालू असून हजारों मजूर त्या कामावर लावण्यांत आलेले आहेत. घोडेस्वार पलटणींत असलेल्या घोड्यांच्या शेपटी व आयाळ लांब न ठेवतां तीं कातरून आंखूड ठेवण्याविषयीं अमीरानें हुकूम केला असल्याचें समजतें. पेशावर येथें अशी बातमी आहे कीं, राशियन झार पॉल याच्याप्रमाणें अमिरानें आपल्या सर्व दरबारी लोकांस लांब लांब दाढ्या काढून टाकण्याविषयीं फर्माविलें आहे व त्या मुळें मुल्लांचा अमीरावर बराच गुस्सा झाला आहे. ही बातमी खरी कीं खोटी हें कळत नाहीं.

प्रधानमंडळानें बजेट पास करण्याचा प्रश्न दिरंगाईवर टाकल्यामुळें ज्या कांहीं भानगडी उद्भवल्या आहेत, त्या सार्वत्रिक चर्चेचा विषय होऊन राहिल्या आहेत. भानगडी उपस्थित करण्याची जबाबदारी विरोधि पक्ष एकमेकांवर कोलवीत आहेत. पहिल्या बजेटाचें लोढणें गळ्यांतून काढून टाकण्यास प्रधानमंडळाला खाशी संधि सांपडली आहे व स्वतःच्या पक्षाच्या हितापेक्षां राष्ट्रीय हितास प्रधानमंडळ गौणस्थान देत आहे असे आरोप कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष प्रधानमंडळावर करीत आहे. चालू सालचें व पुढील सालचें अशीं दोन्हीं बजेटें अखेर एकत्र करण्यांत येतील असें लिबरल पक्षाचीं पत्रें ध्वनित करीत आहेत. मागीदारांच्या नफ्यांतून कापलेली प्राप्तीवरील कराची रक्कम, तो कर अद्याप मंजूर न झाल्यामुळें, सरकारी तिजोरींत न भरतां सरकारास उसनवार दिल्यानें बँकांचा फायदा होत आहे असें कांहींचे ह्मणणें आहे.

झाडखीच्या चीफ जज रा. बा. पंडित राधाकिसन कौल यांची याच संस्थानच्या गव्हर्नराच्या जागीं नेमणूक करण्यांत आली आहे.

हायकोर्टमध्यें तीन राजकीय दरोड्यांची चौकशी चालणार आहे. ता. १४ रोजीं नागला येथील दरवड्याची खटल्याची चौकशी सुरू होईल. त्या वेळीं न्या. वुडरॉफ, न्या. होल्मवुड आणि न्या. चतरजी यांचें ट्रिब्यूनल बसावयाचें आहे. चीफ जस्टिस बसणार नाहींत. सरकार तर्फे ॲडव्होकेट जनरल आणि मि. अपकॉट हे काम चालवितील. आरोपीचे मि. जे. रॉय हे वकील आहेत.

येत्या वरिष्ठ कौन्सिलच्या बैठकींत ना. भिटनवीस हे स्वदेशी साखरेच्या धंद्यास उत्तेजन मिळण्याकरितां पेट्रोलियमबद्दल परदेशी साखरेवर जकात बसविण्यांत यावी ह्मणून एक ठराव आणणार आहेत.

बेंटिक स्ट्रीट मधील एन. डी. सरकार या दुकानदारानें स्वदेशी ह्मणून विलायती 'लेदर बॅग' विकल्याबद्दल त्याजवर राजा प्यारी मोहन मुकरजी यांचे चिरंजीव कुमार राजेंद्रनाथ मुकरजी यांनीं पोलीस कोर्टांत फिर्याद मांडली आहे.

उत्तर अमेरिकेंतील ओहिओ प्रांतांत बर्फ वितळून महापूर आला आहे. क्लिव्हलंडमध्यें शेकडों घरें वाहून गेलीं आहेत. पुष्कळ गिरण्या बंद करण्याची वेळ आली आहे. या पुरांत लाखों डालरांचें नुकसान झालें आहे. न्यूयार्क शहराच्या उत्तर भागांतही पूर आला आहे हडसन नदीचें पाणी एका तासांत ८ इंचांनीं अधिक झालें.

मि. श्यामजी कृष्णवर्मा यांनीं इंडिया हौस विक्रीस काढलें आहे.

दरवड्यांत सामील असलेल्या एका बंगाली कैद्यानें अत्यंत महत्वाच्या कांहीं गुप्त गोष्टी अलीपूर मॅजिस्ट्रेटास सांगितल्या आहेत. त्या इसमाचें नांव, तो ज्यांत सामील झाला होता तो गुन्हा व त्यानें फोडलेल्या गुप्त गोष्टी हें सर्व तूर्त अगदीं गुप्त ठेवण्यांत आलें आहे. या इसमास माफीचा साक्षीदार केला असल्याचें समजतें. नरेंद्र गोसावी याजप्रमाणें यालाही या गुप्त स्फोटाबद्दल कदाचित्‌ प्राणास मुकावें लागेल या भीतीनें त्यास फोर्ट विल्यम किल्ल्यांत ग्रॅनरी बॅरकमध्यें खूप बंदोबस्तांत ठेवण्यांत आलें आहे, अशा आशयाची बातमी इंडियन डेली न्यूज पत्रानें प्रसिद्ध केली आहे.

ता० २४ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं हौरा म्युनिसिपालिटीचे असेसर मि० हॅले हे ॲव्हिन्यूरोडवर मि० मॅकेंझी यांचेबरोबर बोलत उभे राहिले असतां एका बंगाली तरुणानें बायसिकल वरून रस्त्यानें जातां जातां मि० हॅले यांच्यावर आपलें पिस्तुल रोंखून गोळी झाडली, व बायसिकल खूप झपाट्यानें चालवून पार नाहींसा झाला. पिस्तुलाचा नेम चुकून मि० हॅले यांचेपासून दोन फुटांचे अंतरावर ती गोळी पडली व एकदम धुरळ्याचा लोटच्या लोट उठला. त्या मुलाचा पत्ता लागला नाहीं.

वऱ्हाडसमाचार.

माघ वद्य ११ शके १८३१

## नुसत्या दडपादडपीनें काय होणार ?

—:०:※:०:—

राजद्रोह आणि अराजक चळवळी यांचें निर्मूलन करण्यासाठीं उपाय ह्मणून झालेल्या कायद्यांच्या मालिकेंतील शेवटचा बूरा मुद्रण व प्रकाशनासंबंधाच्या नव्या कायद्याच्या रूपानें बसविला गेला आहे. या चळवळींचीं पाळेंमुळें बायकामुलांपर्यंत देखील जाऊन पोहोंचलीं आहेत असा समज सर हर्बर्ट रिस्ले यांच्या सारख्या बड्या अधिकाऱ्यांनीं करून घेतला आहे. पण तो सर्वथा खरा नाहीं असें अनेक सूज्ञ पत्रकर्त्यांनीं सिद्ध केलें आहे. सुशिक्षित वर्गांतील बहुतेक लोक ब्रिटिश सरकारविषयीं जाणून बुजून द्वेष किंवा अप्रीति उत्पन्न करण्यासारख्या राजद्रोही प्रकारांपासून अलिप्त आहेत हें पुनः एकवार सरकारचे नजरेस आणणें हें आमचें कर्तव्य आहे असें आह्मी समजतों. अराजक उद्योगांत फारच थोडे लोक गुंतलेले असल्याचें आढळून आलें आहे आणि हे लोक हिंदी समाजाच्या परंपरागत धर्म व नीतिशास्त्र यांना पराङ्मुख झालेले आहेत. त्यांच्या अमानुष आणि आततायीपणाच्या कृत्यांमुळें सर्व समाजाच्या अंगावर कांटा उभा राहिला असून सर्वांचीं तोंडे लाजेनें काळवंडलीं आहेत. राजद्रोहीपणाचा किंवा अराजकपणाचा आरोप सर्व राष्ट्रावर बेलाशक लादण्यांत येत आहे, तरी त्यांत कांहीं तथ्य नाहीं. या आरोपांतील सत्यता आमच्या प्रत्ययास येत नाहीं. आणि ह्मणून त्याला जबाब देण्याचीही आह्माला जरूर दिसत नाहीं. तथापि याच ठिकाणीं येवढें मात्र निक्षून सांगणें जरूर आहे कीं देशांत सर्वत्र असमाधान मात्र पूर्णपणें भरलेलें आहे. या असमाधानाला परिस्फुटता देण्याचे शक्य तितके न्याय्य मार्ग शोधून काढण्याकडे अव्याहत प्रवृत्ति आहे या वरूनच हें असमाधान कायद्याला घाब्यावर बसविण्यास सांगणाऱ्या राजद्रोहापासून निराळें आहे हें सिद्ध होतें. ब्रिटिश अमलाखालीं शंभर वर्षें गेलीं, देशाच्या चारित्र्याची पुनर्घटना होतांना ब्रिटिश विचार व आचार यांतील जें जें उत्तम ठरलेलें आहे त्याशीं दीर्घकाल संगति झाली, पारतंत्र्याच्या जड जोखडाखालून आपली मान सोडवून घेऊन स्वातंत्र्याच्या श्रेयस्कर मार्गानें चालू इच्छिणाऱ्या ब्रिटिश समाजाचा इतिहास अवगत झाला, सर्व जगांतील स्वतंत्र राजकीय संस्थानांना आदर्श होऊन राहिलेल्या ब्रिटिश पार्लमेंटच्या प्रत्यक्ष अधिकार कक्षेत हिंदुस्थानची राज्यव्यवस्था गेली, ज्याचे सर्व घटक कमीजास्त मानानें स्वसत्ताक राज्यकारभाराचा हक्क उपभोगीत आहेत अशा महान साम्राज्याचें घटकाव

प्राप्त झालें, हिंदुस्थानाला स्वसत्ताक आणी प्रातिनिधिक स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेंत तयार करणें हेंच ब्रिटिश सरकारचें हिंदुस्थानांतील अंतिम कार्य आहे अशी भाषा वारंवार ऐकूं येऊं लागली, प्राचीन वैभवाच्या चिंतनानें भावी काळाविषयींची आशा प्रदीप्त झाली, आशिया खंडांतील ज्या राष्ट्रांनीं स्वसत्ताक प्रातिनिधिक स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेनें आपली उन्नति करून घेतली त्यांच्याहून आपण बुद्धीनें कमी नाहीं असा भरंवसा प्रत्ययास येऊं लागला, या सर्व कारणांमुळें आपल्या राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेवर आपला कांहीं तरी दाब रहावा अशी इच्छा सर्व सुशिक्षित समाजाच्या मनांत उत्पन्न झाली. साम्राज्यांत राहून स्वराज्य चालविणाऱ्या संस्थानांच्या बरोबरीला येण्याच्या आकांक्षेची पहिली पायरी ह्मणून ही इच्छा प्रदीप्त झाली. त्याशी व्हाइसरॉय साहेबांनीं जातिभेदाचें निष्कारण खुसपट काढून साम्राज्यांत हिंदुस्थानचा दर्जा सदैव खालचा रहावा अशी खटपट केली आणि उद्योन्मुख हिंदी राष्ट्रीयत्वांतील जोम गर्भांतच चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. साम्राज्याच्या दरबारांत हिंदी लोकांच्या सल्लेला मान मिळावयाचा नाहीं हें लोकांच्या अनुभवास आणून देण्यासाठींच कीं काय सर्व राष्ट्राच्या तक्रारीला न जुमानतां बंगालची फाळणी केली आणि वऱ्हाड मध्यप्रांताला कायमचा जोडला. इंग्लंडनें हिंदुस्थानांत काय कार्य करावयाचें योजलें आहे या विषयीं या वेळच्या इतकी पूर्ण निराशा, संशय आणि उद्वेग कधींही उत्पन्न झाला नव्हता. पण लॉर्ड मोर्ले हे स्टेट सेक्रेटरीच्या स्थानावर आरूढ झाल्यापासून आशेच्या करपलेल्या वृक्षाला पुनः अंकुर फुटला. आतां पूर्वीचा निराशेचा काळ गेला असें वाटून तिकडे उत्सुकता उत्पन्न झाली पण बंगभंगाच्या प्रश्नावर त्यांनीं पुरवातीसच हिंदी लोकमताला फटका मारल्यामुळें त्या औत्सुक्यांतील अंधश्रद्धा नाहींशी झाली. बंगभंग झाला चूक झाली खरी पण आतां ती होऊन गेली ती आतां वज्रलेप मानणें असें लॉर्ड मोर्ले यांनीं सांगितलें. वज्रलेप झालेल्या गोष्टी बदलेल्याचीं उदाहरणें मात्र त्याच वेळेस घडत होतीं. इंग्लंडांतील शिक्षणक्रम आणि तत्संबंधीं व्यवस्था किती तरी जुन्या काळापासून ठरलेली होती. पण लार्ड मोर्ले हे ज्या पक्षाचे आधारस्तंभ आहेत तो पक्ष अधिकारारूढ होतांच त्यांनीं ती व्यवस्था बदलून सुधारणा करण्याचें काम प्रथम हातीं घेतलें. पूर्वींची व्यवस्था गैर होती हें दिसून येतांच तींत सुधारणा करण्याला सुरवात करावी ह्मणजे राजकारण आणि न्याय यांचा निकट संबंध असावा हें मोर्लेकृत सूत्र इंग्लंडच्या बाबतींतच अमलांत आणावयाचें आणि हिंदुस्थानाशीं त्याचा संबंध येऊं द्यावयाचा नाहीं हें किती विचित्र आहे! स्वसत्ताक राज्यव्यवस्था किंवा एकाच शब्दांत ह्मणावयाचें तर स्वराज्य हें प्राप्त व्हावें अशी इच्छा हिंदुस्थानांतील सर्व सुशिक्षित वर्गाचे मनांत सारखी घोळत आहे हें कोणाही इंग्लिश मनुष्याला अगदीं थोड्याशा प्रयत्नानें सुद्धां समजून येणार आहे. त्याच प्रमाणें राज्य-

कारभार चालविण्याला लायक असे तरबेज गृहस्थ आमच्यांत नाहींत ही गोष्टही तिळमात्र खरी आहे. पण नेटिव्ह मनुष्य बुद्धीनें किंवा कर्तबगारीनें कितीही श्रेष्ठ ठरो त्यानें सहा हजार कोसांची यात्रा केली नसेल तर त्याला अधिकाराच्या मोठ्या जागेवर हक्कानें चढतां येत नाहीं. परीक्षेचें ठिकाण संनिध आहे येवढ्याच कारणावरून श्रेष्ठपणाचा शिक्का घेऊन आलेल्यांच्या पेक्षां देशी कामगार जास्त लायख असूं शकेल किंवा नाहीं याचा विचार करतो कोण? आणि जरी विचार केला तरी तो आचारांत येतो कसचा! सिव्हिल सर्व्हिस परीक्षा इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानांत एकाच वेळीं घेतली जावी असा हाउस ऑफ कॉमन्सनें ठराव केला आहे पण तो अमलांत आणण्याला आणखी जें काय करणें आवश्यक असेल तें झाल्याचा बनाव अगर न झाल्याचीं कारणें देण्यास कोण तयार आहे? इंडिया कौन्सिलांत आणि हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलांत देशी गृहस्थांची नेमणूक करून जातीला दिला जात असलेला मक्ता अजिबात ढासळून पडला आहे. या दोन जाग्यांवर देशी गृहस्थांची नेमणूक केल्यानें दीर्घकाल भासत असलेली एक उणीव दूर झाली आहे इतकेंच नव्हे तर केवळ वहिवाटीमुळें होऊं पहात असलेला एक अन्याय्य हक्क नाशाबीत ठरला गेला आहे. पण या नेमणुका ह्मणजे ब्रिटिश समाजाच्या उदार तत्वांना व्यावहारिक स्वरूप मिळाल्यास कितपत मिळेल याची चांचणी आहे. दोन जागा मुळें सर्व हिंदी समाजास आपल्याला आपल्या राष्ट्राच्या कारभारांत भरपूर वाव आहे असें दिसून येणार नाहीं. सुशिक्षित आणि राष्ट्राच्या स्वास्थ्याची काळजी वहाणारे लोक राज्यकारभाराच्या कामीं सल्ला देण्यास योग्य मानून त्यांचा कायदे कौन्सिलांत जास्त समावेश केला गेला ही गोष्ट न्याय्यच झाली. त्या बरोबरच प्रत्यक्ष कारभारांत देशी लोकांचा प्रवेश अडथळा आल्यावांचून कर्तबगारीनुरूप सर्व दर्जांत कसा करतां येईल याचा विचार झाला पाहिजे होता. लोकांचा राज्यकारभारांत प्रवेश करावयाचा तो बाहेरून आणि आंतून दोन्ही बाजूंनीं झाला पाहिजे हा प्रवेश पूर्ण होणें हेंच आमचे तूर्तचें उद्दिष्ट आहे. आह्माला आमच्या देशाच्या कारभाराचें शिक्षण फाजील खर्चावांचून मिळावें आणि आमचा कारभार आह्मी करण्याच्या अधिकाराचा अनन्योपभोग आमचेकडे असावा ही सर्व सुशिक्षित वर्गाची इच्छा आहे. अराजकता आणि राजद्रोह या दुष्ट मार्गांशीं तिचा कांहींही संबंध नाहीं. पण राष्ट्राच्या स्थैर्यासाठीं या इच्छेचा शक्य त्या त्या प्रसंगीं अनुकूलच विचार झाला पाहिजे. आमचीं तीन माणसें 'सरकारांत' आहेत. शेदोनशेंना सरकारपुढें मनमुराद बोलण्याचा हक्क मिळाला आहे. पण सरकारी क्षेत्राच्या व कक्षेच्या बाहेर फार मोठा समाज आहे. त्या सर्वांचा समावेश 'सरकार' या लहानशा पदांत व्हावा हीच त्यांची इच्छा आहे.

---

## ग्रंथपरीक्षण.

### मराठी भाषेचे संप्रदाय व ह्मणी.

--:*:-:+:-*:--

मराठी भाषेच्या संपन्नतेची साक्ष पटविण्याकरितांच कीं काय 'महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या' एका चिटणिसांनीं तींतील संप्रदाय व ह्मणी यांचा एक संग्राह्य कोश नुकताच प्रसिद्ध केला आहे. मराठी भाषेचा मोठा कोश केव्हां पूर्ण होईल तो होवो पण परिषदेच्या चिटणिसांनीं त्या कोशाचे भाग ठरवून त्यांपैकीं होतील तितके तावडतोब तयार करविण्यांत जी तत्परता दाखविली आहे ती प्रशंसनीय आहे. शास्त्रीय परिभाषेचे ग्रंथहि लवकरच प्रसिद्ध होतील अशी आशा आहे. मराठींत तीनशें पानें भरतील इतके व्यापक अथवा निश्चित अर्थाचे शब्दसमूह आहे आणि समाजाच्या दीर्घ कालाच्या कारकीर्दींत कोठें तरी, केव्हां तरी घडून आलेले प्रसंग चार दोन शब्दांत पुनः डोळ्यासमोर उभे करण्याचें सामर्थ्य व जीवंतपणा त्या भाषेंत आहे ही पुष्कळ सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांना कल्पनाहि नसेल! मॅकमोर्डीचीं किंवा डॉ. ब्रुअरचीं चोपडीं घोटतांना सुद्धां इंग्लिश भाषेच्या विशालत्वाच्या कल्पनेनें ज्यांची छाती फाटून जावी त्यांना रा. वासुदेव गोविंद आपटे यांचा हा मराठींतील संप्रदाय व ह्मणींवरील सुमारें तीनशें पानांचा पहिला हप्ता स्तंभितच करील. मराठींत कसचे संप्रदाय व कसल्या ह्मणी असावयाच्या आहेत, असा तिरस्कारयुक्त प्रश्न करूं इच्छिणारांनीं या पुस्तकांतील दोन हजारपैकीं पांच पंचवीस संप्रदायांचा उगम व त्यांचें स्पष्टीकरण स्वतःच्या बुद्धीनें ठरविण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांस आमची सूचना आहे. संप्रदाय हे भाषेची परंपरा व तिचीं रूपांतरें दाखवीत असतात. भाषेच्या इतिहासमार्गावरील ते खांब होत. त्यांना वाट पुसत गेल्यास कालाच्या अनंत उदरांत क्रमाक्रमानें प्रवेश होऊन तदनुरोधानें असलेल्या समाजस्थितीचें ज्ञान होतें. संप्रदायांचे उगम व त्यांचे रूढ अर्थ ठरविण्याच्या कामीं रा. आपटे यांनीं शक्य तितकी खबरदारी घेतलेली दिसत आहे. बहुधा संप्रदायाची मान्यता मान्यवर ग्रंथकारांच्या लेखांतून वेंचे घेऊन सिद्ध केली आहे. हें पुस्तक विशेषतः विद्यार्थ्यांच्या उपयोगी असल्यामुळें त्यांच्या गरजा भागविण्यांचीहि खबरदारी घेतलेली दिसते. पण ती सर्वत्र सारखीच घेतली गेली असती तर पुस्तक परीपूर्ण झालें असतें असें आह्मांस वाटतें. त्याचप्रमाणें छापतांना पुस्तकाचा शिक्षणक्रमांतील उपयोग जास्त ध्यानांत राहिला तर जे छपाईचे दोष राहिले आहेत तेहि राहिले नसते. याच नमुन्याचें आणखी एक पुस्तक लवकरच एका विद्वान् मराठी ग्रंथकाराच्या हातून तयार होऊन बाहेर पडणार आहे असें समजतें. थोड्याच अंतरानें एकाच विषयावर दोन पुस्तकें तयार होत आहेत या वरूनच विषयाचें महत्व निदान शिक्षकांना तरी उमजलें व जाणवलें आहे असें दिसतें. रा. आपटे यांचें पुस्तक तयार होण्याचे कामीं त्यांना पुण्यांतील नूतन मराठी विद्यालयासारख्या एका मोठ्या शिक्षणसंस्थेंतील विद्वान शिक्षकांची मदत झालेली आहे हें त्या संस्थेला भूषणावह आहे. अशीच मदत महाराष्ट्र सारस्वताच्या निदान पुण्यांतील विद्यमान पुरस्कर्त्यांकडून चर्चेच्या रूपानें झाली असें ऐकण्याचा सुयोग आला असता तर आह्माला या पेक्षांहि जास्त आनंद झाला असता. पुस्तकाच्या महत्वाच्या व आकाराच्या मानानें एक रुपया ही किंमत वाजवी आहे.

---

## हिंदुस्थानांतून जाणारा द्रव्यौघ.

--:*:-:*:--

लंडन येथील स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स या नांवाच्या अर्थशास्त्र व व्यवहारशास्त्र शिकविण्याच्या पाठशाळेंत यंदा हिंदी विद्यार्थ्यांकरितां विशेष शिक्षण देण्याची व्यवस्था सुरू झालेली आहे. या शिक्षणक्रमांत हिंदुस्थानविषयक प्रश्नांचा मुख्यत्वें-करून समावेश केलेला आहे. अलीगड येथील मुसलमानी कालेजचे माजी प्रिन्सिपाल व सध्यां इंडिया कौन्सिलचे सभासद असलेले सर थिओडोर मॉरिसन हे या पाठशाळेंतील एक अध्यापक आहेत. त्यांनीं यंदां एक बराच वादग्रस्त असलेला विषय घेतला असून त्या वरील आपलीं व्याख्यानें नुकतीच समाप्त केलीं. हिंदुस्थानांतून इंग्लंडकडे जाणारा द्रव्यौघ हा त्यांचा विषय होता. आपल्या मताचें समर्थन त्यांनीं मोठ्या कुशलतेनें करून असें प्रतिपादन केलें आहे कीं हिंदुस्थान स्वराज्य उपभोगीत असतां त्याची कर्जासंबंधानें जशी स्थिति झाली असती तीपेक्षां सध्यां जास्त चांगली आहे. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं दरवर्षी परराष्ट्रांशीं झालेल्या व्यवहाराची तोंडामिळवणी करतांना जर देणें जास्त जास्त रहात जातें अशी वस्तुस्थिति आहे तर परदेशास जास्त द्रव्य रवाना झालें पाहिजे पण तसें वास्तविक होत नाहीं. उलटपक्षीं जितक्या किंमतीचें सोनें-रुपें हिंदुस्थानांतून बाहेर जातें त्याच्यापेक्षां आयातच जास्त किंमतीची होते. आणि हिंदुस्थानांत हुंडणावळीचा भाव स्थिर असतो यावरून त्याच्या जमाखर्चाची बरोबर तोंडमिळवणी होत आहे यांत शंका नाहीं. हिंदुस्थानची निर्यात आयातीपेक्षां पावणेदोन कोटींनीं जास्त आहे. ही वाढ व्यापारविषयक मालाशिवाय दुसऱ्या कशाबद्दल तरी रक्कम भरावी लागल्यामुळें होत आहे हें त्यांना कबूल आहे; पण सर मॉरिसन ह्मणतात, जीं जीं राष्ट्रें आपल्या प्राप्तीचीं साधनें व मार्ग वाढवीत असतात त्यांचें निर्यात जास्त असणें हें लक्षणच आहे. या विधानाला त्यांनीं रशिया, अमेरिका, न्यूझीलंड इत्यादींचीं उदाहरणें दिलीं आहेत. पण हें नुसतें विधान आहे, खुलासा नव्हे. या विधानाचा खुलासा त्यांच्या व्याख्यानांत पुढें एके ठिकाणीं असा केलेला सांपडतो कीं ज्या राष्ट्रांची निर्यात जास्त असते अशा कित्येक राष्ट्रांनीं विसाव्या शतकांत देखील आपल्या औद्योगिक व्यवस्थेचें स्वरूप जुनेंपुराणेंच ठेवलें आहे आणि त्यां पैकींच हिंदुस्थान हा एक देश आहे. हीं राष्ट्रें आपल्या जुनाट स्थितीचा त्याग करून नुकतीच नव्या स्वरूपाचा स्वीकार करूं लागलेलीं आहेत. दुसरा खुलासा असा आहे कीं हिंदुस्थान आपल्या प्राप्तीचीं साधनें व मार्ग नुकतेंच वाढवूं लागलें असल्यामुळें या उद्योगांना लागणारें भांडवल युरोपांतून आणवून आयातीच्या वाढीच्या रूपानें त्याचें व्याज देत असतें ह्मणजे सर मॉरिसन यांचें ह्मणणें असें आहे कीं हिंदुस्थानाला आपल्या कायमच्या फायद्यासाठीं परदेशांत व्याजाच्या रूपानें पैसा भरणें भाग पडतें. प्राप्तीचीं साधनें सुधारलीं तर त्यांत हिंदुस्थानाचाच फायदा आहे. सारांश परराष्ट्रांना व्याज द्यावें लागतें येवढाच कायतो तोटा बाकीचा सर्व हिंदुस्थानचा फायदाच आहे असें मॉरिसन साहेबांनीं आपल्या हिंदी शिष्यांस शिकविलें आहे.

---

पण या प्रश्नाला दुसरी बाजू आहे. या दुसऱ्या बाजूकडे कानाडोळा करून एकतर्फी दृष्टीनें या विषयाकडे पहावयास मुद्दाम विलायतेस गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना सर मॉरिसन यांनीं शिकविलें हें अगदीं गैर झालें. त्यांनीं आपल्या विधानाच्या पुष्टी करणार्थ रेल्वे व पाटबंधारे हीं उदाहरणें घेतलीं होतीं. या दोन्ही प्रकारच्या कामांची उपयुक्तता त्यांजपासून वसूल होणाऱ्या ऐन उत्पन्नाच्या प्रमाणावरूनच ठरविणें रास्त नाहीं. पण अशा सर्व बाबतींत फक्त भांडवलाचें व्याजच द्यावें लागतें किंवा त्याहून आणखी कांहीं देणें भाग पडतें हा प्रश्न आहेच. सरकारनें घेतलेल्या कर्जाचाच मॉरिसन साहेबांनीं उल्लेख केला आहे. पण त्या शिवाय खाजगी लोकांनीं इकडील उत्पन्नाच्या साधनांचा फायदा करून घेण्यासाठीं आणलेलें परदेशांतील भांडवल आहेच. या सर्व व्यापारव्यवहारावर होणारा फायदा देशांतच रहात नाहीं. त्या कामांवर नेमलेल्या नौकर लोकांचे पगार देखील इकडे रहात नाहींत. आगगाड्यांकरितां लागणारें सामान व यंत्र परदेशांतून येतात. वरचेवरचे कामगार देखील बाहेरून येतात. नफा परदेशांतच जातो भांडवल इकडे आणणारे लोक सुद्धां इकडचे नव्हेत. या बाबतींत मॉरिसन साहेबांनीं दिलेलें रशियाचें उदाहरण अगदींच भ्रामक आहे. कारण त्या देशांत व त्याच्याच वर्गांतील इतर देशांतील लोक स्वतः परदेशांतून भांडवल आणवून व्यापार-उदीम करतात. त्यांना त्यावरच फक्त व्याज भरावें लागतें. हे लोक आपल्या देशांत एखादा धंदा उद्योग सुरू करतांना अगदीं निरुपायाशिवाय परदेशीय कामगार नेमीत नाहींत. त्याच प्रमाणें त्यांनीं चालू केलेल्या उद्योगावरील नफा बाहेर देशीं जात नाहीं. ह्मणजे परदेशांतून हलक्या व्याजावर भांडवल आणल्यानें त्यांचा जास्तच फायदा होतो. ते जसजसे भांडवल आणतील तसतसा त्यांचा नफा वाढत जाऊन त्यांचा द्रव्यसंग्रह फुगत जातो. त्यांना होणाऱ्या नफ्यापुढें त्यांना द्यावें लागणारें व्याज कांहींच नसतें. हिंदुस्थानांतील लोक परदेशांतून भांडवल कर्जाऊ आणीत नाहींत. किंवा परकी भांडवलाचा आपल्या धंद्याला

उपयोग करून घेत नाहींत. जर ते तसें करीत असते तर मॉरिसन साहेबांचें ह्मणणें रास्त झालें असतें. या बाबतींत त्यांचें प्रतिपादन अगदींच विचित्र आहे. देशांतील सर्व जमीन सरकारची आहे हें ह्मणणें एकवेळ चालेल. कारण त्या जमिनीवर सरकारची हुकमत चालते. पण व्यापार उदीमाच्या बाबतींत परकी भांडवलवाल्यांवर व व्यापाऱ्यांवर सरकारची हुकमत चालत नाहीं आणि त्या संबंधींची जबाबदारीहि सरकार आपल्या शिरावर घेत नाहीं. त्या मुळें हिंदुस्थानच्या लोकांना मुळींच जबाबदार नाहींत अशा लोकांच्या हातांत हिंदुस्थानची नाडी आहे.

——०——

हिंदुस्थानचा इंग्लंडशीं जो राजकीय संबंध आहे त्यामुळें जो पैसा द्यावा लागतो त्यांच्या विषयींही मॉरिसन साहेबांनीं असाच एकपक्षीय नजर ठेविली आहे. ते ह्मणाले हिंदुस्थान स्वराज्य उपभोगीत असतें तर स्वसंरक्षणाच्या बाहेर अशा प्रकारचें देणें द्यावें लागतेंना. पण कांहीं बाबतींत सध्यांच्या पेक्षां पुष्कळच जास्त किंमत भरावी लागली असती. इंग्लंडच्या पतीचा जर आश्रय नसता तर राष्ट्रीय कर्जावर फार जबर व्याज द्यावें लागलें असतें. हें त्यांचें ह्मणणें जरी खरें आहे तरी, त्यांना एका गोष्टीची विस्मृति पडली आहे. इंग्लंडच्या आरमाराच्या खर्चांत हिंदुस्थानाला पंधरा लक्षांची भरपाई करावी लागते. पण साम्राज्यांतील स्वराज्योपभोगी वसाहतींना ब्रिटनच्या आरमाराचें संरक्षण घेऊन सुद्धां खर्चासाठीं पैहि द्यावी लागत नाहीं. मॉरिसन साहेबांच्या डोक्यांत असें असावेसें वाटतें कीं, वसाहतीं प्रमाणें हिंदुस्थान स्वराज्योपभोगी असतें तर त्याला खर्चाच्या भरपाई बद्दल होणारे फायदे मिळाले नसते. पण तशी स्थिति असती तर अंतर्गत व्यवस्था करतां आली असती इतकेंच नव्हे तर मँचेस्टरवाल्यांच्या अरेरावीच्या सल्ल्या वांचून आपल्या उदीमधंद्यांची व्यवस्था चांगली करतां आली असती. आणि आपल्या स्वतःच्या दृष्टीनें आपल्या सांपत्तिक स्थितीकडे पहातां आलें असतें. देशांतील लोकांना सर्व कामें करण्याची संधी मिळाल्यानें तोंच मोठा फायदा सांपत्तिक व नैतिक दृष्टीनें झाला असता. हिंदुस्थानांत राहून काम शिकून तयार झालेले मुलकी व लष्करी अंमलदार आपली पेन्शनें आणि आपला अनुभव घेऊन येथून निघून जातात हा हिंदुस्थानचा तोटा नव्हे काय? सर थिओडोर मॉरिसन यांनीं जो मार्ग योजून ठेवला होता त्यानें जाऊन त्यांना आपलें प्रतिपादन खरें करून दाखवितां आलें नाहीं हें उघड आहे.

## पुण्यसंदेश

( हनुमानगड-वर्धा )

गेल्या शनिवारीं वर्ध्येच्या हनुमानगडावर दासनवमीच्या महोत्सव झाला. येथें श्रीसूर्यदेव मठ व श्री राणुदेवी मठ अशा दोन अनुक्रमें पुरुषांच्या व स्त्रियांच्या रामदासी संप्रदायाच्या शाखा आहेत. सदर्हू प्रसंगीं त्यांमधील स्त्रीपुरुषांचें एक मोठें संमेलन भरलें होतें. या समाजाचे चालक श्रीरामदासानुदास रा. रा. श्रीधर विष्णु परांजपे बी. ए. व त्यांच्या पत्नी श्री. सौ० लक्ष्मीबाई अशी उभयतां दम्पती आहेत. सुमारें पांचशेंहून अधिक स्त्रीपुरुष या समारंभाला जमले होते. सुमारें सात वर्षीच्याच कालांत ही संस्था इतकी भरभराटीला आली आहे कीं बडोदें, मुंबई, पुणें, मध्यप्रांत वऱ्हाड इत्यादि भागा मधून शेंकडों लोक आपलें आयुष्यक्रम बदलून या महोत्सवाला जमतात हें कांहीं सामान्य नाहीं. आणि ह्मणूनच ही पुण्यमार्ग—प्रवर्तिनी संस्था विभूतिमान, श्रीमान व ऊर्जित आहे असें आह्मी समजतों.

या महोत्सवाच्या प्रसंगानें शके १८३१ चा पुण्यसंदेश ह्मणून एक मराठी व हिंदी उद्देशपत्रिका प्रसिद्ध केली असून तिच्याच संबंधानें रामदासानुदासांनीं आपल्या पत्नीसमवेत शनिवारीं दोन प्रहरीं सुंदर कीर्तन केलें. हें कीर्तन फारच उत्कृष्ट झालें. आख्यान ध्रुवाचें तपोगमन असें होतें.

प्रथमतः त्यांनीं भक्तीचें महत्व वर्णून नंतर दृढ भक्तीच्या जोरानें शास्त्र, विद्या व स्वाध्याय हीं कितीहि बिकट व कष्टसाध्य असलीं तरी तीं कशीं सुगम व सुलभ होतात असें निदर्शनास आणण्यासाठीं ते ध्रुवाख्यानाकडे वळले. या गोष्टीवरच त्यांनीं आपला पुण्यसंदेश रचला होता. ध्रुवाला पित्याच्या अंकावर बसूं न देतां त्याची सापत्न माता सुरुची इनें त्याला हिसडा करून संतांच्या उदरीं जन्मास ये असा केलेला उपदेश श्रोतृगण जागृत निरनिराळ्या पद्धतीनें मांडून त्याचा संदर्भ हल्लींच्या राजकीय स्थितीशीं फार समर्पकपणें कीर्तनकारांनीं जोडून दिला. आंग्लो—सॅक्सन जातीनेंच राज्य करावें असा सध्यां ईश्वरी संकेत दिसतो तेव्हां आपल्याला राज्य नाहीं ह्मणून लोकांनीं वृथा शोक करूं नये. आपल्या कर्मा प्रमाणें आपल्याला ही स्थिति संप्राप्त आहे आणि बुद्धीच्या सूक्ष्म निरीक्षणानें तिचाच यथायोग्य सर्वत्र उपयोग करून तिच्याच द्वारानें किंबहुना तिच्याच पायावर भावी उत्क्रांतीचें कार्य साधून घेतलें पाहिजे. ह्मणजे आधिभौतिक संपदा आपोआप आपल्या घरीं चालून येतील, पण तसें होण्या साठीं ध्रुवाची माता जी सुनीती तिनें आर्यमाता ह्मणून आपल्या पुत्रास जो उपदेश केला आहे तो अक्षरशः सर्व हिंदी आपल्या विचारांत भाषणांत व कृतींत पूर्णपणें उतरविला पाहिजे. ईश्वरी राज्यांत भेदाभेद नाहींत. सर्व सृष्टी राममय आहे तेव्हां आपला देश ह्मणजे सर्व सृष्टी होय. सर्वत्र या ईश्वरी प्राणीमात्रांची तशी ओळख करून देणाऱ्या ज्या भाषा त्या आपल्या मातृभाषा होत. सर्व भूतमात्राशी अद्रोह पाहिजे, विश्वबंधुत्वानें व आत्मभावानें आपण सर्वांस प्रेमांकित करण्यास शिकलें पाहिजे. द्रोहबुद्धीनें द्रोह वाढतो, कामक्रोधमत्सर बळावतात आणि राजकीय कार्याच्या मंगल मिषानें हल्लीं प्रमाणें घातपात होऊं लागतात. सुनीतीच्या वचनाप्रमाणें ध्रुव सुशील व धर्मात्मा होऊं लागल्यावर सप्तर्षी व नारद हे त्यास महा उपदेशक भेटले तसेच आपण अद्रोही, प्रेमपूर्ण व परोपकारी होऊं लागलों ह्मणजे आपली धर्मबुद्धि पाहून श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, कबीर, चोखामेळा, रोहिदास, तुलसीदास आदि सज्जन आपणांस भावी मार्गाकडे लावण्यासाठीं उभे आहेत. तेव्हां आपण या धर्मसृष्टीच्या उच्च मेरुस्थानीं जाण्यासाठीं सुशील, धर्मात्मे, व परकल्याणरत होण्यासाठीं सर्वत्र श्रीरामसम मनोभाव करणारी रामदासी उपासना दृढ चालवावी ह्मणजे हल्लींच्या राजकीय मार्गांतील द्रोहबुद्धि विलयास जाईल इतकेंच नाहीं तर ध्रुवाचे अचल पदाप्रमाणें आपलें स्वराज्य सर्व सृष्टीवर प्रसृत होईल.

शेवटीं रा. रा. श्रीधरपंत परांजपे यांनीं प्रस्थापित केलेलें हें धर्मशिक्षणाचें मंगल कार्य उत्तरोत्तर यशस्वी होवो आणि त्यांच्या शिष्यशाखा अशाच सुनीतीमान, दैवी गुणसंपन्न व मार्गसूचक होवोत असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

**विज्ञापना**— आह्मी छापखाना अंगलांत नेला आहे तरी सांसर्गिक दोषामुळें आमच्या यंत्राच्या कोठडींत प्लेगाचे मृत उंदीर आढळले ह्मणून गेले दोन अंक काढतां आले नाहींत तथापि आह्मी इतक्या लवकर पुनः वाचकांची भेट घेत अहों हीच ईश्वराची कृपा समजतों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— थंडी चांगल्या कडाक्याची पडते. ऋतुमानात फरक वाटतो आणि प्लेग खेरीज करून इतर गोष्टी सार्वजनिक आरोग्याला अनुकूल आहेत.

प्लेग— सध्यां पश्चिम वऱ्हाडांत प्लेगाचें मान मोठें आहे. या जिल्ह्यांतील आकोला व आकोट हे तालुके विशेष ग्रस्त आहेत. एकंदरीनें या जिल्ह्यांतील प्लेगाचे मृत्यु दर रोज ६० वर पडतात बुलढाणें जिल्ह्यांत हें मान सरासरीनें निम्यावर आहे. खुद्द आकोल्यास दरराजच्या मृत्यूची गणती तिसऱ्या दशकांतील आंकड्यांनीं होत असते. स्थानत्याग हाच ईश्वरी तारक उपाय आहे आणि तोच पाळतांना ईश्वराशीं लटपट चालणार नाहीं हें पक्कें ध्यानीं धरलें तरच ठीक!

लेफ० कर्नल आर. पी. कोलेब दुय्यम सेक्रेटरी निसबत चीफ कमिशनर यांस येत्या १६ व तारखेपासून तीन महिन्यांची रजा मिळाली.

लेफ. कर्नल हार्सबरो साहेब डिपुटी कमिशनर यांची बदली हुशंगाबाद येथें झाली. हे साहेब इतके लोकप्रिय व दयाळु आहेत कीं त्यांची येथील कारकीर्द लवकर संपली ह्मणून लोकांस फार वईट वाटलें.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार [illegible] आफ. डिपुटी कमिशनर नेमून येथें नेमले ही सुखाची व आनंदाची बातमी होय.

रा. रा. ई. जी. ह्यूली एक्स्ट्रा ॲसि० कमिशनर उमरावती यांस खामगांवच्या सब डिव्हिजनल अधिकारी नेमण्यांत आलें.

आणि त्यांच्या उमरावतीच्या जागीं ग. रा. मीर अनवरअल्ली यांस ए. ए. कमि. नेमण्यांत आलें.

रा. रा. वासुदेव रामचंद्र ढोबळे बी. ए. बी. एल. आदि. डिस्ट्रीक्ट जज्ज, आकोला हे आपल्या सरळ, एकमार्गी व न्यायप्रिय वर्तनानें दोनच महिन्यांत लोकांस विशेष आवडूं लागले होते पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांस तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणें भाग पडलें ह्मणून वाईट वाटतें. त्यांच्या रजेंत उमरावतीचे जुने अधिकारी खानबहादूर आर्देशर दिनशाजी चिनाय हे येथील आडि. डिस्ट्रिक्ट जजाच्या जागीं रुजूं झाले. राजश्री चिनाय साहेब हे पुष्कळ वर्षांनंतर आकोल्यास परत आले आहेत हें त्यांसच विशेष आनंदकारक वाटेल व ते येथूनच पेनशन घेतील असें वाटतें.

रा. रा. नीलकंठ गणेश सुभेदार बी. ए. बी. एल. सबजज बुलढाणा हे येत्या १९ वे तारखे पासून १ महिना १९ दिवसांच्या रजेवर जात आहेत. त्यांच्या रजेंत रा. रा. महादेव अंबादास उमरावतीकर आपल्या मुनसफ कोटाचा चार्ज ग. रा. शंकर दिवाकर फाटक एल. एल. बी. यांस देऊन स्वतः सबजजाचें काम पाहतील.

---


## विक्रीस तयार.

दारूच्या दुकानास लागणारें सर्व तऱ्हेचें सामान ( पीपे, कॉर्क, वगैरे ) विकावू आहे. ता० ६-३-१९१०

नजिरुद्दीन
अबकारी कॅन्ट्राक्टर.
मोरणा नदीजवळ आकोलें.


## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥– |
| नाशनेल व्यांक | | २४९ |
| मुंबई व्यांकेची सोन्याची चीप दर तोळा | | २४०८३ |
| चांदी | ६८ | ६८॥ |
| जवस | | १६० |
| जवारी नवी | ९८ | ६८ |
| गहूं काठे | | ११९ |
| गहूं खांडवा पीवडा | | १४० |
| गहूं बनशी | | १२९ |
| चणे | ३॥ | ४ |
| तुरी | | ३।≡ |
| उडीद | | ४। |
| मुंग | | ३॥= |
| टोळी मोहाचे बीज | | २० |
| तेल | | ६।– |
| सरकी | | ११। |
| तुप | | ११ |
| कापूस | ६० | ६९ |
| रुई आकोटा जीन | | ९० |

## नोटीस

बेशमी—— पंढरीभट बिन रामकृष्ण भट व नारायण बिन पंढरीभट राहणार कसबे मलकापूर जि० बुलढाणें यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मौजे खापरखेड येथील शेत स. नं. २१ माझे चुलतानें तुह्मास बक्षिस दिल्याचें ऐकलें आहे. पण त्याचें बक्षीसपत्र माझे संमतीनें झालें नाहीं व त्या वर माझी सही किंवा साक्ष मुद्दां नाहीं ह्मणून ते बक्षीसपत्र रद्द समजावें. मी तयें आल्यावर त्या बाक्षिसाचा निकाल करीन तों पर्यंत सदर्हू शेताची वाहेवाट करूं नये. कळावें. ता० १४-२-१० इ०

सही

लालसिंह शिवसिंह.

नो. नं. ट. ७३

## जाहिर खबर

ह्याच नोटिशानें सर्व लोकांस कळवि ण्यांत येतें कीं वरील शेत कोणी गहाण अगर खरेदी घेऊं नये. घेतल्यास ती खरीदी व गहाण रद्द समजलें जाईल. कळावें. ता० १४-२-१० इ०

सही

लालसिंह शिवसिंह

सर्कल इनस्पेक्टर पोलीस.

नो० नं० ट. ७४

## नोटीस

मी खालीं सही करणार राहणार मौजे परतापुर परगणें व ता० मेहेकर जि० बुलढाणें इजकडून परसाजी वल्लद बाळाजी कासतोडे जात कुणबी राहणार मौजे गणपूर परगणें व ता० मेहेकर जि० बुलढाणें यांसः—

या नोटीशीनें कळविते कीं, तुह्मी माझे गंधर्वाचे नवरे असून मी वयांत येण्यास दोन वर्षे झालीं, त्या मुदतींत मी तुमचे घरीं नांदत असतां तुह्मी नपुंसक आहांत, तुमच्यांनें माझा संसार होत नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली आहे. मी नवतरणी असून हल्लीं मजला नवऱ्यावांचून राहवत नाहीं, करितां ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत तुह्मी मजला फारकती देऊन मोकळीक देणें. न दिल्यास ही दिलेली नोटीस हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन, मग तुमचा मजवर व माझ्याशीं गंधर्व करणाऱ्यावर कोणतेच प्रकारचा दावा चालणार नाहीं. करितां अगाऊ या नोटिशीनें तुह्मांस कळविलें आहे. कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १९१० इ०

सही

निशाणी बनाई मर्द परसाजी

कासतोडे हिचे हातची

बांगडी.

नो. नं. ट ७५

## नोटीस

नोटीस बेशमी नरसू वल्लद नन्हू कोन्हाटी कुणबी राहणार तुलंगखुर्द ता० बाळापूर यांसः—

खालीं सही करणार जकडून नोटीस देण्यांत येते कीं तुलंगखुर्द येथील शेत सर्वे नंबर १४ एकरगुंठे २२८२२ आकार रुपये २३ यांतील १/४ हिश्याची जमीन माझे मालकीची आहे ती मी तुह्मास तोंडी बटाईचे करारानें सन १३१७ फसली पासून वहितीस देत असते. त्या प्रमाणें सन १३१७।१८ ह्या दोन सालचा बटाईचा माल तुह्मी मला दरसाल बक्षीसर दिला. चालू सालचा बटाईचा माल अद्याप पावेतों मला दिला नाहीं. सबब दोन चार वेळ बटाईच्या मालाबद्दल तुह्मांस हटकें असतां तूं माझ्यावर रागाऊन ह्मणतोस कीं तुला माल कशाचा देऊं, शेतावरच तुझी मालकी नाहीं असें ह्मणून गांवांतल्या लोकांसही ह्याप्रमाणें सांगतोस. ही तुझी अशी बेइमानकी माझ्या नजरेस आल्यावरून तुला कळविते कीं जर तूं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत माझ्या सदर्हू शेताचा साल मजकूरचा बटाईचा माल मला आणून न देशील तर मी शेत तुला ह्या पुढें बटाईनें वाहण्यास न देतां मी वाटेल त्या इसमास लावून काढीन किंवा स्वतःच घरीं वाहीन. ह्या उपर तूं दांडगाई करून माझ्याशीं शेतां संबंधी कांहीं तंटाबखेडा करशील तर त्या बद्दल योग्य बंदोबस्त केला जाईल. शेताची मालकीण मी असून तूं ह्मणतोस कीं शेतावर माझा हक्क नाहीं तर त्या बद्दल तूं कायदेशीर तजवीज असेल ती करून घे, परंतु मी जर शेताची खरी मालकीण आहे तर आतां तुझा लपंडाव व तुझी बेइमानकी मी चालूं देणार नाहीं व तूं आतां शेताबद्दल माझ्याशीं बेइमानकी करशील तर माझ्या ज्या जागेंत तूं तीन ३ वर्षे राहिला आहेस त्या जागे बद्दलही मला व्यवस्था करावी लागेल. कळावें ता० १९।२।१० इ०

सही

चिनकाई मर्द पुंजाजी लांडे वस्ती

तुलंगखुर्द नि०

खुद बांगडी.

नो. नं. ट ७६

## नोटीस

नोटीस बेशमी— अहिलाई मर्द बापुना पाटील राहणार वस्तापुर ऊर्फ बोथ तालुके आकोला यांसः——

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा बापुजी हा माझा चुलत भाऊ होता. तो अजमासें तीन महिने झाले मयत झाला. त्याच्या जंगम स्थावर इस्टेटीचा मी वारसाचे नात्यानें पूर्ण मालक आहे. तूं मयताची वारस आहेस, परंतु तूं फक्त अन्नवस्त्राची मालक आहेस व मी मयताचे इस्टेटीचा कायदेशीर वारस आहे. सबब तुला जिनगीची अफरातफर करण्याचा अगर कोणास खरेदी वगैरे देण्याचा अधिकार नाहीं. तूं कोणास खरेदी वगैरे देशील व विनाकारण कोणास फसविशील सबब ह्या नोटीशीनें कळविलें आहे. कळावें. ता० १८।२।१० इ०

सही

कृष्णाजी वल्लद राघोजी पा०

राहणार मौजे वस्तापुर

नो. नं. ट ७७ दस्तुर खुद.

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर लोकांस ह्या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, माझा चुलतभाऊ बापुजी गंगाराम पाटील राहणार वस्तापुर उर्फ बोथ ता० आकोलें हा अजमासें ३ महिने झाले मयत झाला आहे. त्याची वरस बायको आहिलाई मर्द बापुना आहे, परंतु तिजला मयत बापुना याची स्थावर जंगम इस्टेट विकण्याचा वगैरे अधिकार नाहीं. ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. करितां तिजपासून कोणी मिळकतीची खरेदी वगैरे करून घेतल्यास ती रद्द समजली जाईल. तिजला कोणी कर्जाऊ पैसा देऊं नये. दिल्यास त्याचा बोजा जिनगीवर चालणार नाहीं. कारण मयताचा कायदेशीर वारस मी आहे. कळावें. तारीख १८ माहे २ सन १९१० इसवी.

सही

कृष्णाजी वल्लद राघोजी पाटील

राहणार वस्तापुर

दस्तुर खुद.

नो. नं. ट. ७८

## नोटीस

मारुती वल्लद उदेभान लुले कुणबी रा० मौजे तावंसे परगणें महान ता० आकोले यांसः—

नोटीस देणार खुशाल वल्लद जानजी खामलकर राहणार गोरव्हे ता० आकोले यांजकडून देण्यांत येते कीं माझी पुतणी नमें सकु तुह्मास गंधर्वानें तारीख २ माहे एप्रिल सन १९०९ रोजीं दिली. त्याच वेळीं तुह्मी आह्मास करारनामा एक रुपयाचे स्टांपावर लिहून दिला कीं तुमचे जवळ असलेली राख निंबी इजला सोडून देईन. निंबीशीं कोणतेही प्रकारें संबंध ठेवणार नाहीं व संबंध ठेवीन तर गंधर्वाची बायको दागीन्या समेत सोडून देईन. तुमचे करारा प्रमाणें गंधर्व लावून दिलें व चार वर्षे तुह्मी चांगले रीतीनें वागले व तुह्मापासून सकूस एक मुलगी अजमासें चार वर्षांची आहे दोन वर्षापासून तुह्मी निंबीशीं संबंध ठेविला आहे. सकूस नीट रीतीनें वागवीत नाहीं. व निंबीचा संबंध सोडत नाहीं. चारचवघा समक्ष समज दिली तरी तुह्मी ऐकत नाहीं. यावरून नोटीस दिली जाते कीं तुह्मी १५ दिवसांत कराराप्रमाणें निंबीचा संबंध सोडून द्यावा व सकूस नांदवावें. याप्रमाणें तुह्मी न केलें तर दोन वर्षांचे अन्नवस्त्रा बद्दल दावा करून ह्या नोटिशीचे खर्चासह तुह्मापासून भरून घेऊं व. तुमचे कराराप्रमाणें सकूस दुसरा घरठाव करून देऊं तुमचा कोणताही दावा चालणार नाहीं. कळावें तारीख २७ माहे २।१९१० इ०

सही

खुशाल वल्लद जानजी खांबलकर

राहणार गोरव्हे द० खु०

नो. नं. ट ७९

## नोटीस

नोटीस बेशमी— कृष्णराव रघुनाथ खेडें राहणार रिसोड यांसः—

नोटीस देणार खालीं सही करणार कळवितो कीं आमचेपाशीं तुह्मी पूर्वी नौकर होते सबब आह्मी तुह्मास जनरल मुखत्यारपत्र दुकानचें काम करण्यास दिलें होतें हल्लीं तुह्मास आह्मी दुकानावरून दूर केलें ( बडतर्फ केलें ) आतां हल्लीं तुह्मास नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास नौकरी वरून बडतर्फ केल्या तारखेपासून आमचे जनरल मुखत्यारपत्रावरून काम करूं नये. जर तुह्मी आमचे मुखत्यारपत्रावरून कामें केलीं असतील किंवा कराल तीं रद्द असे व आह्मी कबूल करणार नाहीं कळावें. ता० १४।२।१९१० इ०

सही

शिवलाल लक्ष्मीचंद मारवाडी

राहणार रिसोड.

नो. नं. ट८०

## नोटीस

मेहेरबान जनाब सलाबतखा वल्लद महबुबखा राहणार दारव्हा जिल्हा यवतमाळ यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यापासून तुमचे घरीं नांदत होते, परंतु तुमची पुर्वींची लग्नाची बायको असून तिच्यांत व माझ्यांत पटत नसल्यावरून तुह्मी मला माझे अंगावरील डागडागीने व मालमत्ता हिसकावून घेऊन मारहाण करून घरून काढून दिलें सबब मी आपले आईबापाचें येथें तीन वर्षे झालीं रहात आहे. माझे आई बापाची स्थिती गरीबी असल्यामुळें व पडदानसीन असल्यामुळें दरवर्षी ७५ रुपये कर्ज होऊन आजपावेतों २२५ रुपये झाले आहे आतां कोणी सावकार कर्ज देऊं शकत नाहीं करितां नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत येऊन वरील कर्जाचा निकाल करून व योग्य तऱ्हेनें नांदवाल असा करारनामा लिहून देऊन तुह्मी आपले घरी नांदविण्याकरीतां येऊन जावें मी नांदण्यास कबूल आहे. असें आपले कडून न झाल्यास मुदती नंतर निरुपायास्तव उदरनिर्वाहाकरितां सावकाराचें कर्ज वारण्या करितां मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमचेवर असे तारीख ७ २।१९१० इ०

सही

सहीची निशाणी बांगडी

नुरबी मर्द सलाबतखा मुसलमान रा०

वणी हिचे हातची असे.

दस्तुर वासुदेव कृष्णाजी गुरव

राहणार वणी.

नो. नं. ट ८१

## आर्यऔषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या नव्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकीट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीचा औषधाचा गुण शेंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊ परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## सदामृत संजीवनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, वपुपौष्टिक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धिवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरूपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पहिले या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उष्णतेनें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार संकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सर्व पाय लागणे. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग, मुलांची खरूज, जीर्णज्वर, असाध्य मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बालरोग, धूर्त हे जुनाट प्रमेह, मुळांपासून आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत अगोदर मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पहिले अनुपान खर्ची सोबत किंवा व्हीं. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो० ३ रु १५५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजन:-यानें रक्तस्राव, साहर, फुल, खुपऱ्या, विंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस जणुं काय रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:---कोणताही नवा जुना परमा व उष्णता दाह विकार मूत्राची लाली, संकोच पुयस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत दहा दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ ॥ भार बाटलीस रु. २

४ दंतपलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें पुढीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह ठेवावा गोळ्या गाठीस लावणे, घात घडू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो

९ सामानाचा मोठा बयाटलाग मागव तो फक्त पाठवूं आमच्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायनें भस्म चाटण. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ची सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान काळविल्यास रोगाची निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला स्वमान निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरू केला त्यांचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावे आमचे जाहिरातींत कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजर्ले वगैरे गावांतून तो पुणावरपर्यंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली धोरवें गाण्यास ज्याला तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं आयुर्वेदीय कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून उत्कृष्ट धंदा चालवून घोलें डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधांनें कित्येक वर्षी ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषधं नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकरीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटोपीस यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावीं ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.



ORIENTAL GOVERNMENT

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

## FUNDSEXCEED THREE CRORES AND THIRTY LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Goverumet Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising. though decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officer, professional men, Tradesmen and others employing a portion of their annual income or profits in effecting life polics create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the pro riety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please applay to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on ap lication-

M. DESOUZA.
CHIEF AGENT.
Nagpur.


हें पत्र आकोलें येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERARSAMACHAR

वर्ष ४४ ] अकोला, वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख १४ माहे मार्च सन १९१० इसवी [ अंक ९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचना:— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

हा बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७३ — G. A. Phillips. एजंट

## नाशिकचा शुद्ध व घाटदार सोन्या चांदीचा माल.

**सोन्याच्या** टुशा, वज्रटीका, अफ्फुलें. फिरकीचीं व गुलाबाचीं फुलें, नाग, मुद्रा ड्रोईंचेनग, पुतळ्या, गोल व अटपेलु मणी इ०

**चांदीचीं** भांडी, उपकर्णी, गडवे, पेले, फुलपात्रें, पातेल्या, गडव्या, झाऱ्या, पळ्या, ताटे, तबके, अतरदाण्या, गुलाबपाण्या, वाट्या, करंडे, कुपऱ्या, समेळ्या, व सर्व प्रकारचे दागीनें मिळतील.

विशेष माहितीकारितां क्याटलाग पाठवूं मालाचे खरेपणाबद्दल जोखीमदार आहे.

लक्ष्मण आत्माराम अंबेकर
नाशीक.

नो. नं. ट ७१

इंदुप्रकाश, गब्रूवत, ज्ञानप्रकाश, काळ, मुंबईवैभव आदिकरून पत्रांकडून उत्तम अभिप्राय मिळालेलें.

**उद्यान मासिक:—** यांतील प्रमुख विद्वान व विदुषींचे लेख व कविता आबालवृद्ध स्त्री पुरुषांस वाचनीय असतात. शिळोप्याच्या वेळीं हास्यविनोद, मधुर संगीत व प्रेमकथालाप यांच्या योगें करमणूक करण्यांत हें मासिक अद्वितीय आहे. चित्रें फारच सुबक असतात. पुस्तक अगदीं नियमित वेळीं प्रसिद्ध होतें. वा. व. फक्त दीड रुपया शिवाय ट. हं.

पत्ता:— 'उद्यान' ऑफिस
चर्नीरोड, मुंबई.
म्यानेजर 'उद्यान.'

### जाहीरनामा.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, श्री शंभू महादेव शिखर शिंगणापूर ता० माण जि० सातारा येथें दरसाल चैत्रमासीं यात्रा भरत असते, त्या प्रमाणें चालू सालीं चैत्र शुद्ध ९ शके १८३२ तें चैत्र शुद्ध १९ शके मजकूर पावेतों म्हणजे तारिख १४ माहे एप्रिल सन १९१० तें तारिख २४ माहे एप्रिल सन १९१० पावेतों भरणार आहे. यात्रेकरू लोकांस दोनही दिवस धका यात्रा येण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं; कारण यात्रेस पाणी विपुल आहे व हवा स्वच्छ आहे. कळावें तारिख १४।३।१०

म. गं. भिडे
सेक्रेटरी फो. फंड
शिंगणापुर.

G. M. BHALERAO.
मामलतदार
ता. माण.

नो० नं० ट. ९०

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस हा जाहीर नोटीशीनें जाहीर करण्यांत येतें कीं, कृष्णाजी वल्लद निवसन सदार रा. शेलू सदाराची ता० मुर्तीजापुर यांस मीं कुलमुखत्यारपत्र अजमासें २।३ महिने झाले दिलें होतें सदरहू इसम माझें काम बरोबर करीत नाहीं. करितां त्यास दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. ह्यासाठीं सदरहू इसमाशीं माझे संबंधीं कोणताच व्यवहार करूं नयें केल्यास त्याबद्दल मी जबाबदार नाहीं कळावें ता० ७-३-१० इ.

सही
सखाराम विठोबा गावंडे वस्ती
धामोडी नि० खुद्द हातची.

नो. नं. ट. ९१

## NOTICE

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2831-42, dated the 8th December 1899, is published for general information.

NAGPUR.
The 19th February 1910

B. P. STANDEN,
Chief Secretary to the Chief Commissioner,
Central Provinces.

### RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infrequently haphens that natives of India, students or others, who have proceeded to England, desire to obtain passports to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore entitled to a passport. Appeals for assistance are also frequently addressed to his Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2 In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor-General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India, with an authoritative certificate of indentity, in the from appended to this Resolution, signed by the head of the district ( in a Presidency Town, the Commissioner of Police ) in the case of residents of British India and by the Political Officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer ( in a Presidency Town, the Commissioner of Police ) or Political Officer, as the case may be;—

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ____________________
2. Father's name and caste ____________________
3. Residence ____________________
4. Age of applicant ____________________
5. Nationality of applicant* ____________________
6. Social and pecuniary status of father ( or guardian ) ____________________
7. Date of probable departure of applicant from India ____________________
8. Object of applicant's visit to England ( Europe ) ____________________

Signature of District Officer ( in a Presideney Town, the Commissioner of Police ), or Political Officer, or head of school or college.

Date ____________________

* i. e. whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of a Native State.

† Countersignature of the Distrct or Political Officer should be obtained on certificates signed by heads of schools or colleges.

### नोटीस

नोटीस देणार—— कृष्णाजी वल्लद निवसन सदार रा० शेलू सदाराची ता० मुर्तीजापूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मांस अजमासें २-३ महिने झाले कुलमुखत्यार नेमिलें आहे, ज्या कामासाठीं तुह्मांस कुलमुखत्यार नेमिलें होतें तें काम तुमच्यानें व्यवस्थेशीर होत नाहीं, करितां तुह्मांस दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे आतां तुह्मी आमचे तर्फे कोणतेंही काम करूं नये व माझे तुमच्याजवळ अमानत असलेली रक्कम रुपये ५० व मुदी सोन्याची तोळा १ एक किंमत रुपये २४।= व वज्रटीक १ एक किंमत रुपये २४।= ह्याप्रमाणें रुपये ६ दागिने असें ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांचे आंत माझे मजला आणून द्यावें. आणून न द्याल तर तुमचेवर फिर्याद केली जाईल. तसेंच तुह्मी कोर्टांत कामासाठीं ज्या दिवशीं जाल त्या दिवसापुरता ।। चार आणे रोजा प्रमाणें तुह्मांस द्यावे असा ठराव झाले । आहे परंतु तुह्मी आजपावेतों कोर्टांत जाऊन कांहींच काम केलें नाहीं ह्या करितां तुह्मांस नोटीस देऊन मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तुह्मांस इमान कायम ठेवणें असल्यास आमचे रुपये ५० व दागिनें आणून द्यावे. तुह्मी गेले बुधवारी ऐवज घेऊन येण्याचें कबूल केलें होतें. तुह्मी आला नाहींत सबब नोटीस देण्यांत आली आहे. तरी आठ दिवसांत वरील रक्कम व दागिने आणून दिल्यास ठीक न आणिल्यास फिर्याद करीन कळावें तारीख ७-३-१० इ.

सही
सखाराम विठोबा गावंडे वस्ती
धामोडी नि० खुद्द.

नो. नं ट९२

### वर्तमानसार

कांहीं महिन्यांपूर्वी बुद्धांची रक्षा पेशावरनजिक ज्या जागेंत सांपडली ती जागा पेशावर येथील कांहीं मुसलमानाच्या मालकीची आहे. बुद्धाची रक्षा ज्या ठिकाणीं सांपडली त्या ठिकाणीं आह्मी स्वतःच्या खर्चानें एक देऊळ बांधणार आहों, करितां बुद्धाच्या रक्षेपैकीं निम्मी रक्षा तरी आपल्याला मिळावी अशा आशयाचा दावा पेशावरच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढें जागेच्या मालकांनीं लावला होता; परंतु रक्षेचा मृ[ल्य] मिळत द्रव्यांत अंतर्भाव होत नाहीं असा मॅजिस्ट्रेटनीं निकाल दिला.

बारा येथील दरवड्यासंबंधांत शिक्षा झालेला आरोपी शशी सरकार याच्या बापानें, झडतीच्या व धरपकडीच्या वेळीं पोलिसनें केलेली मालाची नुकसानी भरून मागण्याकरतां सरकारावर ९००० रुपयांचा दावा लाविलेला होता. नुकसानीबद्दल २००० रुपये व कोर्टखर्चाबद्दल ६०० रुपये वादीस देऊन सरकारनें हा दावा आपसांत संपविला आहे.

‘ अपोलोजियन ’ या मथळ्याखालीं मद्रास टाइम्सनें पुढील उद्गार काढले आहेत:— व्हाइसरायांच्या धोरणासंबंधानें अलीकडे आह्मी जी टीका केली आहे, ती प्रामाणिकपणाची असली तरी देशाच्या बिकट परिस्थितींत ती अदूरदर्शीपणाची आहे असें आमचे कांहीं हितचिंतक आह्मांस सांगत आहेत. आमच्या टीकेचा भलताच अर्थ करण्यांत येत आहे अशी आमची समजूत आहे. आह्मी जी टीका केली आहे ती लॉर्ड मिंटो बादशहांचे प्रतिनिधि आहेत हें ध्यानांत धरून केलेली नाहीं. लॉर्ड मोर्ले यांच्या धोरणाचे पुरस्कर्ते व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल या नात्यानें आह्मी त्यांवर टीका केली आहे. लॉर्ड मिंटो यांचेसंबंधानें काढलेल्या कित्येक प्रशंसापर उद्गारांची स्मृति वाचकांस देऊन मद्रास टाइम्स ह्मणतें:— गत कालांत आह्मी केलेलीं भविष्यें बहुधा खरीं ठरलीं आहेत. या गोष्टीकडे आमच्यानें डोळेझांक करवत नाहीं. सरकारकडून कानउघाडणी न होतां चळवळे लोक बेधडक राजद्रोहाचा फैलाव करीत होते तेव्हां राजद्रोही उपदेशाचा व सरकारच्या ढिलाईच्या धोरणाचा परिणाम अत्याचारांत होईल हें भविष्य आह्मी वर्तविलें होतें. गेल्या तीन वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास आमच्या टीकेचें समर्थन करण्यास पुरेसा आहे· सर बॅंफील्ड फुल्लर यांच्या धोरणाचें आह्मी समर्थन केलें व त्यास राजीनामा द्यावा लागला तेव्हां आमच्या मनास धक्का बसला. मागून त्यांचेंच धोरण सरकारनें स्वीकारलें. प्रेसलॉची मागणी आह्मी करीत होतों. ज्या ज्या गोष्टी करण्याविषयीं आह्मी सल्ला देत होतों त्या त्या सरकारनें मागाहून व उशीरा केल्याच आहेत तथापि लॉर्ड मिंटो ब्रिटिश राज्याची इभ्रत राखण्याकरितां शक्य ती खटपट करीत आहेत यांत शंका नाहीं.

फिलेडल फिया येथील लेबर युनियन संस्थेनें ट्रामवेचे लोकांस सहानुभूति दाखवून एकंदर मजुरवर्गाचा संप जाहीर केला आहे. हा संप रात्रीं बारा वाजतां करण्यांत आला व एकदम ७५००० कामकऱ्यांनीं कामावर न जाण्याचा निश्चय केला आहे.

हद्दपार झालेले बाबू कृष्णकुमार मित्र हे अत्यावस्थ आहेत.

ता. ५।३।१० रोजीं फर्स्ट ग्रेड जज्ज साहेबांच्या कोर्टांत लक्ष्मीकांत सरकार यांनीं सरकार विरुद्ध लावलेल्या दिवाणी कज्जाचा निकाल लागला. यांत वादी हा बरा येथील दरोड्यांत आरोपी समजला होता, आणखी हत्यारांच्या कायद्याप्रमाणें खटला होऊन त्यास चार महिन्यांची शिक्षा झाली होती. प्रस्तुत फिर्यादीनें बरा येथील दरोड्यासंबंधीं पोलिसनें घेतलेल्या झडतींत आपलें नऊ हजारांचें नुकसान झाल्याचा दावा मांडला होता. या दाव्याचा निकाल फिर्यादीच्या बाजूचा होऊन सरकारनें त्यास नुकसानीबद्दल दोन हजार रुपये आणि खटला दोन महिने चालला त्याचा खर्च ६०० रुपये इतकें देण्याचें ठरविलें आहे. ह्या अटी वादीनें कबूल केल्या आहेत.

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें ( ता. ७ ) रोजीं ११ वाजतां ची. जस्टिस स्कॉट, सर चंदावरकर व जस्टिस हीटन यांच्या स्पेशल ट्रायब्यूनलपुढें मि. जॅक्सन यांच्या खुनासंबंधाच्या सात आरोपींवरील खटल्यास सुरुवात झाली. बॅ. मेसर्स स्टॅंगमन इनव्हेरॅरिटी व लाउंडीस हे सरकारतर्फे काम चालवीत होते. आरोपी नं. १ कान्हेरे याच्यातर्फे काम चालविण्यास कोणीही हजर नव्हतें. दुसरा आरोपी कर्वे याच्या वतीनें बॅ. वाडिया काम चालवीत होते व मि. भागवत त्यांस मदत करीत होते. आरोपी नं. ३ ते ५ च्यातर्फे बॅ. बॅप्टिस्टा काम चालवीत होते व मि. पारखी वकील त्यांस मदत करीत होते. आरोपी नं. ६ व ७ यांच्यातर्फे काम चालविण्यास कोणी हजर नव्हतें. क्लार्क ऑफ दि क्राउन यांनीं चार्जशीट वाचून दाखविल्यानंतर आरोपी कान्हेरे आरोपी नंबर ६ व ७ यांनीं गुन्हा केल्याचें कबूल केलें व बाकीच्यांनीं आपण गुन्हा केला नाहीं असें सांगितलें. एका आरोपीचा कबुलीजबाब रीतसर नाहीं अशी बॅ. बॅप्टिस्टा यांनीं क्रि० प्रो. कोड कलमें १६४, ३४२ व २८७ या कलमांन्वयें तक्रार केली व क्राइम्स ॲक्टाच्या पांचव्या कलमाच्या आधारें त्या आरोपीस सोडून देण्यांत यावें अशी मि. बॅप्टिस्टांनीं कोर्टास विनंति केली. मॅजिस्ट्रेटच्या खटला कमिट करण्यासंबंधाच्या ठरावावरूनच आरोपीच्या जबाबास दुजोरा मिळत आहे असें मि. बॅप्टिस्टा यांनीं प्रतिपादिलें. पुराव्याच्या ॲक्टाच्या १८ व्या कलमाखालीं आरोपीचा कबुलीजबाब पुराव्यांत ग्राह्य आहे असें मि० स्टॅंगमन यांनीं उत्तर दिलें. कबुलीजबाब अग्राह्य असण्याविषयींची बॅ० बॅप्टिस्टा यांची हरकत कोर्टानें शेवटीं नामंजूर केली.

१९१०–११ सालचें अंदाजपत्रक बाहेर येईपर्यंत बंगालचें कार्यकारी कौन्सिल केव्हां अस्तित्वांत येणार तें सांगतां येत नाहीं डेली न्यूज पत्रानें कांहीं आंकडे दिले आहेत त्यावरून वाटतें कीं खर्चाची रक्कम ह्या अंदाज पत्रकांत मंजूर करण्यांत आली आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं वरिष्ठ व प्रांतिक कार्यकारी कौन्सिलांत हिंदी लोकांना घेण्याची योजना केली आहे, ही त्यांच्या सर्व योजनेंतील महत्वाची बाब आहे. ह्यामुळें हिंदी लोकांस जबाबदारीचीं कामें करण्याची संवय लागून त्यांच्या बुद्धिमत्तेच व कर्तृत्वशक्तीचें कांहीं तरी चीज होईल.

ता. ६ रोजीं सिटि कान्सरव्हेटिव्ह लोकांनीं मि० बालफोर यांस खाना दिला त्यावेळीं त्यांनीं केलेल्या भाषणांत ह्मटलें “सरकारच्या हें लक्षांत आलेंच कीं, बजेटच्या विरुद्ध लोकमत पुष्कळ होतें. तरी पण लॉर्ड लोकांची सरशी झाली हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लॉर्ड पक्षांत कमी कर्तबगारी नाहीं. त्यांच्यावर जे आरोप करण्यांत आले होते. त्यांचा प्रतिकार करावयाचा होता. ह्मणून लॉर्ड सभेच्या रचनेंत सुधारणा होऊन त्यानें त्या सभेस जास्त बळकटी येईल अशा उपायांची जरूरी आहे. ” लॉर्डांची सभा ह्मणजे अधिकार–विहीन दुसरें हौस ऑफ कॉमन्स व्हावयास नको आहे, असा प्रकार फ्रान्स व युनायटेड स्टेटसमध्यें दिसतो.

मॉर्निंग पोस्टाचा शांघायचा बातमीदार लिहितो कीं, तिबेटांतील स्थितिसंबंधानें ब्रिटिश सरकारनें आपलें ह्मणणें चीनला कळविल्याचा परिणाम ल्हासाच्या हल्लींच्या अंबनच्या उचलबांगडींत होऊन त्याचे जागीं चिएनघासिपाओ यांची नेमणूक होईल असें दिसतें. तिबेट हा चिनी साम्राज्याचा एक भाग बनून त्यावर प्रिन्स सू यांची व्हाइसराय ( राजप्रतिनिधि ) ह्मणून नेमणूक होण्याचा संभव आहे.

मध्यप्रांताचे सरकारास सल्लामसलत देणारें एक मंत्रीमंडळ नेमण्यांत यावें अशा आशयाचा एक ठराव वरिष्ठ कायदे कौन्सिलांत आणण्याचा कित्येक बिनसरकारी सभासदांचा हेतु असल्याचें समजतें.

परराष्ट्रीय खात्याचे सध्यांचे अंडर सेक्रेटरी सर चार्लस हार्डिंग हे लार्ड मिंटो यांच्या पश्चात हिंदुस्थानचे व्हाइसराय होणार असें आपणांस खात्रीलायक आधारावरून कळल्याचें इंग्लिशमननें प्रसिद्ध केलें आहे.

आपल्या मुलांना मोफत जेवणखाण व शिक्षण मिळावें अशा आशयाचा एक अर्ज तंजावर प्रांतांतील मराठ्यांनीं मद्रास सरकाराकडे केला आहे. मराठशाहींत आमची स्थिति फार चांगली होती. पण अलीकडे आह्मी फारच विपन्नावस्थेंत येत चालल्यानें मुलांच्या शिक्षणाचा खर्च आतां आमच्या हातून निभावेनासा झाला आहे. १९०८ सालीं नामदार गव्हरनर साहेबांची स्वारी तंजावरास आल्या वेळीं तुमच्या मुलांना मोफत शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली जाईल असें त्यांनीं आश्वासन दिलेलें होतें, इत्यादि मजकूर त्या अर्जांत आहे.

बिझांट बाईनीं, ‘ सेंट्रल हिंदु कॉलेज ’ मासिकाच्या फेब्रुवारी महिन्यांच्या अंकांत सरकार व युरोपियन लोक यांस उद्देशून एक ‘ अपील ’ प्रसिद्ध केलें होतें. मिसेस बिझांट यांचा हा लेख खोडसाळपणाचा व इं पि. कोडाच्या १५३ कलमाखालीं येण्यासारखा आहे असें संयुक्तप्रांताच्या सरकारास वाटल्यावरून हें प्रकरण हिंदुस्थान सरकाराकडे विचारासाठीं रवाना झालें होतें ही गोष्ट आमच्या वाचकांस माहीत आहेच. आतां कलकत्याच्या तारेवरून असें समजतें. कीं, या प्रकरणासंबंधानें करण्यांत आलेला खुलासा समाधानकारक आहे असें हिंदुस्थान सरकारास दिसून आल्यामुळें या बाबतींत कांहीं ज्यास्त तजवीज करण्याचा सरकारचा विचार नाहीं.

नेत्रा दरवड्यांतील आरोपी सुरेंद्रनाथ चक्रवर्ती यास जामिनावर सोडण्याचें न्या. म्यू. स्टीफन व कार्नडफ यांनीं नाकारिलें.

इराणी आखातांतून आलेल्या दोघां पठाणांजवळ हत्यारें असून परवाना नव्हता ह्मणून त्यांजवर पोलिसांनीं खटला करून त्यांस कराची सिटी मॅजिस्ट्रेटपुढें उभें केलें होतें. मॅजिस्ट्रेटनें प्रत्येकास एक महिना सक्तमजूरी व २० रुपये दंड याप्रमाणें त्या दोघां पठाणांस शिक्षा दिल्या.

फोर्ट संडेमनहून मूशाखेल येथें निघून जाण्याविषयीं हुकूम आल्याप्रमाणें दौलतराम नामक एक गृहस्थ जात असतां वाटेंत कांहीं बदमाष लोकांनीं त्यास गांठून ठार केला. या खुनाच्या तपासार्थ पश्तू असि० कमिशनर व पो० इन्स्पेक्टर हे गेले आहेत.

तारीख ३।३।१९१० रोजीं कलकत्ता येथील हायकोर्टांत, चितगांव पोलीस मधील मोहेंद्र नांवाच्या शिपायानें एका मेरी गिलबर्ट नांवाच्या मद्रासी आयाचा खून केला होता त्या चौकशीस सुरुवात झाली. आरोपीवर मदहू बाईच्या द्रव्याच्या लालसेनें खून केल्याच्या आरोपाची शाबिती होऊन त्यास जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली आहे. दुसरा आरोपी सोडून देण्यांत आला आहे.

गेल्या एप्रिल महिन्याच्या ९ व्या तारखेस पृथ्वी पर्यटणास निघालेल्या ७५० अमेरिकन लोकांचा दुसरा काफला कलकत्ता येथें येऊन दाखल होणार आहे.

कलकत्ता स्थानिक सरकारांस जरूर वाटल्यास स्फोट द्रव्याच्या कायद्याचे नियम साध्या फटाक्यांसही लावतां यावें अशा अर्थाचा कायदा व्हावयाची आगाऊ सूचना प्रसिद्ध झाली आहे.

दलाईलामाच्या जागेवर ल्हासा शहरांत टिओमिलिंग मठाचा लामा, दुसरे दोन लामा व एक दुसरा गृहस्थ यांचें कामचलाऊ प्रधानमंडळ नेमून या प्रधानमंडळाचे हातीं सर्व सत्ता दिली आहे. दलाईलामा आणि त्याचे मंत्री ल्हासा शहरांतील बातमीची वाट पहात आहेत; परंतु चीन सरकार व कामचलाऊ प्रधानमंडळ यांचे मधील बातमी अद्याप मिळाली नाहीं. दलाईलामा आणि ब्रिटिश सरकार यांचे दरम्यान मध्यस्ती करणारे भूतानचे महाराज पैकीन व लंडन यांचे दरम्यान चीन सरकारचं होत असलेले पत्रव्यवहार व तिबेट बद्दल चीनचे ठाम उद्देश याबद्दल नक्की मन देत नाहींत.

ता. ४ रोजीं दिवसां ११–४० वाजतां मुंबई येथून सुटलेली मद्रास मेल एक्स प्रेस ट्रेनची व धोंड सोलापूर लाइनवरील लवणी स्टेशनांत आलेल्या मालगाडीची टक्कर झाली. अपघातांत एंजिन ड्रायव्हर, आगवाला आणि पोस्टल एक्स प्रेसचा हेड गार्ड इतक्यांना फार लागलें आहे. डाकेच्या डब्यांतील सॉर्टर लोकांनही थोडीशी दुखापत झाली आहे. दोन्ही गाड्यांचीं इंजिनें रुळाखालीं आलीं होतीं व डाकेचा डबा आणि इतर डब्यांची मोडतोड झाली आहे. उतारू व डाक दुसऱ्या गाडींतून पुढें रवाना करण्यांत आली. सांधेवाल्याच्या चुकीमुळें हा अपघात घडला असें कळतें.

वऱ्हाडसमाचार.

फाल्गुन शुद्ध ३ शके १८३१.

## स्थानिक स्वराज्य

इंडियांत म्युनिसिपालीटी व लोकल बोर्ड याच काय त्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था आहेत. आणि त्यांचे अधिकार इतके आंखलेले व मर्यादित आहेत कीं लोकांमध्यें या दोन संस्थांविषयीं फारशी आस्था व कळकळ दिसून येत नाहीं किंबहुना अलिकडे असा ग्रह होत चालला आहे कीं या संस्थांमधून जे सुखवस्तु लोक कारभार करतात ते राजद्वारीं शिरण्याचा किंवा सरकारच्या मर्जी प्राप्त करून घेण्याचा हा एक मार्गच समजतात. या संस्थां मधून केलेली कामगिरी लोकसेवेच्या सदरा खालीं देखील अलिकडे मोडत नाहींशी झाली आहे. वऱ्हाडांतील जिल्हा बोर्ड व तालुका बोर्ड तसेंच मध्यप्रांतांतील त्या संस्था यांच्या १९०८ १९०९ च्या वार्षिक हकीगतीचा नुकताच रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून या संस्थांचा कारभार सरकारी इच्छेप्रमाणें चांगल्या प्रकारें चालला आहे असें सिद्ध होतें. उत्तरोत्तर लोक या सार्वजनिक कामांत अधिक लक्ष आणि जिल्हा बोर्डाच्या व तालुका बोर्डाच्या सभांना जमणाऱ्या सभासदांच्या हजेरीचें मानही या सालीं विशेष प्रशंसनीय आहे. ना. चीफ कमिशनरसाहेबांचा अलिकडचा विचार असा आहे कि तालुका बोर्डांना सालोसाल कांहीं ठरीव रक्कम देण्यांत यावी आणि ज्या त्या तालुका बोर्डानें आपापल्या गरजा व जरूरी स्वतंत्रपणें भागवून घ्याव्या. अशा पद्धतीनें तालुका बोर्डाचे अधिकार वाढतील आणि लोकांनाहि आपापल्या तालुक्या पुरत्या गोष्टी नीट रीतीनें करून घेण्याला अधिक सवरत मिळत जाईल. हा उपक्रम प्रथमतः नागपूर जिल्ह्यांत करून पाहण्यांत आला आणि त्यामुळें त्या जिल्ह्यांतील सभासदांनीं शाळा, धर्मशाला, कोंडवाडे, रस्ते, शाळा, कमेट्या, प्लेगाच्या झोपड्या, इत्यादि बहुविध सार्वजनिक उपयोगाच्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविलें असा अनुभव आला आहे. नागपूर जिल्ह्यांतील ही सुधारणा लवकरच इतर जिल्ह्यांना लागूं करण्याचा विचार आहे. मध्यप्रांतांतील सर्व बोर्डांचा वार्षिक आढावा १४ लक्ष ६१ हजारांचा आहे. वऱ्हाडांतील बोर्डाचा कारभार सालीना ८ लक्षां पर्यंतचा आहे. बोर्डाच्या उत्पन्नपैकीं सरासरी $\frac{1}{3}$ हिस्सा प्राथमिक शिक्षणाकडे खर्च होतो. वऱ्हाडांतील बोर्डाच्या हाताखालीं अशा प्राथमिक शाळा ६०९ आहेत. आणि सध्याचा विचार असा दिसतो कीं शाळांची संख्या वाढविण्यापेक्षां आहेत त्या शाळांना अधिक सोयीचीं शालागृहें व भरपूर शिक्षकांची मदत या दोन बाबी पुरविण्याकडे कांहीं वर्षे पर्यंत अगोदर लक्ष पुरवावें असें जिल्हा बोर्डाचा दुसरा मोठा खर्च ह्मणजे दवाखान्यासंबंधाचा होय. मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून असे दवाखाने १३३ आहेत व त्यावर एक लक्ष दहा हजार रुपये खर्च करण्यांत आला. प्लेगच्या वेळीं गरीब लोकांना झोपड्यांचें सामान देण्यासाठींही कांहीं रक्कम खर्च करण्यांत आली. जिल्हा बोर्डाकडे असलेल्या कारभारामध्यें तिसरी मुख्य बाब ह्मणजे आरोग्यवृद्धि होय. वऱ्हाडच्या कमिशनरांच्या असें लक्षांत आलें कीं या बाबतींत ज्या गांवचे लोक सुखी व सधन आहेत त्या गांवीं शौचकूप, कचरा टाकण्याच्या पेट्या व नाल्या यांच्या कडे पुष्कळसा पैसा खर्च करण्यांत आला आणि त्या मुळें ज्या ज्या गांवांना सफाईच्या व स्वच्छतेच्या गोष्टी पुरविण्याची जरूर होती तीं गांवें पैशाच्या आभावा मुळें अगदीं विन्मुख राहिलीं. या संबंधांत विशेष निराळ्या प्रकारचें धोरण पाहिजे आणि तेवढ्या सार्ठी व्हीलेज सॅनिटेशन ॲक्ट वऱ्हाडाला लागूं करण्याचा सरकारचा विचार चालू आहे. चालू सालीं मध्य प्रांतांतील बोर्डांना व्हायसरॉयच्या कायदे कौन्सिलांत एक सभासद पाठविण्याचा अधिकार मिळाला आहे. या अधिकारामुळें बोर्डांतील सभासदपणाः विशेष गुरुत्वाला चढला असून पापुढें सरकार जे नवे अधिकार देणार आहे त्या अधिकारानुरूप बोर्डांतील कामगिरी विशेष लोक कल्याणकारक करण्यासाठीं लोक झटूं लागतील असा आह्मास भरवसा आहे. मध्य प्रांताला कौन्सिलदार निवडण्याचा सन्मान मिळाला आहे तसाच वऱ्हाडालाही मार्गें पुढें मिळेल अशी आशा बाळगून आह्मी आलेशान नाम० चीफ० कमिशनर हे बोर्डाचे अधिकार अधिक वाढविण्याचे लवकर उपाय योजतील असें आह्मी मनापासून इच्छितों.

## राक्षसी तुरुंग.

" देशसेवक " पत्राचे माजी संपादक रा. रा. अच्युत बळवंत कोल्हटकर हे नुकतेच कारागृहांतून सुटून सुखरूपपणें परत आल्याबद्दल लोकांस विशेष आनंद वाटला. पण मध्य प्रांतांतील कारागृहवास इतका खडतर व राक्षसी प्रकारचा असेल अशी आह्मांस कल्पनाही नव्हती रा० कोल्हटकर यांनीं स्वतःचा अनुभव जो निवेदन केला आहे व जो केसरीकारांनीं प्रसिद्ध केला आहे तो वाचतां क्षणींच अंगावर कांटा उभा राहतो आणि ब्रिटिश राज्यांतील नागपूर सारख्या सुधारलेल्या राजधानीच्या शहरामधील तुरुंगांत कैद्यांना अशा तऱ्हेनें वागवितात हें लक्षांत आणलें ह्मणजे मनाला फार खेद होतो. विद्वान व समाजांतील उच्चवर्गांतील सुखवस्तु कैद्यांना अशा तऱ्हेच्या शिक्षा देणें हा जर सरकारी कायदा असेल तर आह्मी ह्मणतो कीं हा कायदा लवकर बदलण्यांत आला पाहिजे. रा० अच्युतरावा सारख्या गृहस्थाला जो क्रूरपणा व विक्राळपणा दाखविण्यांत आला तो लोकांच्या हृदयांत नेहमीं जागृत राहील आणि लोकांचीं मनें प्रक्षुब्ध ठेवून लोकांचे विचार उलथे पालथे मात्र करण्यांत येतील. अशा क्रव्याद तुरुंगानें राजद्रोहाचें निर्मूलन होत असेल असा सरकारी अधिकाऱ्यांचा विचार असेल तर तो अगदीं चुकीचा व निराधार होय. राष्ट्रांतील विचार बदलविणारीं माणसें प्रेमानें, कृपार्द्र व सुविचाराच्या सूक्ष्मतेनेंच राजद्रोहाच्या विचारापासून परतविलीं पाहिजेत. तुरुंगाची शिक्षा देणें हा अगदीं बाह्य उपचार होय. पण त्यापेक्षां खरा उपाय ह्मटला ह्मणजे राजकर्त्यांनीं लोकांचे अंतरंग अनुकूल व आनंदित ठेवलें पाहिजे. राजश्री अच्युतरावासारख्यांचा अंतरात्मा या राक्षसी तुरुंगाबद्दल आमच्या स्थानिक सरकारास नेहमीं असाच उपदेश करील कीं शिक्षेच्या जहालपणानें लोक राजद्रोहा पासून विन्मुख होत नसतात. आह्मी स्थानिक सरकारास विनंती करितों कीं त्यांनीं तुरुंगाच्या व्यवस्थेचा कायदा लवकर बदलून त्यामध्यें योग्य ती सुधारणा अमलांत आणावी आणि मध्यप्रांतांतील इतर सुधारलेल्या राज्यकारभाराला शोभेल असेंच तुरुंगखातें नीटनेटकें करावें

## कृतिशून्यता.

वादाविवादाचा लाभ काणताहि विषय विशद स्पष्ट व व्यापक करण्या पलिकडे होत नाहीं. भवति न भवति होतां होतां तत्वबोध होतो हें खरें. पण जी गोष्ट विचारास जुळली तिला कृतीच्या रूपान्तारांत आणण्याचें कार्य महा दुर्घट असतें. विचारसृष्टी मध्यें मनुष्य जितकें उंच उड्डाण करूं शकतो त्या मानानें त्याच्या कृतीची भरारी फारच खालवरच्या वातावरणा पलीकडे जात नाहीं हें विसरतां कामा नये. 'जो नियम व्यक्तीमात्रास लागूं पडतो, तोच कायदे कौन्सिलांसहि लागूं पडतो; आणि व्यक्तीच्या क्षितीजापेक्षां कायदे—कौन्सिलाचें क्षितीज फार लांबवर विसृत असल्यामुळें तेथें तर विचार व कृती या दोहों मध्यें जमीन अस्माना इतकें मोठेंच अंतर दृष्टीस पडतें. हिंदुस्थान-सरकारनें आपल्या कायदे-कौन्सिलांत राष्ट्रांतील शेलकीं शेलकीं नररत्नें सल्लागार ह्मणून निवडून घेतलीं आहेत; पण या सल्लागाऱ्यांच्या अमृत वचनांची गती कर्णपक्षाच्या पलिकडे जात नाहीं असें दिसतें. कदाचित् या कौंसिलदारांच्या अभिप्रायाला सन्मान देण्याला प्रारंभ श्रवणापासून सुरूं केला आहे तो कीर्तन व मनन यांच्या प्रांतांत येण्याला पुष्कळ वर्षें लोटलीं पाहिजेत असें नव्या पद्धतीच्या कायदे-कौन्सिलांतील वादविवाद व त्या वरील निर्णय हें पाहिलें ह्मणजे चांगलें स्पष्टपणें लक्ष्यांत येईल. जेथें तेथें सरकारी धोरण नडतें आणि त्याच्या मध्यें फेरबदल होण्याची गोष्ट अगदींच कष्टसाध्य व कालान्तराची वाटते.

प्रेस—ॲक्ट पास झाला तेव्हां सरकाराला भक्कम शस्त्रास्त्रें पाहिजेत ह्मणून कौन्सिलदारांनीं आपला अभिप्राय एकवटून सरकारची बडी तरफदारी केली. जकातीचा कायदा पसार झाला तेव्हां नामदार गोखले, ठाकरसी, दादाभाई, मुधोळकर इत्यादि गृहस्थांनीं आपापली पराकाष्ठा केली. निराळ्या रीतींनीं सरकारी गोष्टींना पुष्कळसे शह दिले पण विचारांचें साम्राज्य कौन्सिलांत न होतां जकाती वाढविण्यांत आल्या. चांदीवर जकात इतकी वाढवूं नये व तसेंच राकेल तेलावर जकात वाढवूं नये ह्मणून लोकांच्या वतीनें आमचे लोकप्रतिनिधी फार रमणीय प्रकारें लढले. परदेशी साखर १०।११ कोट रुपयांची इंडियांत येते तिच्यावरील आयात कर वाढवण्या सार्ठी नामदार मुधोळकर यांनीं सुश्राव्य व्याख्यान दिलें. पण त्याकडे लक्ष्य पुरविण्या इतकी सरकारच्या मनाची तयारी नाहीं ह्मणून फार खेद वाटतो. कलकत्याच्या कौन्सिला मध्यें हल्लीं जीं सुंदर व्याख्यानें होत असतात तीं भावी सुधारणांचीं ध्वजचिन्हें होत असें आह्मी समजतों. पुढील मार्गप्रदेशाचें चित्र हीं व्याख्यानें काढीत असतात पण त्या चित्रांनीं दर्शविलेल्या मार्गांनीं जाण्याचें महत्कार्य सरकारच्या हातीं आहे. गेल्या बुधवारीं बजेटावर खडाजंगीचा वाद झाला. दुष्काळ-इंनसुअरन्स फंड बंद करण्यासाठीं नामदार गोखले यांनीं पाहिली सूचना केली या संबंधाची विचारकोटी विशेष मनन करण्या सारखी आहे पण मागची वहिवाट मोडण्याचें धारिष्ट सरकारास होत नाहीं असा रोंकडा जबाब सर बुइलसन-फडणीस यांनीं दिला. नामदार दादाभाई यांनीं सूचना मांडली कीं सध्यां कोट्यावधी रुपये रेल्वेचें जाळें पसरण्याकडे खर्च होत असतात पण त्या पेक्षां मुख्य लक्ष कालवे, पाटबंधारे इत्यादि धनोत्पादक व दुष्काळपरिहारक कार्यमालेकडे जावयाला पाहिजे आणि त्यासाठीं दुष्काळ कमिशनानें सूचविल्याप्रमाणें या कार्यशाखे सार्ठी ठेविलेली रक्कम १७० लक्षांच्या ऐवजीं २२० लक्ष करावी. इंडियांत मजूरी सस्ती व मुबलक आहे, तज्ञ असे इंजिनिअर प्रांतोप्रांतीं उपलब्ध आहेत आणि फक्त नड फंडाची असते ती दूर करण्या करितां रेल्वेकडील रक्कम कमी केली असता चालण्या सारखें आहे. या सूचनेला परिपाठाप्रमाणें नकार मिळाला. रेल्वे-कडील फंड १ कोटीनें कमी करण्यासाठीं नामदार गोखले यांची सूचना होती पण ती पसार झाली नाहीं हें निराळें सांगणें नकोच.

## रब्बीचें पीक

वऱ्हाडची जमीन सुपीक, समृद्ध व संपन्न आहे खरी पण तिचा कस उत्तरोत्तर कमी कमी होत चालला असून पीकांमध्यें फेरपालट केल्यामुळें जमिनीला जी नवी तेजी व सत्व हीं मिळतात तीं देखील अलिकडे जमिनीला मिळत नाहींत. सर्व पीकांमध्यें सगळाभर खरीपाकडे असतो आणि त्यांतल्या त्यांत बहुतेक पेरा कपाशिचाच होत असतो. सर्व शेतकरी लोक सालोसाल कपाशीच पेरतात. कांकीं कपाशीसाठीं कष्ट, मशागत, फार लागत नाहीं, थोड्या कालांत पीक हातीं येते आणि भावाच्या बाजूनें ही लोकांस हें पीक अधिक पैसा उत्पन्न करून देतें. कपाशीमुळें जवारीचा पेरा देखील अगदीं बाजूला पडला आहे. सालोसाल एकच-

पीक काढात गेल्यामुळें जमानीचा मजूर कमी होतो, या गोष्टी कडे लोक लक्ष पुरवीत नाहींत. शेतकीचा धंदा इतर राष्ट्रामधून मुग्रास्त चालला आहे. आणि तोच आमच्या या प्रांतांत उत्तरोत्तर खालावत चालला आहे. शेतकीच्या औतामध्यें किंवा खतामध्यें नवीन शास्त्रीय पद्धतीचे शोध कांहीं अंमलांत आलेले नाहींत. नव्या गोष्टी प्रसृत होण्याचें एकीकडेच राहिलें, पण खरीपाच्या व रब्बीच्या पिकांची फेरपाळी जी आज पुष्कळ वर्षे पासून चालत आली आहे, ती बहुतेक लुप्तप्राय झाली आहे असें ह्मटलें तरी चालेल. चालू साली जवस व गहूं यांचा पेरा वऱ्हाडांत किती झाला होता या संबंधाचे आंकडे वर निर्दिष्ट केलेली निकृष्ट अवस्था निदर्शनास आणतात. ५९६०० एकर जमीनीवर कायं तो जवस पेरलेला आढळतो. गेल्या सालापेक्षां सरासरी एक शष्ठांश नीं ही जमीन कमी आहे आणि गेल्या दहा वर्षांची सरासरी घेतली तर जवसाचा पेरा सुमारें दोन त्रितिआंश नीं कमी झाला आहे. आणि जी स्थिति जवसाची तीच गव्हाची होय, पण गव्हाचा पेरा जवसा इतका अगदीं नामशेष झालेला नाहीं. ३१६०० एकर जमीनींत गहूं पेरण्यांत आला. बुलढाणा व आकोला जिल्ह्यांत गव्हाकडे लोकांचा कल थोडा अधिक आहे. पण उमरावती व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमधून हा पेरा फार कमी झालेला आढळतो. यंदा गव्हाचें पीक १२।१४ आणे पर्यंत असून जवसाचें १४ आण्याहून अधीक आहे आह्माला तर असें वाटतें कीं सरकारांनीं रब्बीचे पेरे करण्याकडे लोकांची प्रवृत्ति अधिक अधिक होण्यासाठीं कांहीं नवीन सवलती देण्याचा क्रम सुरू केला पाहिजे ह्मणजे त्या योगानें लोकास उत्तेजन मिळून शेतीची सुधारणाही होत जाईल

---

## विद्याखातें

( २ लक्ष रुपयांची मागणी )

आमच्या स्थानिक विद्याखात्याच्या आवश्यक गोष्टीसाठीं २ लक्ष रुपये मध्यप्रांताला देण्यांत यावे अशी सूचना नामदार मुधोळकर यांनीं व्हाइसरायांच्या कायदे-कौंसिलापुढें बजेटावरील वादाविवादांत आणिली होती. ही सूचना शेवटीं त्यांनीं परत घेतली. कांकीं तिच्या फलश्रुतीची गोष्ट त्यांना पूर्वीच कळून चुकली होती. या सूचनेमध्यें सध्यां ज्या कांहीं मुख्य मुख्य गोष्टी अगोदर शाळाखात्याला करावयाच्या आहेत त्यांचें दिग्दर्शन आहे ह्मणून आह्मी तिचें अधीक स्पष्टीकरण करीत आहों.

वऱ्हाडासाठीं एक आर्ट कालेज, बुलढाणा व यवतमाळ येथें प्रत्येकीं एक एक हायस्कूल, मुलींना इंग्रजी शिकविण्यासाठीं दोन मिडल स्कूलें, प्राथमिक शाळांची वाढ व सध्यांच्या शाळांची सुधारणा या गोष्टीसाठीं स्थानिक विद्याखात्याला इंडिया सरकारानें निराळी देणगी दिल्या शिवाय पाऊल पुढें पडण्याचा संभव नाहीं. मध्यप्रांतासाठीं पहिली गोष्ट मारिस कालेजाला इंडियांतील पहिल्या प्रतीच्या कालेजांच्या पायरीला बसविण्याची होय. तसेंच हायस्कूल, मुलीसाठीं मिडल स्कूलें व प्राथमिक शाळा यांच्या संबंधानं पुष्कळसा पैसा अधिक खर्च व्हावयाला पाहिजे.

ही सूचना अखेराला काढून घेण्यांत आली आहे तथापि आमचें स्थानिक सरकार आपल्या कार्यकर्त्यांच्या व उदार धोरणाच्या दिशेनें वरील सुधारणा अंमलांत आणितील असा आह्मांस भरंवसा आहे.

वऱ्हाडचा महसूल दांडगा आहे आणि त्याच्यासाठीं निदान मध्यप्रांताला अडचणीची सबब सांगतां येऊं नये असें लोकांचें आग्रहपूर्वक सणणें आहे.

---

## नाशिकचा खून

सध्यां मुंबई काडेल प्रयत्नमधून नाशीच्या खुनाच्या चवकशीच्या रिपोर्टांची रेलचेल आहे. कै. जॅक्सन यांच्या खुनासंबंधानें सध्यां सात अगदीं तरुण मंडळीवर हायकोर्टाच्या स्पेशल ट्रीब्युनलपुढें खटला चालू आहे. मुख्य खुनी अपराधी कान्हेरे हा गुन्हा कबूलच आहे. पण आरोपींचे कबूली जबाब व इतर साक्षीदारांचे जबाब आणि तसेच पोलिसच्या सारखारांची कारणीं हीं वाचलीं ह्मणजे नानाविध गोष्टी मनापुढें उभ्या राहतात. आणि कांहीं तरुण मंडळींचीं डोकीं इतकी भणाणून सैरावैरा भडकलीं आहेत हें पाहून अत्यंत खेद वाटतो. बहुतेक आरोपी ऐन वीशी पंचवीशीच्या उमेदीं‌तले आहेत आणि तेही बहुतेक ब्राह्मण वर्गांतील आहेत. या खटल्याचा निकाल यथायोग्य होईलच. पण त्यापेक्षां मोठ्या चिंतेची गोष्ट तरुण मंडळींचीं मनें सुमार्गास लावण्याची होय. इंडियन समाजांतील पुढारी मंडळीवर व राज्यकर्त्यांवर ही सारखीच जोखीम आहे. ही जबाबदारी जर उभयतां एकदिलानें व क्षमार्द्र दृष्टीनें संभाळतील तरच नाशिक सारखे खुनाचे खटले पुन्हा ऐकण्याचें भयंकर प्रसंग येणार नाहींत. ईश्वर करो आणि राजकर्ते आणि प्रजाजन हे उभयतां लवकर विहित मार्गास लागोत.

---

## प्रदर्शन

रा. काशिनाथ श्रीराम जठार हे मागें येथें डेप्युटी कमिशनर होते तेव्हां त्यांचा विचार आकोल्यांत शेतकीचें एक मोठें प्रदर्शन भरविण्याचा होता. त्या गोष्टीला वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजुरातही मिळाली होती पण हा प्रदर्शनाचा योग प्लेगामुळें व इतर कांहीं कारणामुळें गेल्या दोन वर्षांत येऊं शकला नाहीं. पण आतां पुन्हा राजश्री जठार हे येथें डेप्युटी कमिशनर होऊन आले आहेत तेव्हां ते आतां आपला पूर्वीचा प्रदर्शनाचा विचार अमलांत आणतील असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे. आकोल्यास सरकारी शेतीचा मोठा कारखानाही चांगला चालूं आहे. तेथें निरनिराळ्या पीकांचे प्रयोग चाललेले आहेत आणि आतां काल असा आला आहे कीं त्या प्रयोगांची माहिती सर्व लोकांस प्रत्यक्षपणें सार्वजनिक तऱ्हेनें मिळेल तर या जिल्ह्यांतील शेतीच्या उद्योगास चांगलें प्रोत्साहन मिळून नवीन सुधारणा अमलांत आणण्याची दिशा लोकास दाखविण्यांत येईल. येथील सरकारी शेतकीवरील मुख्य अधिकारी राजश्री भय्या साहेब यांनीं शेतीला लागणाऱ्या औतामध्यें देखील पुष्कळ फेरफार केले आहेत. आणि उत्तम उत्तम प्रकारचें कीं त्यांनीं तयार केलें असून त्या शिवाय शेंकडों जातीच्या कापाशीचे प्रयोग त्यांनीं चालविले आहेत. या सर्व गोष्टी आकोल्यास प्रदर्शन होईल तर सहाजिक रितिा लोकांच्या नजरेस पडतील. वऱ्हाडांतील गाईहशिची व बैलांची फार जुनी प्रसिद्धि आहे. पण अलिकडील जनावरें आणि विशेषतः गेल्या महादुष्काळामुळें शिल्लक राहिलेली जनावरें पूर्वींच्या लौकीक कायम ठेवण्या सारखीं राहिलेलीं नाहींत. उत्तम जनावराची निपज करण्याची गोष्ट सरकारानेंच मनावर घेतली पाहिजे. हल्लींच्या जनावरामध्यें पुष्कळशी भेसळ दृष्टीस पडते आणि ती भेसळ कमी करण्यासाठीं व उत्तम तिचीं जनावरें प्रांतांत उत्पन्न करण्यासाठीं पुष्कळशा अंशाला प्रमाणें जनवरांच्या शाळा निघाल्या पाहिजेत. प्रदर्शनानें चांगलीं जनावरें उत्पन्न करण्याला एका प्रकारचें उत्तेजन मिळेल आणि त्यासाठीं आह्मी आकोल्यास एक नंगी प्रदर्शन व्हावें असें फारफार इच्छितो. उमरावती नागपूर वगैरे ठिकाणीं प्रदर्शनें नुकतीच झालेलीं आहेत पण तसा योग आकोल्यास मात्र एका सबंध पिढींत आलेला नाहीं तेव्हां राजश्री जठार हे येथें प्रदर्शन भरविण्याची गोष्ट मनावर घेतील अशी आह्मास आशा आहे.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवापाणी — थंडीचें मान पालटण्याला प्रारंभ झाला असून दिवसा ऊन कडक असतें. प्लेगा शिवाय इतर आरोग्याच्या गोष्टी ठीक आहेत.

प्लेग— आकोल्या जिल्ह्यांत प्लेग विशेष असून रोजची मृत्युची संख्या ४०–५० पर्यंतची आहे. बुलढाणे जिल्ह्यात हेंच दर रोजच्या मृताचें प्रमाण २५ पर्यंतचें आहे. उमरावती जिल्ह्यांत नुकताच प्रारंभ होत चालला आहे. खुद्द आकोलें येथील या आठवड्याची मृत्यूची संख्या १० पासून १५ पर्यंत आहे. पण सध्यांच्या उतरत्या मानानें पाहतां येथील प्लेगाचा उपद्रव एका महिन्याच्या अवधींत अगदीं नाहींसा होईल असा रंग दिसतो.

रा. रा. दत्तात्रय अंबादास देशपांडे तहशिलदार, पुसद यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागीं केळापूर येथील नायब तहशिलदार रा. रा. मीर तसलीम हुसेन यांस आफि० तहशिलदार नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. डि. ए. स्मीथ असि० डि० सुपरिटेंडेंट यास नागपुराहून खामगांव येथें बदलण्यांत आलें.

रा. रा. रहिमतुल्ला तहशिलदार वर्ग २ यांस नायब तहशिलदार वर्ग १ चे केडरान्वयें गेल्या १२ डिसेंबर पासून खालील प्रमाणें बढत्या देण्यांत आल्या आहेत.

| तहशिलदार | वर्ग |
|---|---|
| रा. रा. शाहा महमद इशाक | २ |
| " " बळीराम त्रिंबक | ३ |
| " " अबदुल रहिमखान | ४ |

तसेंच कै० विष्णु रंगनाथ रेंबेकर तहशिलदार वर्ग १ यांच्या मृत्युमुळें जानेवारी ३ पासून जी वर्गवारी झाली ती अशी.—

| तहशिलदार | वर्ग |
|---|---|
| रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर | १ |
| " " नारायण रामराव गुप्ते | २ |
| " " दोराबजी एदलजी हंजाना | ६ |
| " " रुस्तमजी माणकोजी वानक | ४ |

आणि रा. रा. वामन गणेश देशपांडे तहशिलदार वर्ग १ यांनीं १० जानेवारी पासून पेन्शन घेतल्या कारणानें ज्या नवीन नेमणुका झाल्या त्या अशा:—

| तहशिलदार | वर्ग |
|---|---|
| रा. रा. धोंडो हरी खळीणकर | १ |
| रामचंद्र नारायण साठे | २ |
| मुनिरुद्दीन हाजी शेख चांद | ३ |

नवी बंदी—प्रेस ॲक्ट प्रमाणें मध्यप्रांतांत कांहीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व एक पुस्तक अशीं १४ प्रकाशनें काहिलन येऊं नयेत ह्मणून मनाई करण्यांत आली आहे. पण ही सर्व बहुतेक इकडे अप्रसिद्ध असल्यामुळें त्या संबंधानें विशेष काळजी वाटण्याचें कारण नाहीं. त्यामध्यें स्वराज्य, युगांतर, वंदेमातरम् हीं पूर्वींच बंद असून व तलवार व सतरंग हीं दोन्हीं वर्तमानपत्रें इकडे अगदीं अप्रसिद्ध आहेत. पण निजाम सरकारच्या राज्यामध्यें मात्र १२ वर्तमानपत्रांना मनाई झाली असून त्यामध्यें राजद्रोहाबद्दल पुर्वी शिक्षा झालेलीं बहुतेक सर्व वर्तमानपत्रें आहेत.

मुसलमानी विद्यापरिषद:— वऱ्हाडची मुसलमानी विद्यापरिषद उमरावती येथें येत्या २६।२७ तारखेस भरणार आहे. ही पुर्वी आकोल्यास भरणार होती पण प्लेगामुळें आतां ती उमरावतीस भरणार आहे.

लेफ. कर्नल हार्सबरो डेप्युटी कमिशनर आकोला यांची हुसंगाबादेस बदली झाल्यान्वयें ते येथून गेल्या मंगळवारीं हुसंगाबादेस रवाना झाले. त्यांच्या सन्मनार्थ स्टेशनवर पानसुपारीही करण्यांत आली.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार ॲफि. डेप्युटीकमिशनर हे येथें येऊन दाखल झाले.

बडा खाना:— रा. रा. स्लॉय साहेब कमिशनर हे मोठ्या रजेवर जाणार असल्या कारणानें वऱ्हाडांतील पारशी मंडळी त्यांच्या सन्मानार्थ बडा खाना देणार आहेत. आणि त्या संबंधाच्या आमंत्रण चिठ्या बहुतेक जातींच्या प्रतिष्टित मंडळींना देण्यांत आल्या आहेत.

चित्रमय जगत:— हें नवीन मासिक पुस्तक पुण्याच्या चित्रशाळेमध्यें अलिकडे प्रसिद्ध होऊं लागलें आहे. त्याचे दोन अंक सध्यां निघाले आहेत. काही थोर पुरुषांचीं चरित्रें अशींच कांहीं विनोदी चित्रें प्रसिद्ध नट जपानी जिजित्सुचे तालीमीच्या खेळाचीं चित्रें व त्या खालील प्रत्येक चित्राचें स्पष्टिकरण इत्यादि बहुविध प्रकारच्या माहितीनें हें मासिक पुस्तक भरपूर भरलें असून उत्कृष्ट प्रकारची करमणुक व शिक्षण हीं आनायासें होतात. सर्व चित्रें चांगलीं साधलीं आहेत. विलायतेंतील ईलस्ट्रेटेड न्युज, स्केच, ग्राफिक आणि व्हाईट इत्यादि सप्ताहिकांच्या पद्धतीवर या चित्रमयजगताची योजना करण्यात आलेली आहे. याची वार्षिक वर्गणी टपालासुद्धा ३।४ आहे. महाराष्ट्रांत अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न असून तो लोकाश्रयास विशेष पात्र आहे. पहिले दोन सुरेखाईक अंक पाहिले ह्मणजे अशी खात्री वाटते कीं हें मासिक थोड्याच कालांत विलायतेंतील प्रसिद्ध चित्रमय पुस्तकांच्या तोडीचें होईल.

## सुधारलेले लोखंडी नांगर

लांकडी नांगर जाऊन त्यांच्या जागीं हळू हळू लोखंडी नांगर प्रचारांत येऊं लागले आणि हल्लीं हंगामाच्या दिवसांत तर त्यांची जरूरी फारच भासणार हें जाणून आह्मी तुमच्या करितां मोठ्या मेह- नतीनें हल्लीं सुधारलेले लोखंडी नांगर आमच्या कारखान्यांत तयार करून ठेविले आहेत. व हे नांगर सर्वत्र पसंत अस- ल्याचें तुमच्या वाचण्यांत अगर ऐकण्यांत आले असेलच, शिवाय आमचे नांगर परदेशी नांगरापेक्षां प्रत्येक बाबतींत फारच मजबूत असून किंमतींत स्वस्त आहेत, ह्मणून जास्त माहितीच्या हस्तपत्रका करितां आजचे आज लिहा.

किर्लोस्कर बंधु, बेळगांव.

नो. नं. ट ७२

---

सत्रा वर्षांपासून परीक्षित व सरकाराकडून रजिष्टर केलेला.

## सुधासिन्धु

खोकरा, (पटकी) दमा, खोकला, कफ, पोटशूळ, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा वातजन्यरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शिशीची किंमत ॥. एका डझनास रुपये ९ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ८३ आणे व डझनास ।. आणे. एकदम ६ घेणारास १ फुकट. पूर्ण माहिती व सरटिफिकीट पाहण्याकरितां क्याटलाग फुकट पाठवूं. प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत, नियम मागवून पहा.

मिळण्याचा पत्ता

सुख संचारक कंपनी,

नो. नं. ब. ९१ मथुरा.

---

## नोटीस

नोटीस बेशमी-- बायणी मर्द धोंडीबा गाडवे राहणार गणपुर हल्लीं मुक्काम गोप- गव्हाण इजला.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून मजला न विचारतां आपले आईबापाचे घरीं गेलीस, त्यास अजमासें एक वर्ष झालें. दरम्यान मी तुजला घरीं नेण्याकरितां दोन वेळ आलों असतां तुझे भावानें व आईनें पाठविलें नाहीं आणि उलट तूं मजवर नोटीस केली ती बरोबर नाहीं, तरी आतां तुजला नोटिशीनें कळवितों कीं तूं ही नोटीस पाहल्या पासून १५ दिवसांचे आंत जशी गेलीस तशी माझे घरीं आली पाहिजे. जर न आलीस तर कायदेशीर रीतीप्रमाणें कोर्ट मार्फत फिर्याद करून तुजला ताब्यांत घेणें भाग पडेल कळावें. तारीख ५ माहे मार्च सन १९१० इ. सही

धोंडी वल्लद रावजी गाडवे राहणार गणापुर ता० मेहेकर

नो. नं. ट ८८ निशाणी खुद.

---

## नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, मी अ- ज्ञान असतांना माझी पालनकर्ती आई रावाबाई ऊर्फ गोपाळराव इनें नारायण रामचंद्र पटवारी राहणार वनोज तालुके दर्यापूर यांस कुलमुखत्यार नेमून मुखत्यारपत्र नोंदून दिलें होतें. ज्या कामाकरितां मुखत्यार नेमिलें होतें तें काम होऊन गेलें आहे. सबब आजतारखे पासून वरील मुखत्यार यांस दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केलें असे. आतां ह्या पुढें सदरील मुखत्यार यानें माझे तर्फे कोणतेंही काम मुखत्यारपत्राच्या आधारें केल्यास तें रद्द समजलें जाईल. हें ह्या जाहिरातीनें कळविलें आहे कळावें. तारीख २७।२।१० इसवी.

सही

मारुती गोपाळ राहणार

आ० पा. करणार गोपाळराव रा.

नो० नं० ट. ८९ पळसोद

---

## जाहिरात.

वऱ्हाड म्युनिसीपाल कायद्यांतील कलम ८५ व ११६ यांतील पोटकलम (जे) या अन्वयें केलेले इमारती बांधणें अगर दुरुस्त करणें ह्या संबंधीं नियम एलीचपूर सिव्हील स्टेशन म्युनिसीपाल कमेटीला करणें आहेत. हे नियम ता. २२ जानेवारी सन १९१० रोजीं भरलेल्या स्पेशल कमेटींत पास झाले असून पूर्वी इमारती बांधण्या संबंधीं रेसीडेन्सी आर्डर्स नोटीफिकेशन नंबर १८७ ता. २० माहे एप्रिल सन १८९९ मध्यें प्रसिद्ध झालेले मागील नियम या नवीन नियमांच्या योगानें रद्द करून सदहू नियम मंजूर केले आहेत ते:—

(१) ज्या कोणाला कमेटीचे हद्दींत घर बांधणें अगर दुरुस्त करणें असेल त्यानें कमेटीला ह्या लगत दिलेल्या नमुन्या प्रमाणें नोटीस दिली पाहिजे.

(२) व त्या बरोबरच एक साधा नकाशा दिला पाहिजे व त्या नकाशांत खालील गोष्टी दाखविलेल्या असाव्यात.

(अ) जेवढ्या जमीनीवर इमारत बांधणें अगर दुरुस्त करणें तिचें क्षेत्रफळ.

(ब) बांधले जाणाऱ्या अगर दुरुस्त होणाऱ्या इमारती सभोंवती खुली राहणारी जागा तिचें क्षेत्रफळ.

(क) मोऱ्या, पायखाने, अगर हौद जुने असलेले अगर नवीन होणारे यांची जाग कोणते तऱ्हेची इमारत आहे, आणि ती खपरेल किंवा तनाची त्याचीही माहिती देणें.

हा नकाशा ५०० रुपयांवर किंमत होणारे घरा संबंधीं असल्यास प्रमाणांत ह्मणजे स्केलाचा असला पाहिजे. इतर घरा- संबंधीं तो साधा असल्यास चालेल.

(३) रस्त्याला लागून असणाऱ्या मोऱ्या- वर पायऱ्या अथवा इमारतीचा पुढला भाग कमेटीची मुद्दाम लेखी मंजुरात असल्याशि- वाय बांधूं नये.

(४) पायखाना बांधणें अगर दुरुस्त करणें झाल्यास तो कमेटीनें पसंत केलेल्या जागेवर व नमुन्या प्रमाणें केला पाहिजे.

(५) घरांत असलेल्या सांडपाणी व घाणीचें पाणी नेणाऱ्या मोऱ्या अशा रीतीनें बांधाव्यात कीं त्या कमेटीला सोईवार तपासतां याव्यांत. व कमेटीचे परवानगी- वांचून कोणतीही नाली आच्छादूं नये.

(६) जो कोणी वरील नियम मोडील त्याची म्याजिस्ट्रेटापुढें चौकशी होऊन तो ५० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

---

### नोटीशीचा नमुना

सेक्रेटरी. सी. स्टे. मु. कमेटी एलिचपूर यांस:—

मी ह्या नोटिशीनें कळवितों कीं अमुक भागांत असलेलें अमुक नंबरचें घर बांधण्याचा अगर दुरुस्त करण्याचा माझा विचार आहे.

ह्या नोटीसी बरोबर दिलेले कागद:—

(अ) जागेचा नमूना अथवा साधा नकाशा

(ब) त्या जमिनीवरील माझा हक्क दाखविणारे कागदपत्राची नक्कल.

(क) इमारतीचा खालील पाया, नि- रानिराळे भाग व उंची दाखविणारे नकाशे.

(ड) तयार होणारे कामाचें वर्णन.

आपला नम्र सेवक, अर्जदाराचें नांव

ज्या कोणास वरील नियमास हरकत घेणें असेल त्यानें नोटिशीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत कमेटीकडे आपला अर्ज द्यावा. एक महिन्याचे मुदती नंतर कोणाचेही अर्जाचा विचार केला जाणार नाहीं. ता. ३१-१-१९१० इ.

गणेश नागेश सहस्रबुद्धे.

व्हाईस चेअरमन

एलिचपूर सिविल स्टेशन म्यु०

नो० नं० ट. ५९

---

## NOTICE

Notice is hereby given that the Ellichpur Civil Station Municipality propose to make the following Rules for controlling dogs within the limits of the Municipality under sections 132 and 116 clause (J) of the Berar Municipal law. They are sanctioned in the special meeting of the Committee held on the 22 nd. January 1910, and are published for information of people living within Municipal limits:-

1. Every person who keeps any dog or dogs within the limits of Ellichpur Civil Station Municipality shall register the same in a book to be kept by the Committee for the purpose and obtain a license free of cost from the Committee, which shall be renewable on the 1st.. day of April in each year.

2. Every dog so registered shall bea a brass disc bearing the number in the register. This disc shall be supplied by the Municipal Committee free of cost.

3. The disks shall be of different pattern for each period of issue and shall be of a size sufficiently distinguishable and shall bear consecutive numbers.

4. If after the issue of the license or disc granted under these rules, such license or disc is lost or destroyed, the owner shall at once report the fact to the Municipality and obtain a duplicate thereof from the Municipality. Duplicate disc will be supplied at a charge of 4 annas per disc.

5. Every person living within the limits of the Ellichpur Civil Station Municipal Committee shall be bound to give true information regarding the number of dogs owned or possessed by him, when called on to do so by the Secretary, Vice-Chairman or any person authorized in this by the Committee.

6. Any person infringing the above rules, shall on conviction by a magistrate be punished with a fine which may extend to Rs. 50/.

People objecting the above rules are requested to put in their objections within one month from the publication of the notice to the Secretary of the Committee. After which period no objections will be heard.

G. N. Sahasrabudhe.
Vice Chairman.

Dated Ellichpur 31 Jany. 1910 Ellichpur Civil Station Municipality.

---

## NOTICE.

Notice is hereby given that the Ellichpur Civil Station Municipal Committee propose the following revised set of Rules regarding the erection or re-erection of buildings within Municipal Limits passed by the Ellichpur Civil station Municipal Committee, in special meeting held on 22 nd. January 1910, under section 85 and 116 Sub-section I Clause J of the Berar Municipal Law of 1886, in supercession of the previous Rules made by the Committee regarding the same and published in Residency Orders Notification No, 187 dated 20 th. April 1899.

1. Every person who intends to erect or re-erect any building within Municipal Limits shall give notice of his intention to the Municipal Committe, in the form appended to these Rules.

2. Every person who intends to erect or re-erect any Building within Municipal Limits, shall with such notice furnish a rough sketch showing:—

(a). The area to be occupied by the building and out building to be erected or re-erected on the land.

(b). The space to be left about the building or out building to be erected or re-erected.

(c). The position of drains, privies or cesspools existing or to be constructed.

(d). The nature of house and materials to be used.

The above sketch must be to the scale in the case of houses costing more than Rs. 500/-, in other cases, the sketch may be rough one.

(3). No steps or projections shall be built over the road side drains without special permission in writing, of the Municipal Committee.

(4). Every privy to be built or re-built shall be erected on a site and model approved by the Municipal Committee.

5. All waste water drains of sewage drains attached to the house shall be so constructed as to be easy of access and inspection by Municipal Committee and no drain shall be covered except with the permission of the Committee.

6. Any person who infringes the above Rules shall on conviction before a Magistrate be punished with fine which may extend to Rs. 50/-.

### THE FORM OF NOTICE.

To,
The Secretary.
Civil Station Municipal Committee.
Ellichpur.

Dated..........month..................19

Sir,

I hereby give you notice that I intend to erect or re-erect a building No......... in ............ward.........or......... Bazaar in accordance with the Rules made under Section 85 (1) of the Berar Municipal Law of 1886.

I attach:—

(a). Site plan or rough sketch

(b). A certified copy of the document showing any authority to occupy the land.

(c). Plans, Section and elevation.

(d). Specification of the work intended to be constructed.

I have the honor to be
sir
your most obedient servant
name and address.

Any person objecting to the above Rules is required to put in his petition of objection within one month from the date of this notice—after which period, no objection will be considered by the Committee.

G. N. Sahasrabudhe.
Vice Chairman,
Ellichpur Civil Station,
Municipality.

नो. नं. ट ६०

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें बारिक रीतीनें तपासून त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे हें अवश्य लक्षांत ठेवावें. हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या काहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजीवनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक, मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीराचा मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असल्यास तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरिरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य वगैरे धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार संकोच; धातुचा पातळपणा, लिंगाची सुपणी, छातींतील रोग, रुठ पाय जळाग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, धूपहेव बुजार पामा, मुळापासून ते आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें जाऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नाहून स्त्रिया, पुरुष मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान बद्दल सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः-एकदम २५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. १२५ गो ३ रु १७५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस जणू रामबाण आहे. १॥ तोळयाच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उष्णता दाह ठिकठिक मूत्राची कळी, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात ठिकठिक एका घटकेत जाते असें रामबाण औषध कोठें दुसरा नाहीं. बा० किं० १ ११ भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूर्चे विषः-औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः-खरुज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा वयाटलाग मागव तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान बद्दल सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं खात्रीनें मान रुळविश्वास रोगाची निदान चिकित्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समज निरुद्योगी याळशी दनल्यामुळे एकदा जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जोहरगांवास कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ० प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजर्लें वगैरे गावांतून तो पुणावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं आमचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरू असून हल्लींच डॉ. घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्येक ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारी असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषध अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**


---


**ORIENTAL GOVERNMENT**

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

**FUNDSEXCEED THREE CRORES AND THIRTY LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, though decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officer, Professional men, Tradesmen and others employing a portion of their annual income or profits in effecting life policies create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.
CHIEF AGENT.
Nagpur.


हें पत्र आकोला येथे कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERARSAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला, वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख २१ माहे मार्च सन १९१० [ अंक १०



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. ह्वां........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं सरतांचे मागें राहील त्यास काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३

## नाशिकचा शुद्ध व घाटदार सोन्या चांदीचा माल.

सोन्याच्या टुशा, वज्रटीका, अरफुलें. फिरकीचीं व गुलाबाचीं फुलें, नाग, मुद्रा हेड्चिनन, पुतळ्या, गोल व अष्टपैलु मणी इ०

चांदीचीं भांडी, ताकाणीं, गडवे, पेले, फुलपात्रें, पातेल्या, गडव्या, झाऱ्या, पळ्या, ताटें, तबकें, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, वाट्या, करंडे, कुयऱ्या, मसोळ्या, व सर्व प्रकारचे दागीनें मिळतील.

विशेष माहितीकरितां व्हाल्युपेबल पाठवूं मालाचे खरेपणाबद्दल जोखीमदार आहे.

लक्ष्मण आत्माराम अंबेकर
नाशीक.

नो. नं. ट ७६

## नोकर पाहिजे.

दारूच्या व अफूच्या दुकानावर विक्री करण्यासाठीं नोकर पाहिजेत. गरजूंनीं आमच्या नदीजवळील ऑफिसांत ता. ३० मार्च १९१० च्या आंत समक्ष येऊन भेटावें.

महमद नजीरुद्दीन
अबकारी कॉन्ट्रॅक्टर आकोला.

नो. नं. ट १००

## जाहिर नोटीस.

ह्याच नोटीसीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, वरील शेत सर्वे नंबर १२३ चा हा कोणी खरेदी, गहाण वगैरे घेऊं नये. घेतल्यास ती खरेदी व गहाण रद्द समजलें जाईल. सदरहु शेतावर आमची मालकी असून दुसऱ्याची नाहीं. कळावें तारीख १४।३।१० इ.

सही
चिरदीचंद अनराज (मालक)
गुलाबचंद चिरदीचंद दुकान
नो. नं. ट ९६ मलकापूर.

## नोटीस

नोटीस बेशमी— इसमालखा वल्द फत्तेखा मुसलमान राहणार सिंदखेडराजा ता० मेहेकर यासः—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको आहे. लग्न झाल्यास चार वर्षे होत आलीं आहेत परंतु तुम्ही मला लग्न झाल्यापासून वागवीत नाहीं, मारहाण करतां व एक वर्षापूर्वी तुम्ही मला माझे कपडे व अंगावरील माझे माहेर कडील डागीने हिसकून घेऊन घरांतून घालविलें व पुन्हां माझे घरीं येशील तर तुझे जिवास धोका करीन असा धाक घातला या संबंधीं पंचांस ही माहीत आहे. हल्लीं मी माझे बापाचे मार्फत कर्ज काढून खात आहे. कर्ज ६० रुपये झालें आहे व आतां कर्जहि कोणी देत नाहीं. करितां नोटीस देणें भाग झालें, या नोटिशीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं, माझे पोटखर्चाचे झालेलें कर्ज ६० व माझे मालकीचे डागीने वगैरे जे तुम्ही हिसकून घेतले ते माझे मला द्यावे व माझे प्राणास तुमचे कडून काहीं धोका होणार नाहीं याबद्दल योग्य जामीन देऊन मला घेऊन जावे. या प्रमाणें ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तुमचे कडून न झाल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझेवर कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. या नोटीशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावें. ता. ७-३-१० इ०

सही
अजीजबी बाप मुरादखान मु. सिंदखेड
राजा ता. मेहेकर जि. बुलढाणा.
नो. नं. ठ १

## पोटमक्त्यानें देणें आहे.

अवांस १९१०-१९११ साला करितां खालील दारूचीं व आफूचीं दुकानें पोटमक्त्यानें देणें आहे. ज्यास घेण्याची इच्छा असे त्यांनीं ता० २९-३-१९१० च्या आंत अंमांस आमचे नदीजवळील आफिसांत समक्ष येऊन भेटावें.

दारूचीं दुकानें
१ आकोला दुकानें तीन
२ बोरगांव
३ येलवण
४ बोरगांव मंजू
५ शिंदखेड
६ चिखलगांव
७ हातोडी

आकोला तालुका
८ वाघोली

आकोट तालुका
१ आकोट दुकानें दोन
२ बोर्डी
३ आसेगांव

नो० नं० ट ९४

आफूचीं दुकानें
१ आकोला २ दुकानें
२ सांगवी बाजार
३ हातोडी
४ गोरेगांव
५ बार्शिटाकळी

बाळापूर तालुका
१ निमकर्दा

आकोला तालुका
२ व्याळा

महमद नजीरुद्दीन
अबकारी कॉन्ट्राक्टर
आकोला.

## नोटीस

नोटीस बेशमी मगणीराम तनसुखराय दुकान तेल्हारें मालक ब्रिजमोहन छेडमल अ० पा० क० आई पन्नाबाई जवंज छेडमल राहणार तेल्हारें तालुके आकोट यास –

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचे मुंबई येथें मगणीराम तनसुखराय या नावाचें दुकान होतें त्या दुकानांत आमचे मुद्दल रुपये २०२१ संवत १९६५ चे कार्तीक शु॥ १ रोजीं घेणें निघाले त्यापैकीं ९५० रुपयाच्या तेल्हारे दुकानच्या आसाम्या व हुकूमनामे वसूल दिले ते जातां बकी रुपये ११८१ व शिवाय व्याज असें तुमचे कडे घेणें निघतात सदर्हू रक्कम ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत व्याजासुद्धां आह्मांस देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास सर्व रक्कम लगायत मितीपासून एक रुपया प्रमाणें व्याजासह भरून घेतली जाईल. नोटीस खर्च तुमचेवर बसेल. कळावे तारीख १८ माहे ३ सन १९१० इसवी. सही

शिवलाल रामरतन मालक रामरतन
नो. नं. ठ. २ शिवलाल दस्तुर खुद

## जाहिरात.

जाहिर खबर आकोटचे रहीवाशी लोक व इतर गांवच लोक यांजला असें कळविण्यांत येतें कीं शेखमुनीर वल्द महंमद अजीम इनामदार वस्ती अकोट हा मरण पावला असून या मयतास वारस दोन बायका एक नामे चांदबी मर्द शेखमुनीर ही असून एक मुलगा व एक मुलगी अशी दोन आहेत व ती अज्ञान आहेत. दुसरी बायको रहीमबी मर्द शेखमुनीर असे वारस आहेत. मयताची शेती बहु आहे. ह्या मयताचे शेतांची मालकी सदर्हू दोन बायका व अज्ञान मुलगा व मुलगी असे आहेत. याचे मिळकतीवर शेख अबद व शेखइभ्राहीम वल्द शेखइमाम या उभयतांचा कोणताहि प्रकारचा हक्क नाहीं, या उभतांनीं कोणतेहि सावकारास गहाण किंवा दुसरे कोणतेहि रीतीनें दिल्यास सावकार लोकांचे दस्तऐवज पोकळ समजले जातील. या उभयतां बंधूना मयत शेखमुनीर याचें शेती बद्दल कोणतेहि प्रकारचा हक्क नाहीं- कळावें ता० १३ मार्च सन १९१० इ.

सही
गुलाम रसुल वा। शेख मुनीर अ० पा० आई
चांदबी मर्द शेख मुनीर नि. खु.
नो. नं. ठ ३ रहीमबी मर्द शेखमुनीर द. खु.

## नोटीस

नोटीस बेशमी १ बळीराम पांडुजी पाटील, २ कवडू वा॥ जानजी पाटील ३ पुंनाजी वा॥ वा॥ सखाराम पाटील सर्वजण रा० जस्तगांव ता॥ आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे जस्तगांव ता॥ आकोट येथील शेत सर्वे नंबर ६४ चें शेत आमचे जवळ आज २ वर्षापासून खरेदी आहे व खरेदीखत रजीष्टर झालेलें आहे. असें असून तुम्ही लबाडीनें व आमचे नुकसान व्हावें या बुद्धीनें दोन वर्षे आम्ही वाहिलें असतां पीक तुम्ही जबरदस्तीने नेलेत तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत वर्षे २ चे पिकाची नुकसानी दरसाल १०० रुपये प्रमाणें २०० आह्मांस आणून द्यावी न दिल्यास कोर्ट मार्फत योग्य तजविज केली जाईल व ह्या नोटीशीचा खर्च तुम्हांपासून घेतला जाईल कळावें तारीख १७-३-१० इसवी. सह्या

शामराव नन्ही पाटील द० खु०
जानराव बाळकृष्ण पांडे गाडेगल
नो. नं. ठ. ३ तर्फे शामराव द० खु०

## वर्तमानसार

मँचेस्टर येथील कॉटन फेडेरेशनला अशी बातमी आली आहे कीं, इटलीमधील तीन लक्षांहून अधिक अशा गिरणीदारांनीं दर पंधरवड्यास सुताची मोजदाद करण्याचें ठरविलें आहे. व दरमहा कामाची वेळ किती कमी करावयाची त्याचा विचार व्हावयाचा आहे. स्पेन व पोर्तुगाल यांनीं शेंकडा ३० प्रमाणांत काम करावयाची वेळ कमी केली आहे. स्पेनचा हा बेत उन्हाळ्यापर्यंत चालू ठेवण्याचा आहे.

बाबु अश्विनी कुमार दत्त यांचें एक जंगी जाहीर सभेंत व्याख्यान झालें. ते ह्मणाले, 'माझ्या प्रतिनिधीस ना. व्हाइसराय यांच्याकडून माझ्या हद्दपारीचें कारण लोकांत क्षुब्धता वाढविणें हें होय असें सांगण्यांत आलें. मला माझ्यावर कोणता विशिष्ट आरोप होता तो मला समजावयास पाहिजे होता. टाइम्स पत्रानें ह्मटल्याप्रमाणें मी चपराशी, मॅजिस्ट्रेट इत्यादि सरकारी कामगारांस त्यांच्या कामगिरीपासून तर परावृत्त केलें नाहीं. जातिजातींत मी सख्यभावच वाढविण्याचे प्रयत्न केले आहेत. लोकांनीं स्वदेशी माल न वापरल्यास मी त्यांना मारहाण कधीं केली नाहीं. स्वदेशी व्रत हा अपराध नव्हता. कारण प्रत्यक्ष सरकारनेंच मला कैदेंत स्वदेशी माल वापरण्याची परवानगी दिली होती. स्वदेशी चळवळ ही कायदेशीर आहे आणि ह्मणून ती मोठ्या जोरांत चालू ठेविली पाहिजे. अराजकतेचा या चळवळीशीं कांहींही संबंध नाहीं. बंगाली लोकांच्या हातून जर कांहीं अपराध घडला असेल तर तो सरकारच्या कृत्यांवर टीका करणें हा होय. परंतु त्यांत तरी राज्यव्यवस्थेंत सुधारणा व्हावी हाच उद्देश होता. निर्व्यंग असें कोणतें सरकार आहे."

ग्रे इननें बॅरिस्टरची पदवी देण्याचें नाकारिल्यापासून सावरकर यांजवर पोलिसी सारखी नजर होती. सावरकर यांस पकडल्यानंतर ता० १४ रोजीं बोस्ट्रीट येथील कोर्टांत त्यांना उभें करण्यांत आलें. धरपकडीसंबंधाच्या तात्पुरत्या साक्षी नोंदण्यांत आल्यानंतर हा खटला तहकूब ठेवण्यांत आला. जामीनासंबंधाचा अर्ज नामंजूर करण्यांत येऊन त्यांना जामिनावर सोडण्याचें नाकारण्यांत आलें.

आजपर्यंत तिकडील भागांत पुष्कळ चोऱ्या व बऱ्याचशा घरफोड्या केलेल्या एका चोरांच्या टोळीचा पत्ता पुणें पोलिसांस अवचित लागला. पुणें येथें एका बाईचा खून करण्याचा प्रयत्न झाला. त्या संबंधांत तपास चालू असतां बऱ्याचशा जमाखर्चाच्या वह्या व कांहीं माल पोलिसांना सांपडला. जास्त तपासासाठीं पुण्याचे सब पोलिस इनस्पेक्टर मि० मोहिद्दीन व गुप्त पोलिस खात्यांतील मि कोगजे यांची नेमणूक झाली. त्यांनीं ९६ इसमांच्या एका टोळीचा पत्ता लाविला आहे. हे लोक ठाकूर जातीचे असून बडोदें संस्थानापैकीं कडी प्रांतातील खेडगांवचे रहिवाशी असल्याचें समजतें. ६ इसम तूर्त पकडून अटकेंत ठेविले आहेत. २० इसमांवर वारंटें सुटलीं आहेत हे इसम बडोदें व महिकांठा या प्रांतीं आहेत. बाकीचे इसम फरारी आहेत.

वकीलांच्या यादींतून नांव कमी केल्यावरून मि० रॉबर्ट ब्रॅमिंग यांनीं प्रीव्ही कौन्सिलकडे अर्ज केला होता. परंतु तो मंजूर झाला नाहीं.

प्राशीयन लोकतर्फेचे लोकांवर ता० ६ रोजीं टेपटोपार्कमध्यें पोलिसांनीं पिस्तुलें मारण्यास व तरवार चालविण्यास हुकुम सोडला. या गर्दींत तीस लोकांना जखमा झाल्या व शंभर लोकांना पकडलें आहे. थीरगार्टेन येथें ४०,००० लोकांची निषेधप्रदर्शक सभा भरली होती. येथून नंतर ते पार्लमेंटच्या इमारतीकडे गेले व तेथें त्यांनीं तांबडीं निशाणें लाविलीं व व्याख्यानें दिलीं. टेपटोपार्कमध्यें बरेचसे पोलीस अडकल्यानें यांचा बंदोबस्त पोलिसांकडून होणें अशक्य होतें.

ता० ५ रोजीं मिशिफ यांचें एक भाषण झालें त्यांत त्यांनीं ह्मटलें " आतां युद्धप्रसंगाचा समय आला तर पूर्वेकडून येणार आहे. **चीन सरकारला मांडलिक वृत्तींत** ठेवण्याच्या विचारानें जपान रशिया व ग्रेटब्रिटन यांच्यांत तह झाला आहे. या तीन निरनिराळ्या सरकारच्या एकत्र झालेल्या फौजेनें सगळ्या राष्ट्राला दहशत बसणार आहे. या एक जुटीस मोठ्या मुत्सद्दीपणानें तोंड दिलें नाहीं तर अमेरिकेसही या पौर्वात्य विषयक प्रश्नांत पडावें लागण्याचा प्रसंग येणार आहे.

सर करीमभाई इब्राहिम यांनीं शास्त्रीय शिक्षणाकरितां साडेचार लाख रुपये ना० सर जॉर्ज क्लार्क यांचे हवालीं केले आहेत. शास्त्रीय व धंदेविषयक शिक्षणाची हिंदुस्थानास अत्यंत आवश्यकता आहे हें ओळखून व ही गरज थोडीबहुत भागविण्यासाठीं सर्व जातींच्या तरुणांच्या व विशेषत मुसलमान तरुणांच्या फायद्याकरितां आपण ही देणगी देत आहों असें त्यांनीं आपल्या पत्रांत ह्मटलें आहे. शास्त्रीय शिक्षणांत सुधारणा करणें, औद्योगिक प्रगत्यक होणाऱ्या शास्त्रीय शिक्षणास उत्तेजन देणें व आपल्या नांवानें मुसलमान विद्यार्थ्यांना शास्त्रीय शिक्षणासाठीं स्कॉलरशिपा देणें या कामांत आपल्या देणगीचा विनियोग व्हावा अशी त्यांची इच्छा आहे.

पॅरिसहून पायोनियरला एक पत्र आलें आहे. त्यांत श्यामजी कृष्णवर्म्याच्या एका पट्टशिष्यानें त्यांच्या कृष्ण स्वरूपाचें उद्घाटन केलें आहे. ते आपस्वार्थी, लबाड, खुनशी, विश्वासघातकी, निर्दय आहेत असें त्याचें ह्मणणें आहे.

तंबाकूवर जकात बसवतांना हिंदुस्थान सरकारनें बादशहा सातवे एडवर्ड यांचें मत घेतलें होतें काय असें मि. स्टुअर्ट यांनीं विचारलेल्या प्रश्नास मांटीग 'हो' ह्मणाले. आणखी वरील प्रकारच्या प्रश्नास उत्तरादाखल बोलतांना ते ह्मणाले लॉर्ड मोर्ले हे या प्रश्नावर अधिक विचारपूर्वक करीत आहेत. अफूच्या बाबतींत झालेलें **नुकसान भरून काढण्याचा विचार** कायम झाला आहे. **देशी तंबाकूवरही** कराचें **प्रमाण काय आहे त्याचा सरकार लौकरच** विचार करणार आहे.

## साहित्य समागम.

—*:*:-*::—

विविधज्ञानविस्तार— या सर्वमान्य मासिकाचा ताजा ( मार्च ) अंक जरी विषयाविविधतेंत मागासलेला आहे तरी विषयप्रतिपादनांतील उच्चपणांत उणेपणा आलेला नाहीं. आरंभीं इतिहास संशोधक रा. राजवडे यांच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या दहाव्या खंडाचें परीक्षण कोणा तरी वाकबगार इतिहासलेखकाकडून करविलेलें आहे. रा. राजवाडे यांचीं हीं साधनें प्रसिद्ध होत असतांना बहुधा प्रस्तावनेवरून बरेंच वादळ माजतें. सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेमुळें तर या प्रस्तावना ह्मणजे न टळणारा अनिष्ट प्रकार अशी स्थिति होऊन बसते कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. सुदैवानें दहाव्या खंडाचें प्रकाशन पूर्वींच्या प्रकाशकांपेक्षां वाङ्मयाशीं जास्त परिचय असलेल्या व आपल्यावरील जबाबदारीची जाणीव असलेल्या एका संस्थेच्या विद्यमानें झाल्यामुळें या खंडाच्या प्रस्तावनेंत पूर्वींच्या अनिष्ट प्रकाराचें अतिसंक्षिप्त रूप प्रसिद्ध झालें आहे. विस्ताराच्या परिक्षकानें या बाबतींत रा. राजवाडे यांची पोक्तपणानें चांगलीच कान उघाडणी केली आहे.

खुद्द रा. राजवाडे यांच्या नेहमींच्या अव्यवस्थित रीतीवर व इतिहासकारास न शोभणाऱ्या प्रवृत्तीवर टीका करतांना परिक्षकानें इतिहासाच्या शास्त्रदृष्टीनें विचार केला आहे. तेवढा भाग विशेष वाचनीय आहे. विस्ताराच्या परिक्षकाचें प्रतिपादन असें आहे कीं, पुष्कळशा भाराभर गोष्टी माहित असल्या ह्मणजे इतिहास होत नाहीं. इतिहासशास्त्र व गणित इत्यादि शास्त्रांत महदंतर आहे. या दुसऱ्या वर्गांतील शास्त्रांत थोडें बहुत सत्य कायमचें ठरलेलें असतें. पण तेंहि तात्पुरतेंच असतें हें, हजारों वर्षें चालत आलेलीं अनुपानें नवीन शोधांनीं खोटीं ठरतात, या वरून दिसून येतें. ह्मणून त्रिकालाबाधित सत्य ह्या जगांत फारच थोडें आहे. इतिहासशास्त्रांतील सत्य तर इतर शास्त्रांहून अगदींच भिन्न असावयाचें. इतिहासाचा विषय ह्मणजे मानवी मन होय. मानसशास्त्राची जसजशी प्रगति होत जाईल तसतसा इतिहासशास्त्रावर जास्त जास्त प्रकाश पडेल. एकंदर मानवी समाजाशीं इतिहासाचें काम पडतें त्या मुळें इतर शास्त्राप्रमाणें इतिहासास कायमचें स्वरूप येणें शक्य नाहीं. ऐतिहासिक सत्य दुर्मिळ आहे. पण कोणी अशी शंका घेईल कीं जो प्रकार घडला त्यांत तफावत पडणें शक्य नाहीं. तफावत विवेचनांत किंवा कार्यकारणभावाच्या संशोधनांत पडेल **पण हें ह्मणणें बरोबर** नाहीं. कोणतीही गोष्ट पृथक् करणानें तपासून पाहूं लागलें असतां निराळाच प्रकार दृष्टोस पडतो, आणि निव्वळ सत्य असें फारच थोडें शिल्लक रहातें ह्मणून ऐतिहासिक सत्य ही वस्तु नाहीं. तें सत्य सर्वथैव अपूर्ण किंवा पाक्षिक आहे. निरनिराळ्या पक्षास तेंच निरनिराळ्या प्रकारें दिसतें. प्रत्येकाच्या ह्मणण्यांत थोडा तरी सत्यांश असतोच. व त्यांतच आपल्या परचा असत्यांश, समजून व न समजून, तो मिसळलेला असतो. अशा स्थितींत लेखकाचा हेतु ध्यानांत आणून सत्यांशाची निवड करणें व असत्यांश उघडकीस आणणें हें काम बिकट असतें. इतिहासाचें महत्व ऐतिहासिक विवेचनांत आहे. ऐतिहासिक परीक्षणानें मनाला शोधक बुद्धीची संवय लागून, नानाविध अडचणींतून सत्यशोधन कसें करीत जावें हें समजतें. मानवी स्वभावसागरांत बुडी मारून व त्याच्या तळाचा ठाव घेऊन जीं अनुभवरत्नें हातास लागतात त्यां मुळें इतिहासास किंमत येते.

परदेशगमनाच्या प्रायश्चित्तावरून 'धर्मकारांनीं केलेल्या बाष्कळ अकांडतांडवाला विस्तारानें कां तोंड दिलें व समजत नाहीं. वादीच्याच पुराव्यावरून त्याचा दावा रद्द ठरविण्याचो कसलेल्या कायदेपंडितांची हातोटी या लेखांत उत्तम रीतीनें दिसून येते. पण आतां हा प्रश्न धर्मकार जाड्या टैपांत छापतील त्या कोणत्या तरी संस्कृत ग्रंथाच्या आधारावर अवलंबून राहिलेला नाहीं, हें निदान विस्तारकर्त्यांच्या ध्यानांत असलें पाहिजे.

या अंकांतील दुसरा वाचनीय लेख 'रंगशर्मा' या सहीनें लिहिलेला शूद्रक कवि व मृच्छकटिक या संबंधानें कांहीं विचार हा होय. या लेखाच्या रूपानें वे. शा. रंगाचार्य रड्डी यांनीं आपल्या मृच्छकटिक नाटकावरील नवीन ग्रंथाचा परिचय वाचकवर्गास करून दिला आहे. संस्कृत नाटकग्रंथांवर मराठींत अशा प्रकारचा टीकारूप ग्रंथ होण्याचा हा प्रारंभच आहे. रा. लेले यांचे ग्रंथ सार व विचारात्मक आहेत खरे पण त्यांमुळें मूळ ग्रंथाचें अध्ययन सुलभ होत नाहीं. रंगाचार्यांनीं प्रस्तुत लेखांत जें सप्रमाण विवेचन केलें आहे त्यावरून अशी प्राप्ति होते कीं शूद्रक कवि इसवी सनाच्या आरंभाच्या सुमारास अगर थोडासा पूर्वीं झाला असावा. नाटकांत येऊन गेलेल्या राज्यक्रांतीसंबंधीं वर्णनावरून हें नाटक रचलें जाण्यापूर्वीं लवकरच राज्यक्रांति झाली असली पाहिजे. अंतर्गत पुराव्यावरून स्थूल अनुमानानें आंध्रभृत्यांचा मूळपुरुष जो शूद्रक तोच या नाटकाचा कर्ता मानण्यास हरकत नाहीं. याचा काल इ. स. पूर्वीं ७३ पासून ५० पर्यंत मानलेला आहे. या नाटकांतील प्राकृत भाषाबहुल्यावरून त्या भाषेच्या उत्कर्षाच्या काळांतलें हें प्रकरण आहे असें दिसून येईल. आंध्र देशचे राजे प्राकृत भाषेचे अभिमानी होते. या काळांत आंध्रभृत्यांच्या मूळपुरुष शूद्रकावांचून दुसरा कोणी त्या नांवाचा राजा झालेला नाहीं. या नाटकांतील शकार हा हीनकुलीन राजपत्नीचा बंधु ह्मणून शकवर असें नामाभिधान पावला असावा. त्याच शब्दाचा शकार हा अपभ्रंश असेल. शाकारी भाषा शकांनीं—शकांनीं नाटकांत बोलावी असें साहित्यग्रंथांत आहे. बौद्धधर्माचा थोडासा उतरता काल व वैदिकधर्माचा उत्कर्षकाल यांच्या संधीस हें नाटक रचलें गेलें असावें. कल्पना वैचित्र्य व प्रतिभा सौंदर्य विशेष असलेल्या कविवरांच्या ह्मणजे कवींच्या

पहिल्या वर्गांत या कवीला स्थान मिळत नसून संविधानक चातूर्य व कथानक बहारीचें बठविण्यांत कुशलता हे विशेष गुण अंगीं असणाऱ्या ह्मणजे दुसऱ्या वर्गा च्या कवींत याची गणना होते. या नाटकाचें संविधानक केवळ कल्पित नसून चारुदत्तवसंतसेनासंबंध व राज्यक्रांति या घडलेल्या गोष्टींचें हें वर्णनात्मक संविधानक आहे. हें नाटक समाज स्थितीचें चित्र डोळ्यापुढें उभें करण्याकरतांच लिहिलें आहे' त्या काळची समाजस्थिति व राज्यव्यवस्था चांगली नव्हती असें दिसतें. वे. शा. रंगाचार्यांच्या विवेचनावरून मूळनाटकाच्या स्वरूपावर बराच प्रकाश पडेल असा आह्मांला भरंवसा आहे.

---

वऱ्हाडसमाचार.

फाल्गुन शुद्ध ११. शके १८३१.

---

## जमाखर्चाच्या खर्ड्यावरील ठराव.

—:०:※:०:—

हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत पुढील वर्षाच्या जमाखर्चाच्या खर्ड्यावर झालेल्या वादविवादानंतर ठरावांच्या रूपानें निश्चित सूचना करण्याच्या समयाची संधी लोकपक्षीय नामदार सभासदांनीं कशी साधली हें मागील अंकांत संक्षेपानें दाखविलेंच आहे. आज त्याच बाबीचें जास्त सविस्तर पर्यालोचन करावयाचें आहे. जमाखर्चाचा खर्डा मंजूर करण्यासाठीं सबंद कौन्सिलच्या कमिटींत निघाला तेव्हां लोकनियुक्त सभासदांपैकीं फक्त तिघांनींच त्या खर्ड्यांत कमीजास्त करण्याच्या सूचना ठरावांच्या रूपानें आणल्या. या ठरावांबद्दल ना. गोखले, ना. दादाभाई व ना. मुधोळकर यांचें सर्व राष्ट्रानें अभिनंदन केलेंच आहे. या तिघांपैकीं दोघे गृहस्थ मध्यप्रांतातर्फेचे सभासद व त्यापैकीं एक खुद्द वऱ्हाडप्रांतातर्फेचे लोकमान्य पण सरकारनियुक्त सभासद आहेत, या बद्दल आह्मांला विशेष आनंद होणें साहजिक आहे. सर्व सभासदांना असे ठराव आणण्याचा मार्ग मोकळा होता, पण कित्येकांनीं वर सांगितलेल्या तिघा सभासदांच्या ठरावांवर त्रोटक भाषणें करूनच आटोपतें घेतलें. बाकीचे तर निःशंक मनानें उगाच चाललेला प्रकार अवलोकन करीत बसले. यंदाचें हें नव्या कौन्सिलचें पहिलेंच वर्ष आहे, तेव्हां पुढील वर्षीं या स्थितींत बरीच सुधारणा होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. ह्मोरक्याचा निकाल लावला ह्मणजे बाकीच्यांची पांगापांग आपोआप होते असा अनुभव आहे. जमाखर्चावरील वादविवादांत ना. गोखले यांची स्थिति जवळ जवळ अशीच आहे. येथपर्यंत त्यांना दरवर्षीं साधारणपणें एकंदर स्थितिरितीवर भाषण करावें लागत असे. नव्या कौन्सिलांच्या घटनेनें मिळालेल्या नवीन संधीचा फायदा त्यांनीं उत्तम प्रकारें घेऊन त्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळत असणाऱ्या सार्वजनिक प्रश्नांसंबधानें राष्ट्रहिताची जपणूक करण्याचा प्रयत्न त्यांनीं प्रशंसनीय रीतीनें केला. यंदांचीं त्यांचीं निरनिराळ्या मुद्यांवरचीं भाषणें लक्षपूर्वक वाचल्यास कोणालाहि निःसंशय असें वाटेल कीं ना. गोखले हे हिंदुस्थानचे फडणीस होण्यास पूर्णपणें लायक आहेत इतकेंच नव्हे तर त्यांच्या हातून लोक व सरकार या दोघांच्याहि हिताची सारखीच जपणूक होईल. पण अशा कर्तबगारीच्या राजकारणपटूही नुसती टीका करीत बसण्यापलीकडे मार्ग नाहीं हें किती खेदकारक आहे? पारतंत्र्याचा हा एक मोठा तोटा असतो कीं परतंत्र राष्ट्रांतील बुद्धिमान पुरुषांना अनियंत्रित सत्ताधारी अधिकारीवर्गापुढें निमूटपणें मान वांकवून त्यांच्या पद्धतीनुरूप व इच्छेनुरूप चालवें लागतें. हें एकदां खुद्द ना. गोखले यांनींच बोलून दाखविलेलें आहे. पण अशा विचारांत मनाला गढून जाऊं देण्यापासून कांहीं फायदा नाहीं. उलट यंदां हिंदुस्थानच्या इतिहासांत एका नवीन व सुधारलेल्या राज्यपद्धतीचा उगम झालेला आहे आणि कालानुरोधानें आमच्या लोकांच्या अंगच्या कर्तबगारीची ओळख जों जों जास्त पटत जाईल, तसतसा सार्वजनिक सेवेचे नवे नवे मार्ग त्यांना मोकळे होतील, आणि या सर्व प्रगतीची पूर्तता साम्राज्यांतर्गत स्वराज्यांत होईल अशी आशा धरून तूर्त राहिलें पाहिजे.

कौन्सिलाच्या कमिटींत जमाखर्चावर विचार चालू झाला तेव्हां ना. गोखले यांनीं अशी सूचना केली कीं, दुष्काळ निवारणासाठीं राजूस काढून ठेवलेल्या ग्रँटचा विनियोग त्याचकामाकडे करण्याची सर्वतोपरी जरूर नसेल तेव्हां ती कर्ज न होऊं देण्याकडे व सार्वजनिक उपयोगाच्या मोठाल्या कामांकडे खर्च होत असते ती बंद करावी. ही सूचना हिंदुस्थान सरकारचे फडणीस सर गाय फ्लीटवुड विल्सन यांना मान्य झाली नाहीं. त्यांनीं यावर असा उत्तरपक्ष केला कीं हिंदुस्थानांत दुष्काळाची भीति जोंवर आहे तोंवर दुष्काळनिवारणा प्रीत्यर्थ ही ग्रँट कायम रहावी. पण हा पैसा कर्ज फेडण्याकडे जावा किंवा कसें हा प्रश्न आहेच. सरकारनें केलेल्या वसुलांतील हा पैसा आहे आणि दुष्काळानें [illegible] कमी व्हावें ह्मणून त्याचा उपयोग व्हावा असा त्यांतील हेतु आहे. अनुत्पादक कर्ज फेडण्याकडे त्याचा विनियोग व्हावा असा त्यांतील हेतु नाहीं. ना. गोखले यांचें मत असें आहे कीं तो पैसा शिक्षण, आरोग्य इत्यादि लोकांच्या स्थितींत सुधारणा करणाऱ्या बाबींकडे खर्चीं घालवा. त्यांनीं सर गाय विल्सन यांना उत्तर देतांना असें सांगितलें कीं जरी हा सर्व पैसा संरक्षक अशा कामाकडे सरकारनें खर्च केला तरी तो मार्ग सध्यांच्या मार्गाहून बरा आह्मांला या संबंधांत इतकेंच दाखवावयाचें आहे कीं दुष्काळाची भीति [illegible] आहे हें आह्मी जाणून आहों आणि तो न यावा अशी अगाऊ तजवीज करण्याची जरूरी आहे हेंहि आह्मांला मान्य आहे तरी दुष्काळनिवारण ग्रँटचा विनियोग कर्ज वारण्याकडे केल्यानें हे दोन्ही साधावयाचे नाहींत. त्या हेतूच्या पूर्ततेसाठीं ही रक्कम संरक्षक अशा पाटबंधाऱ्यांच्याच कामीं खर्च झाली पाहिजे, किंवा ना० गोखले यांनीं सुचविल्याप्रमाणें ऋणेंकरून लोकांच्या अंगीं दुष्काळाशीं झगडण्याचें सामर्थ्य येईल अशा कामीं तिचा विनियोग केला पाहिजे. पाटबंधाऱ्यांच्या तरफदारीला ना. दादाभाईंच्या सारखा दुसरा गृहस्थ मिळणें कठिण होतें. त्यांनीं आपल्या मुद्याचें विवेचन अत्यंत विशदपणें केलें होतें. पण तितक्या गुणज्ञतेनें त्यांना ना. सर विल्सन यांनीं उत्तर दिलें नाहीं. ना. दादाभाई यांचें इतकेंच ह्मणणें होतें कीं इरिगेशनकमिशननें सुचविलेल्या सीमेपर्यंत पाटबंधाऱ्यांवरील रक्कम वाढवावी. त्या कमिशनांतील सभासद कर्तबगार आणि खिसे असून अडचणी शक्य तितक्या टाळून सूचना करण्याकडे त्या कमिशनचें विशेष लक्ष होतें हें सुप्रसिद्ध आहे. वीस वर्षांच्या मुदतींत चवेचाळीस कोटी रुपये पाटबंधाऱ्यावर खर्चावे असा त्या कमिशनचा अभिप्राय होता. त्या वेळीं कित्येकांनीं अशी टीका केली होती कीं या गतीनें प्रगति अगदींच संथ होईल, ह्मणून हा खर्च दहा वर्षांत व्हावा असें सुचविलें असतें तर बरें झालें असतें. परंतु तूर्तपुरतें कमिशनचा अभिप्राय हा या विषयावरील शेवटचा अधिकारयुक्त अभिप्राय असें मानण्याकडे साधारण प्रवृत्ति होती. कमिशननें अतिशय खबरदारी घेऊन सुचविलेला संथपणाचा कार्यक्रमहि अंमलांत येणार नाहीं अशी कोणालाहि कल्पना नव्हती. कमिशनच्या रिपोर्टाला सात वर्षें होऊन गेलीं, पण त्यांत ठरवून दिलेली २२० लक्षांची रक्कम आतांपर्यंत कोणत्याहि वर्षीं इरिगेशनवर खर्चीं पडली नाहीं. रेल्वे विस्ताराचा प्रश्न असला ह्मणजे सरकार किती तत्परता दाखवितें हें याशीं ताडून पहाण्यासारखें आहे! इरिगेशनवर १७० लक्षांपर्यंत खर्च असा हा यदांच्याच वर्षीं व्हावयाचा आहे. आणि याच वर्षीं सुमारें साडे सोळा कोटि रुपये रेल्वेवर होणार आहे. आणि पुनः हिंदुस्थान हा विशेषेंकरून शेतकऱ्यांचा देश असून अनियमित पर्जन्यावर शेतीचें [illegible] अवलंबून रहावें लागतें तें न लागावें ह्मणून पाण्याचा भरपूर सांठा करून ठेवणें अगत्याचें आहे ही चर्पटपंजरी चालूच आहे! व्यापारी दृष्टीनें पाहिलें तरी इरिगेशनचीं कामें रेल्वेपेक्षां जास्त भरंवशाचीं आहेत असें आढळून येतें. या सर्व बाबींचा विचार केला ह्मणजे लोकांची बुद्धि ना. दादाभाईंचा ठराव रास्त होता असेंच मानण्याकडे राहील, ना. मिस्तर यांच्या टडवाउडवीच्या उत्तरानें त्यांचें समाधान होणार नाहीं हें उघड आहे. सदरहू ठराव मंजूर झाला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या वेळीं नव्या लोकमताकडे हा ठराव [illegible] मंजूर [illegible] मानून येतां येण्यासारखें आहे तारखातें, स्टेशनरी व स्टांपखातें यांवर होणाऱ्या खर्चा संबंधाचे ना. गोखले यांचे ठराव आणि मध्य प्रांतांतील शिक्षण व आरोग्य या संबंधाचे ना. मुधोळकर यांचे ठराव मुख्यत्वेंकरून सरकारच्या नजरेपुढें ते विषय आहेत किंवा नाहींत हें पहाण्यापुरतें व कांहीं माहिती काढून घेण्यापुरतेच होते. त्यांतील हेतु सफल झाल्यावर ते ज्याचे त्यांनीं मागें घेतले. रेल्वेच्या चालू खर्चासंबंधींचा ठराव नामजूर झाला. या खर्चाची बाह्य मर्यादा शें. ९० इतकी ठरवून टाकावी हें ना. गोखले यांचें ह्मणणें रास्त होतें. खुद्द रेल्वेच्या किंवा एकंदरीनें सरकारच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करतां या पेक्षां जास्त खर्च होऊं देणें रास्त नाहीं. रेल्वेच्या उधळेपणाविषयीं सर एडवर्ड बेकर यांनीं गतवर्षींच चांगली कान उघाडणी केलेली होती. परंतु सदूसद्विचाराच्या दृष्टीनें जरी ना. गोखले यांचा ठराव रास्त होता तरी सरकारच्या फडणिसांना तो मान्य न झाल्यामुळें लोकपक्षाच्या मताची शेवटीं पायमल्ली झाली.

---

## संदेश

( बेझंटबाई व भगवानदास यांचा संदेश. )

—:०:+:०:—

बनारस येथील सेंट्रल हिंदू कॉलेजाचे माजी विद्यार्थ्यांचे सम्मेलनास जाणाऱ्या एका हिंदी विद्यार्थ्यास एका इंग्रज दांडग्यानें ‘ चल नीघ हिंदी कुत्र्या येथून ’ असे आगगाडीचे डब्यांत अपमानकारक शब्द उच्चारून त्यास बाहेर घालविलें. तो हिंदू विद्यार्थी तेथून निघून दुसऱ्या डब्यांत बसला पण झालेल्या अपमानानें त्यास संताप येऊन त्यानें सर्व हकीकत कॉलेजाचे प्रिन्सिपाल ॲरंडेल यांना बनारसला गेल्यावर सांगितली त्यांनीं त्याचें सांतवन केलें. ही गोष्ट बेझंटबाईच्या कानावर गेल्यावर झालेली हकीकत हिंदी काय किंवा युरोपियन काय दोन्ही जातींच्या भावी प्रगतीस अनिष्ट असल्यावरून त्यांनीं कॉलेजाचे मागील महिन्याचे मासिकांत ‘ युरोपियन लोकांस व सरकारास विज्ञाति ’ ह्मणून एक मणसणीत व निर्भीड असा लेख लिहिला त्यांत त्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं इंग्रज व हिंदी प्रजाजन हे कांहीं ईश्वरी संकेतानें एके ठिकाणीं हिंदुस्थानांत संबंधी झाले आहेत. दोघां मध्यें प्रेमभाव व एकमेकाविषयीं आदर ही दोघांचेहि भावी उत्क्रांतीस सहायक आहेत असें आमचें मत असल्यावरून तशा धोरणानें आह्मी कॉलेजाचें कार्य करीत आहों. परंतु सदरहू सारख्या गोष्टींनीं सदरहू विद्यार्थ्यांच मनांतील कित्येक वर्षांचे मोठ्या मेहनतीनें वाढविलेले प्रेमांकुर एका क्षणार्धांत करपून जाऊन सर्व कार्याचें चीज नाहींसें झालें. अशा कृत्यांनीं अराजक वृत्तींच्या हिंदी प्रजाजनामध्यें प्रादुर्भाव होण्यास मदत होते, तरी हिंदुस्थानातील सर्व इंग्रजांनीं हिंदी प्रजाजनांशीं बंधुभावानें व प्रेमानें वागावें व सरकारानेंहि असें वर्तन होण्याबद्दल [illegible] असें मोठ्या कळकळीनें लिहिलें होतें त्याच मासिकाचे या महिन्याचे अंकांत कॉलेजाचे सेक्रेटरी बाबू भगवानदास यांनीं ‘ हिंदी विद्यार्थ्यांस विज्ञाति ’ ह्मणून एक दुसरा लेख प्रसिद्ध केला आहे व त्यांत दुसरी बाजू मांडली

आहे; जशी बेझंट बाईनीं आपल्या देशबांधवांना विज्ञाप्ति केली तशी हे गृहस्थ आपल्या देशबांधवांना ह्मणजे हिंदी विद्यार्थ्यांना विज्ञप्ति करीत आहेत. ते ह्मणतात. ‘ आज जे तुह्मी विद्यार्थी दशेंत आहां तेच कांहीं वर्षांनीं नागरिक बनाल तर सध्यांच्या प्रसंगीं इंग्रज व हिंदी यांच्यामध्यें ऐक्यभाव वाढविण्यास झटा. ज्या प्रमाणें लॉर्ड मिंटो यांनीं सध्यां देशांत खुनादि अत्याचार चालेले असतांना किंबहुना स्वतःचे व आपल्या पत्नीचे जिवावर सुद्धां प्रयत्न झाले असतांनासुद्धां आपल्या मनाची समतोल व न्यायबुद्धि ढळू दिली नाहीं त्याचप्रमाणें आपणही आपल्या कांहीं देशबांधवांचा अपमानही झाला तरी असे प्रसंग एकंदर शांततेच्या मानानें फारच कमी आहेत असें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कांहीं बेजबाबदार ॲंग्लो-इंडियन पत्रकारांनीं आपल्या नालस्तीची भाषा वापरल्यास आपण क्षुब्ध होतां कामा नये. कारण अलीकडे सर्व जबाबदार अधिकारी जेणेंकरून दोन जातींचा सलोखा जास्त होईल अशी खटपट करीत आहेत व त्यांना आपण मदत केली पाहिजे. घडून आलेल्या अनिष्ट गोष्टींचें सर्व पत्रांतून एका मागून एकसारखें चर्वण झाल्यानें लोकांचीं मनें क्षुब्ध मात्र जास्त होतात व क्रोधाग्नी जास्त पेट घेत जातो. हिंदुस्थानचा गेल्या कांहीं शतकांचा इतिहास निरीक्षण केल्यास असें आढळेल कीं आपल्यांतील दाननीचा, शिस्तीचा व करारीपणाचा व राष्ट्रैक्यबुद्धीचा अभाव हींच आपल्या अधोगतीचीं इतर कारणांपेक्षां जास्त महत्वाचीं कारणें होत हें लक्षांत घेऊन पूर्वेतिहासांतील अनिष्ट गोष्टी उगाळीत न बसतां भविष्यावर नजर देऊन वर्तन ठेविलें पाहिजे व जेणेंकरून दोघांची ऐक्यबुद्धि जास्त वाढेल असें वागलें पाहिजे. या प्रमाणें दोघांहि आपापल्या देशबांधवास अथवा देहबांधवास केवळ भावी कालाकडे नजर देऊन आपापल्यापरी उपदेश करून शांततेचा मार्ग दाखवीत आहेत व हें त्यांचें कार्य सध्यांच्या प्रक्षुब्ध स्थितींत विशेषच श्रेयस्कर व रमणीय वाटत आहे. प्रक्षुब्ध होण्यासारखी स्थिति झाली असतां विवेकभ्रष्ट झाल्यानें दोघांचेंही नुकसानच आहे हें सांगणें नको. तेव्हां अशा स्थितींतसुद्धां जे इंग्रज व हिंदी आपला विवेक सांभाळतील त्यांच्या हातून मोठी कामगिरी होईल व तसा प्रयत्न सदर्हू बाई व बाबूसाहेब यांचा आहे याबद्दल तीं उभयतां अभिनंदनास पात्र आहेत.

—०—

## इंग्लिशमनचें अपील.

—:०※०:—

लाला लजपतराय यांची बदनामी केल्याच्या संबंधांत न्या. फ्लेचर यांनीं इंग्लिशमन पत्राच्या चालकांविरुद्ध जो पंधरा हजार रुपयांचा हुकूमनामा दिला होता त्यावरील अपीलचा निकाल लागला आहे या अपीलांत अनुनुकसानीची रक्कम पंधरा हजारांवरून दीड हजार रुपये व वादीचा खर्च इतक्यावर आली आहे. न्यायमूर्तींनीं असें ठराविलें कीं अनुनुकसानीदाखल देवविण्याची ता रक्कम भरमसाट असावी पण नियमाबाहेर नसावी आणि वादी लाला लजपतराय यांची बाजू नुकसानी विषयक बाबींच्या सर्व बाबतींत सिद्ध झालेली असल्यामुळें त्यांचा सर्व खर्च प्रतिवादीनें सोसला पाहिजे. या ठरावांत गैरअब्रूच्या बाबीसंबंधानें महत्वाचा ठराव केला गेला आहे आणि हा ठराव विशेषेकरून वर्तमानपत्र कर्त्यांना महत्वाचा आहे. न्या. फ्लेचर यांचें असें मत होतें कीं लाला लजपतराय यांची ज्या आरोपामुळें बदनामी झाली तो आरोप इं. पी. को. कलम १३१ खालीं जन्मठेप काळेपाण्याच्या शिक्षेस पात्र करणारा आहे. इंग्लिशमननें जीं विधानें केलीं होतीं तीं खोटीं होतीं आणि त्यावर केलेली टीका गैरशिस्त होती. आणि ह्मणून त्यांनीं पंधरा हजार रुपये नुकसानी भरून द्यावी, असा निकाल दिला होता. इंग्लिशमनचा मुद्दा असा होता कीं, आपण जें लिहिलें तें सर्वांशीं पार्लमेंटमध्यें प्रश्नांना उत्तरें देतांना स्टेट सेक्रेटरी फॉर इंडिया यांनीं जें सांगितलें तेंच ललेलेंत होतें. हाउस आफ कॉमन्समध्यें तशीं उत्तरें देतांना जो मजकूर सांगण्याचा स्टेटसेक्रेटरी यांना अधिकार आहे ह्मणजे ज्या मजकुराबद्दल त्यांचेवर बदनामीची वगैरे फिर्याद करता येत नाहीं, तोच मजकूर इंग्लिशमननें जशाचा तसाच छापला असता तर त्यांत कांहीं गैरकायदा काम झालें नसतें सरकारच्या प्रधानानें पार्लमेंटमध्यें केलेलें विधान जसेंच्या तसेंच छापणें हा गुन्हा नव्हे. पण इंग्लिशमननें प्रस्तुत प्रकरणांत पार्लमेंटमधील भाषणें नुसतीं दिलेलीं नसून त्यांनीं स्वतःच्या जबाबदारीवर लाला लजपतराय यांची बदनामी होण्यासारखा मजकूर छापला: लालाजींच्या हद्दपारीतील खऱ्या कारणांची परिस्फुटता करण्याचा त्यानें आव आणला. ज्या लेखावरून फिर्याद झाली त्यांत लालाजींनीं गुन्हा केला आहे असें ध्वनित केलें आहे. न्या. हॅरिंग्टन ह्मणतात, पार्लमेंट मधील भाषणांचा रिपोर्ट नव्हे अशा स्वतंत्र गैरअब्रूकारक विधानांना संरक्षण द्यावें अशाबद्दल अपील करणाऱ्या पक्षानें आधार दाखविलेला नाहीं. गुन्हा केल्याचा आरोप आणणें ही टीका नव्हे. अशा कोर्टानें ठराव केलेला आहे मुख्य बदनामीकारक मजकुरा संबंधानें उभयतां न्यायाधीशांनीं स्पष्ट शब्दांनीं निर्भत्सना केली आहे गैरशिस्तपणा, हलकटपणा असे शेलक्या शब्दांनीं समजले जाणारे गुण या लेखांत दिसून आल्याचें न्यायमूर्तींनीं लिहिलें आहे. पण नुकसानीची रक्कम फारच कमी केलेली आहे. पण तो मुख्य मुद्याचा प्रश्नच नाहीं. लालाजींनीं देखील सूड उगविण्यासाठीं ही फिर्याद लावली असें आह्मांला वाटत नाहीं त्यांचा हेतु सफळ झालेला आहे आणि इंग्लिशमन सारख्या स्वैरलेखणी बहादरांना हा धडाच मिळाला आहे लालाजी विषयीं साशंकपणा प्रदर्शित करणारें असें एक वाक्य आहे. आणि त्यावरून हद्दपारीच्या बाबतींत न्यायमंदिरांतहि कोणती दृष्टी ठेवली जाणार हें ठरल्यासारखें आहे. पण त्याला उपाय नाहीं. हायकोर्टानें या पेक्षां जास्त स्वतंत्रपणा दाखविला असता तर बरें झालें असतें इतकेंच यावर ह्मणतां येत आहे.

—

## समाधान.

१९०८।०९ च्या प्रांतिक राज्यकारभाचा वार्षिक इतिहास नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्या वरून पाहतां आणि विशेषतः त्या रिपोर्टाच्या सुरुवातीच्या असलेली सारभूत प्रस्तावना पाहतां आमच्या मनाला आनंद वाटतो कीं स्थानिक सरकारला राजकीय वातावरण आतां समाधानकारक वाटू लागलें आहे. मराठी-भाषा बोलणाऱ्या भागांमधून राजकीय चळवळ विशेष फैलावली होती, आणि कॉलेजें व शाळा या संस्था राजद्रोहाच्या विचारांनीं दूषित झाल्या होत्या आणि सरकारा विरुद्ध अप्रिति व द्वेषभाव पसरत चालला होता ह्मणून स्थानिक सरकारानें एक मोहिमच उभारली होती; विद्यार्थ्यांसाठीं सक्तीचे व मनाईचे हुकूम काढण्यांत आले, पेनशनर, अधिकारी, आनररी माजिस्ट्रेट, स्थानिक संस्थांचे सभासद यास समज देण्यांत आली कीं त्यांचीं वर्षसनें किंवा पेनशनें हीं राजद्रोहाच्या चळवळींपासून अलिप्त राहण्यापासूनच कायम राहणारीं आहेत, आणि तसें करितांना उमरावती मुनसिपालिटीचे व्हाइस चेअरमन, चांदाचे प्रेसिडेंट व आणखी कांहीं इतरत्र सभासद यांच्यावर अर्धचंद्राचा प्रयोग करावा लागला ज्या दिवशीं नागपूरचें प्रदर्शन प्रथम उघडलें त्या दिवशीं कै० श्रीमती महाराणी व्हिक्टोरिआचा पुतळा कांहीं दुष्टांनीं छिन्नभिन्न केला तेव्हां तर राजद्रोही मंडळींचा उच्छेद करण्यासाठीं एक मोठा पोलिस अधिकारी नेमण्यांत आला आणि त्याच्या चौकशीमुळें ‘ न्याशनल ’ शाळा आपोआप बंद पडल्या आणि नागपूरची राष्ट्रीय सभा जड़ लामुळें बंद पाडावी लागली. या गोष्टीमुळें राजद्रोहाचा बीमोड होऊन लोक पुनः शांततेच्या व स्वस्थतेच्या मार्गाला परतले. या बद्दल सरकारनें आपली पाठ थोपटून घेतली आहे. सरकारी समाधानाची स्थिती पाहून आह्मांसही समाधान वाटतें. आतां या बाह्य धामधूमी बंद पडल्या नंतर सरकार लोकांचीं अंतःकरणें प्रेमळपणानें वश करण्यास लागतील तर फार बरें होईल.

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः— ऊन एकदम तीव्र व कडक पडूं लागलें व त्या मुळें उष्णकालाला प्रारंभ बराच लवकर झाला आहे. प्लेगाला उतरती कळा लागली आहे पण अजून आकोल्यांत ५।७ प्लेगाचे मृत्यु दररोज होत असतात आकोला जिल्ह्यात अजून प्लेग बराच आहे.

झडती— नाशिकच्या खुनांतील बादरायण धक्का आकोल्यापर्यंत आला आणि येथील वेदमूर्ती रा. रा. बळवंत गणेश सोमण, पेनशनर तालिम मास्तर; यांच्या घराची झडती गेल्या गुरुवारीं झाली. पण त्यांत कांहींच निष्पन्न होण्यासारखें नव्हतें. त्यांस सरकारांतून बक्षीस मिळालेली एक जुनी तलवार व लघुरुद्र, विवाहादिकांच्या चिठ्ठ्या श्राद्धें इत्यादि विषयाचा पत्रव्यवहार मात्र सांपडला.

रा. रा. एफ. जी. स्लाय कमिशनर यांस पुढील महिन्याच्या ८ वे तारखेपासून फर्लो व हक्काची रजा मिळून सहा महिन्यांची रजा देण्यांत आली आहे.

या रजेंत रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी वाछा डेपुटी कमिशनर, भंडारा यांची नेमणूक वऱ्हाडच्या कमिशनरच्या जागीं करण्याचा संकेत पक्का ठरला आहे हें कळविण्यास परम आल्हाद वाटतो. राजश्री रुस्तुमजी हे या प्रांतीं आबालवृद्धांस मशहूर आहेत आणि या श्रेष्ठ हुद्यावर त्यांस पुनः नेमण्यांत येणार आहे या विषयीं आह्मा आकोलेकरांस तर मोठी गोडी व अभिमान वाटतो.

लेफ — कर्नल कोलेब साहेब सेक्रेटरी निसबत चीफ कमिशनर हे गेल्या बुधवारी रजेवर गेले. त्यांच्या रजेंत रा. रा. एफ. एल. क्राफर्ड आसि. कमिशनर यांस ३ रे सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

रा. रा. शिवराम हरी गोखले एम. ए. प्रिन्सिपाल ट्रेनिंग कॉलेज, उमरावती यांस १ ले जुलै पासून जबलपूर येथील सरकारी कालेजांत प्रोफेसर नेमण्यांत आलें आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. राजश्री शिवरामपंत हे मोठे विद्याव्यासंगी, उत्तम अध्यापक व बहुश्रुत विद्वान आहेत तेव्हां अशा गृहस्थांची योजना प्रोफेसरांच्या स्थानीं झाली हें अगदीं यथायोग्य झालें.

येत्या इस्टरच्या सुटींत उमरावतीस भरणाऱ्या महंमदी विद्यापरिषदेचें अध्यक्षस्थान खान बहादूर मलक यांस देण्याचा निश्चय ठरला आहे.

अभिनंदन— राव बहादूर रामकृष्ण रावजी पंडित, आफि. डिपुटी कामेशनर, नागपूर यांस पेनशन घेण्यास परवानगी देतांना नामदार चिफ कमिशनरांनीं त्यांच्या साडेछत्तिस वर्षे चाकरीचा धन्यवाद केला असून त्यांच्या राजनिष्ठ सद्गुणाबद्दल, व उत्कृष्ठ सेवेबद्दल त्यांची विशेष प्रशंसा केली आहे. त्यांच्या अभिनंदनाचा निराळा सरकारी ठराव प्रसिद्ध करण्यांत आला आहे ही विशेष गोष्ट होय.

भावी बारिस्टर--- रा. रा. दाऊदखान रसूलखान, उमरावती हे गेल्या आठवड्यांत विलायतेस जाण्या साठीं रवाना झाले. त्यांचा विचार तिकडून बारिस्टर होऊन येण्याचा आहे विलायतेस गेलेले वऱ्हाडचे पहिले मुसलमान रा. रा. मीर अफ्सर हुसेन, इलिचपूर हे लवकरच परत येणार आहेत. हीं दोन्हीं उदाहरणें वर्णनीय आहेत.

रा. रा. जनार्दन विनायक ओक एम. ए मुख्य अध्यापक, समर्थ विद्यालय, तळेगांव हे प्रकृती नादुरुस्त असल्या मुळें हवा पालटण्यासाठीं इकडे आले आहेत. ‘ समर्थ विद्यालया ’ ला वर्गणी ज्या उदार विद्याभिलाषी मंडळीस द्यावयाची असेल त्यांनीं ती त्यांच्या जवळ देण्याची संधी दवडूं नये.

सुट्टीः— दरसालच्या होळीकापूजन निमित्त व प्लेगा संबंधाच्या उद्भवित अडचणी निमित्त पुढील सोमवारचा ह्मणजे ता. २८ मार्चाचा अंक प्रसिद्ध होणार नाहीं.

## सुधारलेले लोखंडी नांगर

लांकडी नांगर जाऊन त्यांच्या जागीं हळू हळू लोखंडी नांगर प्रचारांत येऊं लागले आणि हल्लीं हंगामाच्या दिवसांत तर त्यांची जरूरी फारच भासणार हें जाणून आह्मी तुमच्या करितां मोठ्या मेहनतीनें हल्लीं सुधारलेले लोखंडी नांगर आमच्या कारखान्यांत तयार करून ठेविले आहेत. व हे नांगर सर्वत्र पसंत असल्याचें तुमच्या वाचण्यांत अगर ऐकण्यांत आले असेलच, शिवाय आमचे नांगर परदेशी नांगरापेक्षां प्रत्येक बाबतींत फारच मजबूत असून किंमतींत स्वस्त आहेत, ह्मणून जास्त माहितीच्या सूचीपत्रका करितां आजचे आज लिहा.

किर्लोस्कर बंधु, बेळगांव.

नो. नं. ट ७२

---

सत्रा वर्षांपासून परीक्षित व सरकाराकडून रजिष्टर केलेला.

## सुधासिन्धु

कालरा, ( पटकी ) दमा, खोकला, कफ, पोटशूल, अतिसार, संग्रहणी, जुलाब, अतिनिद्रा वातजन्यरोग, व मुलांचे रोग या सर्वांवर एकच स्वादिष्ट व रामबाण औषध. प्रत्येक शिशीची किंमत ॥. एका डझनास रुपये ६ टपाल हांशील १ पासून ४ पर्यंत ८= आणे व डझनास ।. आणे. एकदम ६ घेणारास १ फुकट. पूर्ण माहिती व सरटिफिकीट पाहण्याकरितां क्याटलाग फुकट पाठवूं. प्रत्येक ठिकाणीं एजंट पाहिजेत, नियम मागवून पहा.

मिळण्याचा पत्ता

सुख संचारक कंपनी,

नो. नं. घ. ५३ मथुरा.

---

इंदुप्रकाश, राष्ट्रमत, ज्ञानप्रकाश, काळ, मुंबईवैभव आदिकरून पत्रांकडून उत्तम अभिप्राय मिळालेलें.

**उद्यान मासिक:—** यांतील प्रमुख विद्वान व विदुषींचे लेख व कविता आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस वाचनीय असतात. शिळोप्याच्या वेळीं हास्यविनोद, मधुर संगीत व प्रेमकथालाप यांच्या योगें करमणूक करण्यांत हें मासिक अद्वितीय आहे. चित्रें फारच सुबक असतात. पुस्तक अगदीं नियमित वेळीं प्रसिद्ध होतें. वा. व. फक्त दीड रुपया शिवाय ट. ह.

पत्ता:— 'उद्यान' ऑफिस चर्नीरोड, मुंबई.

म्यानेजर 'उद्यान.'

---

## नोटीस

एलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपल कमिटीचे हद्दींत रहाणार सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं सदर्हू कमिटीनें तारिख २२ व २४ माहे जानेवारी सन १९१० इसवी रोजीं भरलेल्या सबकमिटींत सन १९१०—११ साला करितां पोलिसपट्टी, घरपट्टी, भंगीपट्टी, व हैदपट्टीचे ठराव केले आहेत. सदर्हू बद्दलचे आकारणीचे तक्ते कमेटीचे ऑफिसांत ऑफिसचे वेळांत सर्वांस पहाण्यास मिळतील.

कमेटीनें केलेले ठराव ज्या कोणास पसंत नसतील त्यांनीं नोटिशीचे तारखेपासून ३० दिवसांचे आंत कमिटीकडे अर्ज करावे ह्मणजे त्यांचे अर्जाचा विचार केला जाईल.

सदर्हू मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें ता० २९ जानेवारी सन १९१० इ०

सही

रघुनाथ धोंडो मराठे.

सेक्रेटरी

एलिचपूर सिव्हिल स्टेशन

म्युनिसिपल कमिटी

नो० नं० ट. ९२

---

## नोटीस

बनाम खाजेकुतबोद्दीन वा॥ खाजेबदीयोद्दीन साहेब रहाणार मलकापूर जिल्हे बुलडाणा हल्लीं मुक्काम हिंगणाकाजी सबपोष्ट ऑफिस ता. मलकापूर.

यांस —

खालीं सही करणार खाजेमुनीरोद्दीन वलद खाजेमहंमद साहेब रहाणार मलकापूर जिल्हे बुलडाणा हल्लीं मुक्काम हिंगणाकाजी सबपोष्ट ऑफिस ता० मलकापूर जिल्हा बुलडाणा यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी आकोले येथील अडिशनल डिस्ट्रिक्ट जज यांचे कोर्टांतील दिवाणी मु. नंबर $\frac{३२१}{१९०४}$ ट्रान्सफर नंबर $\frac{२२}{१९०५}$ चा यांतला ११-४-१९०५ इ. रोजीं खाजाबदियोद्दीन साहेब यांचे हस्ताक्षराचीं पत्रें, पोष्टकार्डे, हिशेबाच्या याद्या व कूपन वगैरे तसेंच बाळकृष्ण काशीनाथ गुमास्ते यांचे हातची लिहिलेली पो. कार्डे व हिशेबाच्या याद्या वगैरे व इतर दस्तऐवज वगैरे इंग्रजी भाषांतरा सह दाखल केलेले तुह्मी तारीख ११।१२।१९०२ इ. रोजी अडिशनल डिस्ट्रिक्ट जज आकोला यांचे कोर्टांत वकीलपत्राचे द्वारें खा. मु. अर्ज देऊन आमचे वतीनें खालीं लिहिलेल्या नंबराचे एक्सीबिटस् ज्यावर मे. एसी. करी साहेब बहादूर सोवल जज बुलडाणा यांचे इनिशियल्स आहेत ते परत घेतले ते एक्सीबिटस नंबर ३९, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११५, ११६ एकंदर ४८ आहेत याशिवाय आणखी तुह्मी जास्त घेतले असल्यास ते सर्व तुमचे जवळ असून अद्याप आह्मास तुह्मी दिले नाहींत तर ही नोटीस पोचल्या पासून ८ आठ दिवसांचे आंत आह्मास वरील कागद तुमचे सहीची तपसीलवार यादीसह देऊन त्याबद्दल आमची रीतशीर पावती घ्यावी.

वरील कागदपत्र आह्मास आकोले येथें अ. डी. जज यांचे कोर्टांत दि. मु. नं. $\frac{३८}{१९०९}$ यांत पुराव्यात दाखल करावयाचे आहेत. कदाचित तुह्मी या नोटीसी प्रमाणें करण्यास चुकाल तर आह्मास तुह्माकडून कागदपत्र अजिबात अगर वक्तशीर न मिळाल्यामुळें जे कांहीं आमचे नुकसान होईल ते सर्व प्रकारें भरून देण्यास पात्र व्हाल. व वरील दस्तऐवजाचे इंग्रजी मध्यें जे भाषांतर कागदपत्रासह दाखल झालेलें आहेत ते सर्व भाषांतर तुह्मा विरुद्ध लागू होतील. ता. १४ माहे २ सन १९१० इ.

सही

खाजेमुनीरोदीन वा॥ खाजेमहंमद साहेब राहणार मलकापूर हल्लीं मुक्काम हिंगनाकाजी सब पोष्ट ऑफिस. ता. मलकापूर.

नो० नं० ट. ९७

---

## नोटीस

बेशमी १ मोतीलाल व २ मेगराज कस्तुरचंद जात ओसवाल मारवाडी राहणार मौजे चिंचोल प्रगणें व तालुके मलकापूर जिल्हे बुलडाणा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं मौजे चारटाणे पेठ एदलाबाद ता. भुसावळ जिल्हे पूर्व खानदेश येथील शेत सर्वे नंबर १२३ एकर १८।१० गुंठे आकार रुपये ३१॥।= सालीम आह्मी तुह्मांस फक्त उदरनिर्वाहास दिलें असून आतां तुह्मी सदर्हू शेत विक्रीस काढल्याचें समजतें; आणि सदर्हू शेत आजपर्यंत आमचेच कबज्यांत असून त्यावर तुमचा कबजा मुळींच नाहीं आणि सदर्हू शेत तुह्मांस विक्री अगर गहाण देण्याचा मुळींच अधिकार नाहीं: तरी या नोटीसीनें तुह्मा उभयता भावांस व तुमची बहीण नामें गोपी भ्रतार कणीराम असे त्रीवर्ग बहीणभावंडांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी सदर्हू शेताबद्दल कोणा दुसऱ्यास कोणतेच प्रकारचा लेख करून देऊं नये. केल्यास तो लेख रद समजला जाईल कळावें. तारीख १४।३।१० इ.

सही

बिरदीचंद अनराज ( मालक ) गुलाबचंद बिरदीचंद दुकान मलकापूर.

नो० नं० ट. ९५

---

## नोटीस

नोटीस शिवराम वलद राघोजी कुणबी रा. तामसवाडा

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी व मारोती वा॥ धोंडाजी रावजी वलद इकमजी व भगवंता वलद खुशालजी असे चौघांनीं तुमचे शेत मौजे तामसवाडी तालुके दर्यापूर येथील शेत सर्वे नंबर ३ एकर गुंठे ३१।८२२ आकार रुपये हें शेत सन १३१९ साला करितां रुपये ६०० मध्यें वहितीस करून रुपयांची आदाई होईपर्यंत माल ताब्यांत ठेवण्याचा करार होता. त्याप्रमाणें आह्मी शेत वाहून माल उभारणीस आणला व त्यांतील माल कपाशी खंडी ६ दर ७६ प्रमाणें रुपये ४५० व तीळ, ६५ रुपये १० चे तुमचे ताब्यांत टेविला ते रुपये वजा जाता बाकीचे रुपये १४० तुमचे घरीं घेऊन आलों असतां तुह्मी घेतले नाहीं व कबुलायत परत दिली नाहीं. सबब आह्मी रुपये १४० परशराम पाटील यांचे घरीं अनामत ठेवीले ते घेऊन जाऊन आमची कबुलायत व पावती घ्यावी. तुह्मी आमचे व्याजा व रुपयां बद्दल दावा केल्यास आह्मी जबाबदार नाहीं सही तारीख ८-२-१९१० इ.

सही

निशाणी माहादु वा॥ धनसींगजी तामसवाडी पाची अहे

नो. नं. ट ९८

---

## नोटीस

नोटीस बेशमी — हिरामण वलद दुलाजी पराडे जात माळी राहणार वाडेगांव ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे हिंगणें वाडेगांव ता० बाळापुर येथील शेत सर्वे नंबर ३९ एकर गुंठे १९।८१९ आकार रुपये १७ या शेतांत हिस्से आहेत ते. तुमचा एक तृतीयांश हिस्सा रावजी वलद जयराम याचा एक त्रितीयांश हिस्सा व माझा एक त्रितीयांश हिस्सा आहे असें असून तुह्मी आपले हिश्शाची जमिनीची विक्री करून आह्मांस न समजतां गंगाराम सूर्यभान उजाड राहणार हिंगण वडेगांव ता० बाळापूर यांस १०० रुपयांस विकत देण्याचें कबूल करून पातुर शेखबाबू येथें तुह्मी रजिष्टर करण्या करितां गेले असतां मी त्या ठिकाणीं येऊन तुह्मास हरकत केली. त्या करितां तुह्मी तो सवदा रद केला आहे तरी आमचा अग्रक्रयेचा अधिकार आहे ह्यामुळें मी तुह्मांस त्याचे पेक्षां जास्त ५ रुपये ह्मणजे रुपये १०५ देण्यास कबूल आहे. करितां ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसांचे आंत तुह्मी सदर्हू जमीनीचें खरेदीखत आह्मांस करून देऊन रुपये १०५ आमचे जवळून घ्यावे. जर आमचे शिवाय दुसरे कोणास वरील जमीन खरेदी द्याल तर आमचा अग्रक्रयेचा हक्क कायम राहील. कळावें. ता० १५-३-१९१० इ.

सही

बनसींग हरसींग पाटील कुणबी रा० हिंगणें वाडेगांव ता० बाळापूर निशाणी खुद हातची.

नो. नं. ट ९९

## आर्यवनौषधालय मुर्डी

हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत यांतून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकट आम्हांस दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें पथ्य द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजिवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धिवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक मुख्य राजा की धातू तो शुद्ध असला तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रु उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनाने नपुंसकत्व, स्वप्नदोष इतर बाधांतील उन्हाळे इंद्रियशिथिलता, वगैरे. गर्मीसंबंधी मुरलेले विकार अंगसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सर्व पाय लागणे, व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुडाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, जुने जुनाट परमा, मुष्टिमैथुनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचत नाहीं लागते त्यांस उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही मागविल्यास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्च सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. १२५ गो ३ रु १७५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें पडळ, साहर, फुल, लुपन्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस जन्मभर रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व उजन्य दाह लघवीची मूत्राची लडी, संकोच पुवस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत जात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दुसरें नाहीं. बा० किं० १ ॥ भार बाटलीस रु. २

४ दंतवलवर्धक पूडः—दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळी ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, गजगे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिंवज्वरः—औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह ताप्यावर गोळ्या गांठीस लावणे, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थं माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा कॅटलॉग मागव तो फक्त पाठवूं आपघांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय निरनिराळ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्च सोबत टपाल खर्च वेगळा पडेल पत्रानें किंवा व्ही. पी. नें पाठवूं खात्रीनें ज्ञान कळविल्यास रोगाचे निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना,

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला सगळ निरुद्योगी आळशी बनल्यामुळे एकदा जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावे आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र ३० प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजर्लें वगैरे गावांतून तो पुण्यापर्यंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिरातीं किंवा ते लोक यांची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपले धोरण ठरवण्याचा ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधा घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कित्येक ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आपचे खटाटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डीं ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

ORIENTAL GOVERNMENT

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED
ESTABLISHED IN 1874.
HEAD OFFICE—BOMBAY
CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH
Head—Quarters—Nagpur C. P.

**FUNDS EXCEED THREE CRORES AND THIRTY LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Comhany's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, though decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officer, professional men, Tradesmen and others employing a portion of their annual income or profits in effecting life policies create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application–

M. DESOUZA.
CHIEF AGENT.
Nagpur.

---

हें पत्र आकोला येथें केळकरवाडी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.